म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0014091
REFBK-0014091

# मराठी कवितेचें अध्यापन

लेखक

प्रा. म. वि. फाटक, एम्. ए., बी. टी.
प्रताप कॉलेज, अंमळनेर.

REFBK-0014091

REFBK-0014091

प्रकाशक

मॉडर्न बुकडेपो

आनंदाश्रमासमोर, पुणें २.

'३५१ ] द्वितीयावृत्ति [ मूल्य दीड रुपया

# निवेदन

मराठीस मिळत असलेल्या महत्त्वाप्रमाणेंच मराठीच्या अध्यापन-शास्त्रासही महत्त्व मिळणें क्रमप्राप्त आहे. मातृभाषेचें अध्यापन करितांना जे अनेक ग्रंथ अभ्यासण्यास मिळाले त्यामुळेंच ह्या छोट्या ग्रंथाचें लेखन करण्याचा विचार झाला. 'आधारभूत ग्रंथांची यादी मागें दिलेली असली तरीं प्रो. हॅडो यांच्याच पुस्तकाचा आधार या ग्रंथाच्या रचनेसाठीं व विचारासाठीं प्रामुख्यानें घेतला आहे. या विचारांना जोड मात्र 'टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन पुणें" या संस्थेंत काम करीत असतांना मिळालेल्या अनुभवांची दिली आहे. या पुस्तकाचा उपयोग प्राथमिक व दुय्यम शाळांतील शिक्षकांना होईल अशी आशा आहे.

या विषयावर सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ प्रा. ना. ग. नारळकर यांनीं वेळोवेळीं माझ्याशीं चर्चा करून ज्या सूचना केल्या त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. प्रा. रा. शं. वाळिंबे यांनीं सर्व प्रकारची मदत केल्याबद्दल आभार मानावे तितके थोडेच ! या पुस्तकाचा पुरस्कार डॉ. ग. श्री. खैर, एम्. ए., पीएच्. डी. व प्रा. ना. वि. पाटणकर, एम्. ए., एम्. एड्. यांनीं केल्याबद्दल त्यांचे आभार मानणें आवश्यक आहे.

हल्लींच्या दिवसांत 'कवितेचें अध्यापन' प्रकाशित करण्याचें श्रेय सर्वश्रीं रा. ना. त्र्यं. भिडे, मॉडर्न बुक डेपो, पुणें यांनाच दिलें पाहिजे.

२५ मार्च १९४५

—म. वि. फाटक

## अनुक्रमणिका


प्र. १. कवितेचें उद्दिष्ट
प्र. २. कवितेचा शिक्षक
प्र. ३. कवितेची निवड
प्र. ४. कवितेच्या अध्यापनांतील प्रस्तावना
प्र. ५. कवितेचें वाचन
प्र. ६. कवितेचें प्रत्यक्ष अध्यापन
प्र. ७. कवितेच्या अध्यापनाची अखेरी
प्र. ८. अध्यापनाची परिणति
प्र. ९. कांहीं प्रश्न व उपसंहार

# प्रस्तावना

[लेखक :— **डॉ. ग. श्री. खैर**, एम्. ए., पीएच्. डी.]

मराठी भाषेचे विद्यार्थी, अध्यापक आणि अभिमानी या भूमिकेवरून प्रा. म. वि. फाटक यांचें लेखन आणि भाषण होत असतें असा माझा अनुभव आहे. या त्यांच्या गुणांना शिक्षणशास्त्राच्या अध्ययन–अध्यापनाची जोड लाभलेली आहे. "मराठी कवितेचें अध्यापन" या लहानशा ग्रंथाचे रूपानें प्रा. फाटक यांनीं आपल्या भाषा व अध्यापनशास्त्रविषयक व्यासंगाचा आणि अनुभवाचा फायदा मराठी भाषेचे शिक्षकवर्गाला दिलेला आहे. अलीकडे अध्यापन व शिक्षणशास्त्र-विषयक ग्रंथ मराठी भाषेमध्यें प्रसिद्ध होऊं लागले आहेत. त्यांमध्यें या पुस्तकानें फार महत्त्वाची भर घातलेली आहे. प्राथमिक अथवा माध्यमिक शाळेंतील मराठी भाषा शिकविणाऱ्या प्रत्येक शिक्षकाला हें पुस्तक जवळ ठेवावें लागेल व वारंवार वाचावें लागेल.

मराठी कवितेच्या अध्यापनाला लागणाऱ्या सर्व गोष्टींची आमूलाग्र चर्चा या लहानशा पुस्तकांत झालेली आहे. विशेष म्हणजे या चर्चेला लेखकानें स्वतःच्या निरीक्षणाची व अनुभवाची जोड दिलेली आहे आणि शक्य तेथें स्वतः पाठ रचून दाखविलेले आहेत. ठिकठिकाणीं दिलेल्या प्रत्यक्ष उदाहरणांमुळें त्यांचें विवेचन शिक्षकांना सुबोध आणि मार्गदर्शक असें झालेलें आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें शिक्षकांच्या मनावर एक तत्त्व ठसविलें जाईल. —तें हें कीं, संगीत, चित्रकला, शिल्पकला, यांप्रमाणेंच काव्य ही देखील एक कला आहे. कलेच्या आस्वादाचे व रसग्रहणाचे सर्व सिद्धांत व पद्धति या काव्य-कलेलाही लागू आहेत. कलेचा आस्वाद घेतांना मुख्यतः भावनेकडे व विकारांकडे लक्ष दिलें पाहिजे. केवळ भाषेचा अभ्यास केल्यानें काव्याचा रसास्वाद प्राप्त होणार नाहीं. कवितेंतील प्रमुख भावना आकलन करून घेतली पाहिजे व ती विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविली पाहिजे. काव्यवाचनानें मुलांना आनंद प्राप्त झाला पाहिजे व हा आनंद आपण शाळा सोडल्यावरही वारंवार घ्यावा अशी प्रबल इच्छा त्यांच्या अंतःकरणांत निर्माण झाली पाहिजे. असें झालें तरच कवितेचें अध्यापन यशस्वी झालें असें म्हणावें. आनंदाची अनुभूति व अशा अनुभवाविषयीं उत्कंठा या काव्य-अध्यापनाच्या मुख्य कसोट्या आहेत असें म्हणतां येईल.

गेल्या चाळीस वर्षांत काव्याचे अध्यापनांत फार स्थित्यंतर झालेलें आहे. जुनी पद्धति जाऊन नवीन पद्धति येत आहे. दोन्हीहि पद्धतींचें निरीक्षण केल्यानंतर मला असें वाटतें कीं, या अध्यापनपद्धतींचे अभिमानी दोन टोंकाला जात आहेत. जुन्या पद्धतीचे शिक्षक अन्वयार्थ, शब्दार्थ, वृत्त, अलंकार, इ. गोष्टींवरच भर देत होते. कवितेच्या मूळ भावनेकडे त्यांचें कमी लक्ष असे. नवीन पद्धतीचे अभिमानी अगदीं दुसऱ्या टोंकाला जात आहेत. ते काव्यांतील भावनेवरच अधिक भर देतात व भाषा, रचना, अलंकार इत्यादि गोष्टी अगदीं गौण समजतात. प्रा. फाटक यांचा कल या नवीन पक्षाकडे अधिक आहे असें वाटतें. मी दोन्ही पद्धतींत समन्वय घडवून आणूं इच्छितों. असें कां तें सांगतों.

भावनेची उपेक्षा पूर्वी होत होती, ती होऊं नये हें खरें. परंतु भाषेच्या अध्ययनाचीहि उपेक्षा झाली तर अध्ययनपद्धति सदोष राहील हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ज्या ठिकाणीं रचना गुंतागुंतीची आहे तेथें अन्वयार्थ लावायला काय हरकत आहे? जेथें शब्द अपरिचित आहेत तेथें शब्दांचे अर्थ द्यायला काय हरकत आहे? भावना व विचार यांचा परामर्ष घेतल्यानंतर जरूर तेथें शब्दार्थ, अन्वयार्थ, छंद, अलंकार इ. गोष्टींकडे लक्ष देणें जरूर आहे. नवीन पद्धतीनें घेतलेले कवितेचे पाठ पाहून माझा ग्रह झालेला आहे तो असा कीं, मुलांना स्थूल मानानें कवितेंतील विचार व भावना कळतात. परंतु कवितेंतील नेमक्या कोणत्या शब्दांतून किंवा पंक्तींतून या विचारांचा व भावनांचा जन्म होतो याचें ज्ञान अपूर्ण राहातें. सारांश नवीन पद्धतीमध्यें स्थूलमान अधिक आहे, निश्चितपणा व अचूकपणा कमी आहे. म्हणून कवितेचें रसग्रहण झाल्यावर काव्यशास्त्र, भाषाशास्त्र आणि विचारांतील गुणदोष यांविषयीं चिकित्सक चर्चा झाली पाहिजे. तसें न झाल्यास पुढें आलेलें सर्वच काव्य चांगलें व सर्वच रसग्रहणाचे दृष्टीनें अप्रतिम अशी मुलांची भाबडी समजूत होईल. अशा प्रकारची अंधश्रद्धा दृढावल्यास मराठी भाषेतील महाकवि निर्माण होण्याला फारशी आशा राहणार नाहीं.

जातां जातां आणखी एक मुद्दा सांगावासा वाटतो. पूर्वी भूपाळ्या, आरत्या, पाळणे, स्त्रियांचीं गाणीं इ. रूपानें मराठी काव्यकला मराठ्यांच्या जीवनाशीं समरस झालेली होती. नवी मराठी कविता नव्या पिढीच्या जीवनाशीं समरस करणें हें शाळेचें व शिक्षकाचें काम आहे. तें चांगलें करण्याच्या दृष्टीनें त्यांना प्रस्तुत पुस्तकाचा चांगला उपयोग होईल असा मला विश्वास आहे.

१८०९१
२०३२६ ... ता. ... ९८८ ... ३०१९२५

# मराठी कवितेचें अध्यापन

## प्रकरण १ लें : : : कवितेचें उद्दिष्ट

जेव्हां आपण कवितेचें होणारें अध्यापन व त्यावर केली जाणारी टीका विचारांत घेतों तेव्हां दोन्ही बाबतींत घडलेले असंख्य दोष आपणांसमोर उभे रहातात. काव्याचें अध्यापन करणारे शिक्षक काव्य कोणत्या ध्येयासाठीं शिकवायचें याचा यत्किंचितही विचार केलेले नसतात व शिक्षणक्षेत्रांतील पुष्कळसे टीकाकारही काव्याच्या अध्यापनांतील ध्येयाविषयीं अज्ञानांतच असतात. ही वस्तुस्थिति असल्यामुळें शिक्षक कांहीं तरी काव्याचें अध्यापन करतात.आणि टीकाकारही निश्चित मार्गदर्शन नसलेली बेजबाबदार टीका करीत असतात.

वास्तविक एखाद्या विषयाचा अंतर्भाव अभ्यासक्रमांत कोणत्या हेतूनें केला जातो हें समजून घेणें व नंतर त्या धोरणानें त्या विषयाचें अध्यापन करणें, प्रत्येक शिक्षकाचें कर्तव्य ठरेल. आपण शिकवत असणारा विषय आपल्या समोरील विद्यार्थ्यांच्या जीवनावर आज किंवा उद्यां काय परिणाम घडवून आणील याची जाणीव जर शिक्षकाला नसेल तर त्याचें कोणत्याही विषयाचें अध्यापन हें केव्हांही अव्यावहारिक स्वरूपाचें व परिणामीं व्यर्थ ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

आपण शिकवत असलेल्या विषयाचें भावी उद्दिष्ट आकलन न झाल्यामुळें, त्या विषयाच्या अध्यापनांत वापरत असलेल्या पद्धति

निर्जीव वाटतात; कचित् प्रसंगीं त्या अप्रासंगिक किंवा चुकीच्याही असूं शकतात. शिक्षकाचा निश्चित दृष्टिकोन, तो विषय विद्यार्थ्यांच्या जीवनाशीं एकरूप करण्यासाठीं आपण निश्चित काय करावयास पाहिजे याची स्पष्ट जाणीव—या प्रमुख गुणांच्या अभावीं आमच्या शिक्षणांत पुष्कळच खेळखंडोबा व नुकसानी झाली आहे. प्रत्येक विषयांत जर ही स्थिति आहे तर कवितेचें अध्यापन त्यास अपवाद कसें राहील?

सारांश कवितेचें अध्यापन करणाऱ्या शिक्षकानें तें काय कारणास्तव करावयाचें हें समजावून घेतलें पाहिजे. मराठी कवितांचें अध्यापन आज आपल्या शाळांतून चालू आहे, त्याप्रमाणें गेल्या अनेक वर्षांतूनही चालू आहे. मराठीमध्यें अभ्यासक्रम आंखून त्याच्या अंमलबजावणीसाठीं पाठ्य-पुस्तकें प्रथम निघाल्याला सुमारें शंभर वर्षें होत आलीं. त्या वेळच्या पाठ्य-पुस्तकांत कवितांचा अंतर्भाव केलेला आपणांस आढळून येईल. हा अंतर्भाव कोणत्या हेतूनें केला असावा व त्या काळांतील शिक्षक कोणत्या हेतूनें काव्य शिकवत याचा आढावा घेणें थोडेंसें मनोरंजक पण मुख्यत्वें उपकारकच ठरेल.

नाशिक येथील महाराष्ट्र कविसंमेलन प्रसंगीं अध्यक्षीय स्थानावरून "काव्यविषयक भ्रामक कल्पना" स्पष्ट करतांना कै. डॉ. माधवराव पटवर्धन म्हणतात*—

"हे जुने शिक्षक म्हणतात, कीं विद्यार्थ्यांनीं कवितांचा अभ्यास केलाच पाहिजे कारण या अभ्यासानें चार अर्थ साधतात:—

( १ ) अपरिचित दुर्बोध शब्दांशीं परिचय होऊन आपली शब्दसंपदा वाढते.

( २ ) सुभाषित रत्नांच्या लुटीवर वक्तृत्वाची पेठ थाटतां येते.

( ३ ) नीतिज्ञान झाल्यानें व्यक्ति आणि समष्टि दोघांचीही उन्नति होते.

---

* शारदाविहार पृष्ठ १५३.

( ४ ) आणि अन्वयार्थाच्या व्यायामानें मेंदू बळकट होतो. "

जुन्या अध्यापनांतील हीं चतुर्विध उद्दिष्टें त्या काळांत इतकीं प्रभावी होतीं कीं त्यामुळें काव्याच्या अध्यापनांतील खरें उद्दिष्ट लोपलें गेलें; उपर्युक्त चार अर्थ साधण्यासाठीं तत्कालीन पाठ्यपुस्तकात कोणत्या कविता निवडल्या गेल्या असतील हें सहज ओळखतां येईल. जितकी कविता अधिक क्लिष्ट तितकी ती उत्तम ठरली; नीतिबोधाचें वा तात्पर्याचें शेंपूट बाळगणारी कविता योग्य ठरली; अलंकारानें बांधलेली व सुभाषितांनीं पुष्ट केलेली कविता मान्यतेस चढली. पाठ्यपुस्तकांत कवितांची निवड या पद्धतीनें झाल्यामुळें अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा दृष्टिकोनही असाच चुकीचा बनला गेल्यास नवल नाहीं. कवितेंतील दोन किंवा चार चरणांचा स्वतंत्र भाग पाडावयाचा, त्यांतील कठिण शब्दांची फोड करावयाची, समासांचे विग्रह करावयाचे, अलंकारांची नियमावली घोकून चिकित्सा करावयाची, आणि नंतर प्रत्येक ओळीचा गद्यमय अन्वय लावून त्याचा अर्थ सांगावयाचा. नंतर विद्यार्थ्यांकडून तो सांगून घ्यावयाचा व स्वाध्यायासाठीं नवीन शब्द व तासांत झालेल्या ओळी घोकावयास द्यावयाच्या—मराठी कवितेच्या अध्यापनाची अनेक वर्षें राजमान्य ठरलेली पद्धत ती हीच !

आणि या चुकीच्या उद्दिष्टांमुळें व अध्यापनांतील तंत्रामुळें सर्व विद्यार्थी-वर्गांत कवितेविषयीं अप्रीति निर्माण झाली व काव्याच्या स्वरूपाविषयीं चुकीचे ग्रह दृढमूल झाले. कवितेच्या अध्यापनांतील हे जुने हेतु कसे चुकीचे आहेत तें आपण प्रथम पाहिलें पाहिजे.

अपरिचित व दुर्बोध शब्दांशीं ओळख व्हावी, विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ति वाढावी हें कार्य भाषेच्या शिक्षकाचें आहे याविषयीं आजही मतभेद नाहीं. पण हा शब्दांचा अभ्यास करून घेण्याचें क्षेत्र म्हणजे काव्य ही भूमिका मात्र आज असंमत आहे. शब्द-

संपत्तीचा अभ्यास करण्याची पद्धत निराळी. काव्यांतील आनंद उपभोगण्याच्या क्षणीं क्लिष्ट शब्दांच्या अभ्यासानें रसभंगच होणार यांत शंका नाहीं.

सुभाषितरत्नें पेरून वक्तृत्व खुलतें ही सुद्धां जुनी विकृत दृष्टि आहे. वक्तृत्वकला जेव्हां पोरसवदा होती तेव्हांची ही पद्धत आहे. भाषेला सुभाषितांनीं जडत्व व अकालप्रौढत्व आणून कृत्रिमता निर्माण होते. भाषेचा सहजसुंदर विलास म्हणजे कला ही आजच्या वक्त्याची कल्पना आहे. सुभाषितें, अलंकार, म्हणी, अवतरणें यांच्या दिखाऊ पाठान्तरानें परिणाम होत नाहीं. उलट हास्यास्पदता मात्र पदरीं येते असाच अनुभव आज येईल. याशिवाय काव्याचें अध्यापन वक्तृत्वकलेच्या उद्धारासाठीं करणें ही भूमिकाच सदोष आहे. एक सरस, आनंददायक क्रीडा म्हणून काव्याचें अध्यापन व्हावयास पाहिजे.

कवितेंतील नीतिबोधाच्या किंवा तात्पर्याच्या घोटानें व्यक्ति व समाज यांची नीति सुधारली आहे असे अनुभव किंवा युक्तिवाद यांच्या साह्यानें सिद्ध करतां येईल काय? घरांतील भिंतीवर "सत्य सदा बोलावें" "क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे" इत्यादि पद्यमय ओळी लिहून मुलें सुधारलीं असा कुठें अनुभव आहे? आजच्या नीति-शास्त्रज्ञांनीं व समाज-शास्त्रज्ञांनीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं पोपटपंची-पद्धतीनें केलेलें नीतीचें अध्यापन प्रत्यक्ष व्यवहारांत मुळींच उतरलें नाहीं. अगदीं जुन्या कवितेचें उदाहरण घेऊनही असें म्हणतां येईल कीं, रघुनाथ पंडितानें "नळ-दमयंति स्वयंवराख्यान" रचलें तें हंसादिक पक्ष्यांवर दया करावी असा उपदेश करण्यासाठीं का? उलट त्यांतील रम्य वर्णनांनीं, मनुष्यस्वभावाच्या हळुवार दर्शनानें, आपण आनंदित व्हावें यासाठींच होय! कवितेकडून नीतिबोध अपेक्षिणें हें मूळ उद्दिष्टास खचित सोडून आहे यांत शंका नाहीं.

कविता कठीण असली कीं, अन्वय व अर्थ लावणें कठीण होईल, विद्यार्थ्यांच्या बुद्धीस चालना मिळेल व अखेरीस मेंदू बळकट होईल हें विधान चुकीचें ठरलें आहे. गेल्या चाळीस वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें भाषेच्या व गणिताच्या अध्यापनांतील हेंच एक उद्दिष्ट होतें व याच तत्त्वावर इंग्रजींतील जुने उतारे व मुख्यत्वें लॅटिन भाषेच्या अभ्यासाची सक्ति शाळेंतून केली होती. व्याकरण व गणित यांमुळें मेंदू बळकट होतो हें विधान करणें आजच्या मानसशास्त्र-प्रयोग युगांत फार धाष्टर्याचें ठरेल. Mental Gymnastics हे शब्दप्रयोग व तत्संबधीं अभ्यासक्रम या युगांत मागें पडले आहेत. कवितेच्या अध्यापनांत मेंदूच्या बळकटीचें उद्दिष्ट बसूं शकत नाहीं.*

कवितेच्या अध्यापनांतील विकृत दृष्टिकोन पाहिल्यानंतर साहजिकच कोणीही असा प्रश्न विचारील कीं शाळेमध्यें काव्य शिकविण्यांतील मुख्य हेतु काय आहे? शाळेंतील अभ्यासक्रमांत कवितेची निवड कोणत्या उद्दिष्टासाठीं करण्यांत यावी? कोणत्या तऱ्हेच्या कविता निवडण्यांत याव्या? आणि कोणत्या पद्धतीनें त्या कविता विद्यार्थ्यांना शिकविण्यांत याव्या?—मागील चर्चेनंतर असे प्रश्न उद्भवणें अगदीं क्रमप्राप्त आहे. आणि त्या प्रश्नांपैकीं पहिल्या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार आपण प्रथम केला पाहिजे.

मानवी जीवन रमणीय करणाऱ्या ज्या विविध ललितकला आहेत त्यांपैकीं काव्य ही एक कला आहे, हा पहिला मुद्दा आपण मान्य केला पाहिजे. आणि ही कला शाळेच्या अभ्यासक्रमांत याचसाठीं असावी कीं तिच्या योगानें विद्यार्थ्यांच्या मनांतील सौंदर्यग्रहणशक्तीस आपणांस विकसित करतां येईल. जगांतील इरतऱ्हेच्या, सुप्त वा असुप्त स्थितींत असलेल्या सौंदर्याची आवड उत्पन्न करण्यासाठीं कविता अभ्यासण्यांत आली पाहिजे. आपल्या आजूबाजूच्या जगांत

* Thorndike Educational Psychology.

कितीतरी रम्य दृश्यें असतात. सर्वांनाच तीं रम्य वाटत नाहींत याचें कारण रमणीयता शोधणारी दृष्टि त्यांना दुर्दैवानें कोणी आणून दिलेली नसते व ह्या दृष्टीच्या अभावीं आयुष्यांतील कितीतरी सुखाच्या क्षणांना त्यांना पारखें व्हावें लागते. आमच्या कवितेच्या अध्यापनाचें ध्येय हें कीं विद्यार्थ्यांना ती सौंदर्यशोधक दृष्टि आणून द्यावयाची कीं आपोआपच जगदुद्यानांत विहार करतांना त्या परिसरांतील विविध रमणीयतेनें त्यांना विशुद्ध आनंदाचा आस्वाद घेतां यावा. निर्झराच्या लहरींनीं त्याच्या अंतःकरणांत आनंदाच्या लहरी निर्माण व्हाव्यात, इंद्रधनुष्यांतील रंगसंगतीची चमक त्याच्या नजरेंत उमटावी, हिमालयाचीं धवल शिखरें पाहून सात्त्विक भाव मुद्रेवर विलसावा, देशभक्तांचा निरागस त्याग ऐकून ध्येयवादी प्रसन्नतेचे रोमांच शरीरावर उभे रहावेत— सारांश जगांतील व जीवनांतील विविध सौंदर्याचा आस्वाद त्याला घेतां यावा.

पण कवितेच्या अध्यापनांत सौंदर्याची आवड निर्माण करण्यापुरतेंच उद्दिष्ट ठेवून भागणार नाहीं. या सौंदर्यांतूनच पलिकडील ‘सत्यं’चा टप्पा आपण ओळखला पाहिजे. “सत्यं–शिवं–सुंदरं” ही त्रयी सतत, ध्येय म्हणून कवितेच्या अध्यापनांत आपण पुढें ठेवली पाहिजे. प्रख्यात आंग्ल कवि कीट्स् ( Keats ) म्हणतो “Beauty is Truth”—काव्य हें केवळ सौंदर्यमयच असतें असें नाहीं तें जीवनाशीं सुसंगत असावें लागतें. जीवनांतील शाश्वत सत्यें व मूल्यें जेव्हां कवितेंत ओलांडली जातात तेव्हां ती कविता आभासमय ठरून मानवी मनाची पकड घेण्यास असमर्थ ठरते. केवळ काव्यापुरतेंच नव्हे तर सर्व कलांच्या बाबतींतही हाच नियम आपणांस सांगतां येईल. चित्रकलेंतही आपण हेंच म्हणतों कीं, जीवनांतील सत्य-दर्शन जें चित्र घडवून आणील तेंच श्रेष्ठ! विसंगत आकार वा रंग पाहून आपणांस कधींच आनंद वाटत नाहीं.

सौंदर्यानें मन आनंदित झालें कीं, आपोआपच आपलें मन त्या सौंदर्याला आधारभूत ठरणाऱ्या सत्याच्या दर्शनानें वेडावून जातें. कवितेच्या अध्यापनानें सौंदर्यांतून सत्याकडे जाणारा मार्ग हुडकण्याची शक्ति जर विद्यार्थ्यांत शिक्षकानें निर्माण करून दिली कीं ते विद्यार्थी शाळा सोडून दिली तरीही आपल्या सभोंवतालच्या आयुष्यांत, भाषणांत, लिखाणांत, वाचनांत, कृतींत, बघण्यांत— सारांश आयुष्याच्या सर्व हालचालींत जें जें शिव व अंतिम सत्य आहे तें तें आत्मसात करूं लागतील व जीवनाला रम्यत्व व उदात्तत्व आणून तें पराकोटीचें उच्च करतील. जगांतील सत्यं-शिवं-सुंदरं विषयक दृष्टिकोन मिळालेले हे विद्यार्थी आपोआपच जगांतील असत्य, अमंगल व अभद्र गोष्टींकडे तिरस्कारानें बघतील. भांडणें, मारामाऱ्या, लढाया, परधन वा परस्त्रीहरण इत्यादींपासून पराङ्मुख झालेले हे विद्यार्थी जगाची सात्त्विक व शुद्ध पायावर पुनर्घटना करण्यासाठीं संघटित होऊन पुढें येतील. सारांश शिक्षणाचें अंतिम ध्येय जें आत्मविकास त्याच्याकडे सहज जाणारा मार्ग म्हणजे कवितेचें अध्यापन करण्यांतील उपर्युक्त हेतु होय.

कवितेचें अध्यापन करण्यांत आणखी एका महत्त्वाच्या हेतूकडे लक्ष दिलें जाणें जरूर आहे. शिक्षणाचें अंतिम ध्येय जें आत्मविकास, तें साधण्याचा मुख्य मार्ग म्हणजे मातृभाषेचें पद्धतशीर अध्यापन होय. मातृभाषेच्याच द्वारें जन्मकाळापासून व्यक्तिविकासास आरंभ होतो. मातृभाषेच्या अध्यापनांत "गद्य, पद्य व लेखन" या त्रयीला अत्यंत महत्त्व आहे. गद्याच्या द्वारें विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीस चालना द्यावयाची असते, पद्याच्या द्वारें त्याच्या भावनांची शुद्धि व सात्त्विक परिपोष करावयाचा असतो, आणि लेखनद्वारें त्याच्याशीं लोकव्यवहाराची सांगड घालावयाची असते. या त्रयीपैकीं आपणांस केवळ काव्याध्यापनाचा विचार करावयाचा आहे. काव्य हें रसात्मक

असतें. विविध रसांच्या उत्कर्षानें अंतःकरण भावनांनीं खळबळून टाकलें जातें. मनुष्य हा केवळ बुद्धीवर—विचारशक्तीवर—जगूं शकत नाहीं. त्याच्या पूर्णतेस भावनांची जरुरी असते. शिक्षकाचें काव्याच्या अध्यापनांत असें धोरण असावें कीं त्यायोगानें विद्यार्थ्यांच्या भावनांना सात्त्विक वळण लावलें जाईल; व त्यांच्या भावनांची व त्याद्वारें अंतःकरणाची उंची वृद्धिंगत होईल.

मनुष्याचें मनुष्यपण त्याच्या अंतःकरणावरच मुख्यत्वें अवलंबून आहे. मानवी शृंगार, वीर, करुण, वात्सल्य इत्यादि रसांचा उठाव काव्यद्वारें कवि करीत असतो. ह्या रसांच्या द्वारें कवि, रसिकांच्या अंतःकरणांतील भावनांना स्पर्श करीत असतो. त्या भावनांना जागें करून अन्यायाविरुद्ध झगडा करणारी वीरवृत्ति, आपद्ग्रस्तांविषयीं वाटणारी आत्मीयता, मुलांविषयीं वाटणारें वात्सल्य—इत्यादि श्रेष्ठ मानवी गुणांना तो आवाहनच करीत असतो. काव्याच्या अध्यापनांत शिक्षकानें विद्यार्थ्यांचा भावनाविकास करण्याच्या हेतूकडे लक्ष देणें जरूर आहे.

राज्यशासन करणारे मुत्सद्दी व अधिकारी, आणि समाजशास्त्राचा अभ्यास करणारे पंडित, कितीही प्रयत्न करोत, पण मानवजातीची घडी योग्य भूमिकेवर बसवणें त्यांना दुर्घट आहे. समाजाला किंवा व्यक्तीला ते नियमांनीं किंवा दंडाच्या भीतीनें वळणावर आणण्याचा प्रयत्न करतील, पण ह्या बाह्य बदलानें काय होणार? व्यक्ति व समष्टि यांच्या अंतःकरणांत शुद्ध भावना, सात्त्विकता, निर्मळ आनंद व सौंदर्यबुद्धि यांचें बीज पेरून, आमूलाग्र बदल घडवून आणण्याचें खरें सामर्थ्य फक्त कवींमध्यें, त्यांच्या प्रभावी कवितेमध्यें व ती कविता शिकवणाऱ्या शिक्षकांत असतें यांत शंका नाहीं.

---

कवितेचें अध्यापन कुणीं करावें ?

मागील प्रकरणांत काव्याविषयीं व काव्याच्या अध्यापनाच्या हेतूविषयीं निश्चित जाणीव नसलेला शिक्षक, विद्यार्थ्यांच्या अपक्व मनांत काव्याविषयीं व पर्यायानें जगांतील सौंदर्याविषयीं अप्रीति व बेजबाबदारीची भावना निर्माण करण्यास कारणीभूत होतो असा निष्कर्ष आपण बघितलेला असल्यामुळें साहजिकच असा प्रश्न उत्पन्न होईल कीं, कवितेचें अध्यापन करण्यास कोण शिक्षक पात्र समजावा? त्याच्या अंगांत कवितेचा शिक्षक ठरण्यासाठीं कोणते गुण असणें आवश्यक आहे ?

कवितेचें अध्यापन करणारा शिक्षक हा स्वतः वृत्तीनें कवितेची आवड असणारा, रसिक व आनंदी स्वभावाचा पाहिजे असें प्रथमतःच आपण म्हटलें पाहिजे. साधारणतः मनुष्य कोणती गोष्ट उत्तम रीतीनें सांगू शकेल असा प्रश्न विचारला तर चटकन् उत्तर हें येईल कीं, जी गोष्ट त्याला आवडते, जी त्याच्या अनुभूतीस पात्र होते ती गोष्ट तो उत्तम रीतीनें आविष्कृत करूं शकेल. हाच दाखला आपण कवितेच्या अध्यापकाबद्दल देऊं शकतों. त्याला जें अनुभवतां येईल, जें खरें आवडेल तेंच काव्य तो चांगल्या रीतीनें शिकवून विद्यार्थ्यांच्या अनुभवास व आवडीस मान्य करूं शकेल. कवितेच्या उत्कृष्ट अध्यापनाचें गमक हें कीं, ती अभ्यासली जात असतांना, कवीला आलेले अनुभव पुन्हा जिवंत स्वरूपांत विद्यार्थ्यांना आकलन झाले पाहिजेत. कवीच्या अंतःकरणांत काव्यनिर्मितीच्या वेळीं उद्भवलेल्या

असतें. विविध रसांच्या उत्कर्षानें अंतःकरण भावनांनीं खळबळून टाकलें जातें. मनुष्य हा केवळ बुद्धीवर—विचारशक्तीवर—जगू शकत नाहीं. त्याच्या पूर्णतेस भावनांची जरुरी असते. शिक्षकाचें काव्याच्या अध्यापनांत असें धोरण असावें कीं त्यायोगानें विद्यार्थ्यांच्या भावनांना सात्त्विक वळण लावलें जाईल; व त्यांच्या भावनांची व त्याद्वारें अंतःकरणाची उंची वृद्धिंगत होईल.

मनुष्याचें मनुष्यपण त्याच्या अंतःकरणावरच मुख्यत्वें अवलंबून आहे. मानवी शृंगार, वीर, करुण, वात्सल्य इत्यादि रसांचा उठाव काव्यद्वारें कवि करीत असतो. या रसांच्या द्वारें कवि, रसिकांच्या अंतःकरणांतील भावनांना स्पर्श करीत असतो. त्या भावनांना जागें करून अन्यायाविरुद्ध झगडा करणारी वीरवृत्ति, आपद्ग्रस्तांविषयीं वाटणारी आत्मीयता, मुलांविषयीं वाटणारें वात्सल्य—इत्यादि श्रेष्ठ मानवी गुणांना तो आवाहनच करीत असतो. काव्याच्या अध्यापनांत शिक्षकानें विद्यार्थ्यांचा भावनाविकास करण्याच्या हेतूकडे लक्ष देणें जरूर आहे.

राज्यशासन करणारे मुत्सद्दी व अधिकारी, आणि समाजशास्त्राचा अभ्यास करणारे पंडित, कितीही प्रयत्न करोत, पण मानवजातीची घडी योग्य भूमिकेवर बसवणें त्यांना दुर्घट आहे. समाजाला किंवा व्यक्तीला ते नियमांनीं किंवा दंडाच्या भीतीनें वळणावर आणण्याचा प्रयत्न करतील, पण ह्या बाह्य बदलानें काय होणार? व्यक्ति व समष्टि यांच्या अंतःकरणांत शुद्ध भावना, सात्त्विकता, निर्मळ आनंद व सौंदर्यबुद्धि यांचें बीज पेरून, आमूलाग्र बदल घडवून आणण्याचें खरें सामर्थ्य फक्त कवींमध्यें, त्यांच्या प्रभावी कवितेमध्यें व ती कविता शिकवणाऱ्या शिक्षकांत असतें यांत शंका नाहीं.

## कवितेचें अध्यापन कुणीं करावें ?

मागील प्रकरणांत काव्याविषयीं व काव्याच्या अध्यापनाच्या हेतूविषयीं निश्चित जाणीव नसलेला शिक्षक, विद्यार्थ्यांच्या अपक्व मनांत काव्याविषयीं व पर्यायानें जगांतील सौंदर्याविषयीं अप्रीति व बेजबाबदारीची भावना निर्माण करण्यास कारणीभूत होतो असा निष्कर्ष आपण ग्रथितलेला असल्यामुळें साहजिकच असा प्रश्न उत्पन्न होईल कीं, कवितेचें अध्यापन करण्यास कोण शिक्षक पात्र समजावा ? त्याच्या अंगांत कवितेचा शिक्षक ठरण्यासाठीं कोणते गुण असणें आवश्यक आहे ?

कवितेचें अध्यापन करणारा शिक्षक हा स्वत: वृत्तीनें कवितेची आवड असणारा, रसिक व आनंदी स्वभावाचा पाहिजे असें प्रथमत:च आपण म्हटलें पाहिजे. साधारणत: मनुष्य कोणती गोष्ट उत्तम रीतीनें सांगूं शकेल असा प्रश्न विचारला तर चटकन् उत्तर हें येईल कीं, जी गोष्ट त्याला आवडते, जी त्याच्या अनुभूतीस पात्र होते ती गोष्ट तो उत्तम रीतीनें आविष्कृत करूं शकेल. हाच दाखला आपण कवितेच्या अध्यापकाबद्दल देऊं शकतों. त्याला जें अनुभवतां येईल, जें खरें आवडेल तेंच काव्य तो चांगल्या रीतीनें शिकवून विद्यार्थ्यांच्या अनुभवास व आवडीस मान्य करूं शकेल. कवितेच्या उत्कृष्ट अध्यापनाचें गमक हें कीं, ती अभ्यासली जात असतांना, कवीला आलेले अनुभव पुन्हा जिवंत स्वरूपांत विद्यार्थ्यांना आकलन झाले पाहिजेत. कवीच्या अंत:करणांत काव्यनिर्मितीच्या वेळीं उद्भवलेल्या

भावना व कल्पना, विद्यार्थ्यांना स्वतःच्या अंतःकरणांत पुन्हा उद्भवल्या आहेत असें वाटूं लागलें पाहिजे. हें असें "अनुभवणें" किंवा "वाटूं लागणें" म्हणजेच कवितेचा रसास्वाद घेतल्याचें निदर्शक आहे. शिक्षकाचें काव्याच्या अध्यापनांतील आद्य कर्तव्य तें हेंच होय !

पण विद्यार्थ्यांच्या मनांत ही काव्यरसानुभवाची पात्रता तेंव्हांच निर्माण होईल कीं, जेंव्हां ती प्रथम त्या शिक्षकाच्या मनांत निर्माण झालेली असेल ! जर शिक्षकालाच कविता मृतवत् वाटेल तर त्यालाच ती शिकवतांना उत्साह वाटणार नाहीं. अर्थात् तो विद्यार्थ्यांना काव्यांतील रसास्वाद चाखण्यास, कवीचा अनुभव पुनः प्रत्ययास आणून देण्यास, व त्यांच्या भावनांचा विकास करण्यास कितपत समर्थ ठरेल याची शंकाच आहे !

यासाठीं उत्तम गोष्ट ही कीं, कवितेची आवड नसणाऱ्या शिक्षकानें काव्याच्या अध्यापनास हात घालूं नये किंवा त्याला काव्याचें अध्यापन करण्याची सक्ति वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं करूं नये. तात्विक दृष्ट्या इतकें कांटेकोरपणें कडक लिहिणें सोपें असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत व शाळेच्या व्यवस्थेंत हें सोपें काम नाहीं याची जाणीव प्रस्तुत लेखकास आहे. पण याबरोबरच एक दुसरी आशादायक जाणीव प्रस्तुत लेखकास अशी आहे कीं, पूर्णतया काव्याशीं वांकडें असणारे किती लोक या शिक्षकांच्या जगांत वावरत असतील ? त्यांचें प्रमाण शेंकडा एक तरी असूं शकेल काय ? थोड्या फार प्रमाणांत काव्य व सौंदर्य यांची आवड प्रत्येक मनुष्य प्राण्याला असतेच; एखादाच अपवाद असला तर मात्र त्याची गणना "स वै मुक्तोऽथवा पशुः" या कोटींतच करावी लागेल. सामान्यतः असा अनवस्था प्रसंग कुठेंच ओढवणार नाहीं अशी आशा आपण करूं या.

एकाद्या शिक्षकांत कवितेची आवड जरी अल्प प्रमाणांत प्रारंभीं असली तरी ती प्रयत्नानें वाढणार नाहीं असें भारीच आहे? मुळांतील अंकुराचाच प्रयत्नानें व सतत नेटानें वृक्ष होतो हें कोण अमान्य करील? तेव्हां कवितेच्या अध्यापकाचें दुसरें प्रधान कर्तव्य हें कीं, कवितांचें वाचन व अध्ययन त्यानें सतत चालू ठेवलें पाहिजे. 'जो रेंगाळला तो आटोपला' हें वचन केवळ युद्धापुरतेंच नव्हे तर जीवनांतील प्रत्येक बाबतींतही सत्य मानावें लागेल. कोणताही विषय शिकवणारा शिक्षक असो, त्यानें त्या त्या विषयाचा सतत व्यासंग ठेवणें जरूर आहे. पण दुर्दैव हें कीं, व्यासंग ठेवण्याचें कार्य फारच थोड्या शिक्षकांकडून होत असतें. एकदां जी सामुग्री मिळवली असेल तिच्यावरच दिवस ढकलण्याची वृत्ति आमच्या शिक्षकवर्गांत आढळून येते. पण ही जुनी शिदोरी किती दिवस पुरणार? ह्या जुन्या शिदोरीनें तो जुना, निर्जीव बनणार नाहीं काय? ताजेपणा व सळसळणारें चैतन्य असेल तरच विद्यार्थ्यांच्या मनावर वर्चस्व राखतां येईल ही कल्पना या शिक्षकांना माहित नसल्यामुळें केवळ काव्याच्याच नव्हे तर सर्व विषयांच्या अध्यापनांत फार जुनाटपणा, बुरसटपणा, आळस व संकुचित भावना इत्यादि दोषांचा भरणा झाला आहे व त्यामुळें पर्यायानें सर्व शिक्षण कुचकामीं वाटूं लागलें आहे.

असे किती तरी काव्य शिकवणारे शिक्षक आहेत कीं, त्यांनीं त्यांच्या अभ्यासक्रमांत वाचलेल्या कवितांखेरीज इतर एकही कविता डोळसपणें वाचली नाहीं. नवनीतांतील कवितांपेक्षां निराळ्या कविता त्यांनीं जर वाचल्याच नाहींत तर नवीन कविता हे शिक्षक कितपत आस्थेनें व प्रेमानें शिकवूं शकतील? मोरोपंत-मुक्तेश्वरादि जुने कवि व लेंभे–मोगरे–महाजनी–फार तर केशवसुत हे नवे कवि हीच ज्यांची

ज्ञानमर्यादा, त्या शिक्षकांच्या अध्यापनांत केशवसुतांचे समकालीन कवि किंवा नंतरचे – तांबे, माधव ज्यूलियन, चंद्रशेखर, यशवंत, गिरीश, – यांच्या कविताविषयीं जिवंतपणा कसा दिसून येणार? रे. टिळक यांची माहिती सांगणारा शिक्षक त्यांच्या देशभक्तीची, खडतर कारागृहवासाची, केसरींतील लेखांची व न्यू. इं. स्कूलच्या स्थापनेची हकिकत जेव्हां बिनदिक्कत रीतीनें सांगतो, तेव्हां काय म्हणावें? या शिक्षकांच्या नजरेसमोर चालू युगाचें काव्य लिहिणारे कुसुमाग्रज, दा. अ. कारे किंवा बोरकर असले कवि कधीं तरी येण्याचा संभव आहे काय? एकमेव पूर्वसामुग्रीवर भिस्त ठेवून काव्य शिकवण्यास तयार झालेले हे शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनांत ताजेपणा व उत्साह कितपत उत्पन्न करूं शकणार?—सारांश काय कीं, कवितेच्या शिक्षकानें काव्याचें प्रेम सतत जिवंत ठेवण्यासाठीं काव्याचें वाचन सारखें ठेवलें पाहिजे. निरनिराळ्या कविता, त्यांच्या निरनिराळ्या नवीन चाली व वृत्तें, आणि त्या कवितांतून दिसून येणारीं नव्या जगाचीं क्षितिजें—हीं वाचून जर शिक्षकाचें मन प्रसन्न झालें, त्याच्या भावना उत्तेजित झाल्या, त्या कवींच्या मनोभूमिकेशीं तो समरस झाला, तरच ती कविता तो विद्यार्थ्यांपुढें जिवंत स्वरूपांत उभी करूं शकेल. काव्याच्या वाचनाची कसोटी म्हणजे कवीच्या अनुभवाचा पुन्हा आस्वाद घेतां येणें ही आहे. शिक्षकानें विद्यार्थ्यांना हा अनुभव घेण्यास समर्थ केलें पाहिजे.

पुष्कळ शिक्षकांना अद्याप असें वाटतें कीं, विद्यार्थ्यांना कविता वाचतां आली, तिच्यांतील शब्दांचा अर्थ कळला, अलंकार व समास उलगडून सांगतां आले, फार तर तिच्यांतील मध्यवर्ती कल्पनेचा सारांश अथवा कवीचें चरित्र सांगतां आलें म्हणजे पुष्कळ झालें. कविता शिकवायची म्हणजे निराळें तें काय आहे? पण या वेडगळ

समजुतीमुळेंच कवितेच्या तासाला, ते काव्याखेरीज इतर सर्व कांहीं शिकवत असतात. काव्य म्हणजे भाषेच्या अभ्यासाशिवाय कांहीं तरी निराळेंच आहे याचा विचारही त्यांना सुचत नाहीं. आणि याचें प्रमुख कारण हें कीं, काव्याबद्दलची जिवंत आस्था, श्रेष्ठ अभिरुचि व रसिकता सतत तेवत ठेवण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न त्यांनीं आपल्या आयुष्यांत कधींही केलेला नसतो.

पदवीधर होऊन ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षणशास्त्र शिकणाऱ्या होत-करू शिक्षकांच्या बाबतींत तर फारच निराशाजनक अनुभव येतो. दरवर्षीं मराठी हा अध्यापनाचा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते हें दृश्य पाहून वर्षारंभीं मनाला एक प्रकारें समाधान वाटत असतें. परंतु पुढें पाठ घेतांना व अधिक परिचय झाल्यावर मात्र या विद्यार्थ्यांबद्दल कींव वाटूं लागते. यांपैकीं निम्म्याहून अधिक विद्यार्थी मराठी विषय घेतात याचें कारण मातृभाषेबद्दलचें प्रेम अथवा मराठीची जिवंत आवड हें नसून, इतर विषय उत्तीर्ण होण्यास कठाणी असतात; मराठींत सहज कांहीं तरी शिकवून उत्तीर्ण होतां येईल या कल्पनेनें होय! चार चार वर्षें कॉलेजांत राहूनही मराठीचा मुळींच व्यासंग नसलेले अथवा आपद्धर्म म्हणून बी. टी. साठीं मराठी घेणारे शिक्षक काव्याचें अध्यापन खरोखरच तळमळीनें करणार आहेत काय? मराठी वाङ्मयांत येत असलेले मुक्तछंदादि प्रकार यांना मुळींच माहित नसतात; पुरोगामी वाङ्मय, साहित्य-संमेलनांतील ठराव व चर्चा, शुद्धलेखनांतील नवमतवाद, भाषाशुद्धीची चळवळ इत्यादि शब्दप्रयोगसुद्धां यांच्या कानावर आले असल्याचें दिसत नाहीं—फार काय शुद्ध मराठी लिहिणेंसुद्धां ज्यांना जमत नाहीं किंवा तें जम-ण्याची आस्था जे बाळगीत नाहींत त्यांच्या हातीं उद्यां निरनिराळ्या शाळेंतून मातृभाषा शिकवण्यासाठीं दिली जाणार आहे याची

कल्पनासुद्धां असह्य वाटते. आमच्या मातृभाषेची जी हेळसांड होत आहे त्याला कारण परकें सरकार, बेजबाबदार विद्यापीठ, कर्तव्य-भ्रष्ट शालाधिकारी आहेतच पण आमच्या शाळांतून मराठी शिकवणारे उपर्युक्त दर्जाचे शिक्षकही आहेत हें नाकबूल करून चालणार नाहीं.

ज्यांच्या हातीं विद्यार्थ्यांचीं मनें तयार करण्याचें श्रेष्ठ व पवित्र कार्य आलें आहे त्या शिक्षकांनीं याबद्दल फारच जागरूक असलें पाहिजे. विशेषत: विद्यार्थ्यांच्या मनांत जगांतील विविध रमणीय वस्तूंविषयीं प्रेम व अभिरुचि निर्माण करण्याचें व त्यांच्या भावना हलविण्याचें सामर्थ्य कवितेच्या अध्यापकांत असल्यामुळें त्यानें तर याबद्दल फारच दक्ष असावयास पाहिजे. सामान्यत: विद्यार्थी अनुकरणप्रिय असतात; व शाळेच्या जगांत शिक्षक हाच त्यांचा पुढारी मानला जातो. शिक्षकाची अभिरुचि जर श्रेष्ठ असेल, काव्याची जिवंत आस्था बाळगून सतत निरनिराळ्या कविता वाचण्याचा जर त्यास छंद जडला असेल, काव्याच्या रमणीयतेनें त्यास जीवनांतील सौंदर्यस्थानें हुडकण्याची दृष्टि आलेली असेल, तर त्यानें हेतुत: प्रयत्न केला किंवा न केला तरी विद्यार्थ्यांच्या मनांत काव्याबद्दल श्रेष्ठ अभिरुचि व सौंदर्यग्रहणशक्ति निर्माण झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

दुय्यम शाळेंतच केवळ नव्हे तर बालपणापासूनही मुलांचा स्वभाव अनुकरणप्रिय असतो हें शिक्षकानें लक्षांत ठेवणें जरूर आहे. जगांतील पुष्कळसें शिक्षण अनुकरणाच्या नैसर्गिक प्रवृत्तीनें होत असतें. आणि जी व्यक्ति आपणासमोर असेल तिचें अनुकरण करणें हा बालमनाचा धर्मच आहे. *साधारणत: दहा-बारा वर्षांचा मुलगा झाला कीं त्याच्यामध्यें विभूतिपूजनाची इच्छा होते. त्याच्या समोर जी व्यक्ति

* Ross : Groundwork of Psychology.

मोठी असेल तिचें पूजन करावें, तिच्यासारखें व्हावें असें त्यास वाटूं लागतें. अशा वेळीं शिक्षक हीच थोर विभूति त्यास वाटते. शिक्षकांचें भाषण व आचरण—फार काय त्यांचा पोशाख व लकबी—यांचेंसुद्धां अनुकरण केलें जातें. विद्यार्थ्यांचें " अनुकरण व विभूतिपूजन " होत आहे याची जाणीव शिक्षकानें बाळगली तर तो अधिक जबाबदार होईल यांत शंका नाहीं.

काव्याच्या अंगणापाशीं उत्सुकतेनें उभ्या रहाणाऱ्या विद्यार्थ्यांना, हात धरून आंत नेण्याचें कार्य कवितेच्या शिक्षकाचें आहे. सामान्यतः या बाबतींत विद्यार्थीवर्ग हा शिक्षकावरच अवलंबून असतो. काव्याबद्दल तिरस्कार, नावड किंवा सौंदर्यवस्तुविषयीं औदासीन्य निर्माण करावयाचें कीं काव्याबद्दल प्रेम निर्माण करून विद्यार्थ्यांच्या जीवनाचा फुलोरा रमणीय करावयाचा हें प्रत्येक शिक्षकानें जाणलें पाहिजे. ही जबाबदारीची भावना आली कीं या प्रकरणांत शिक्षकाच्या अंगीं कोणते गुण असावेत म्हणून सांगितलेले सर्व गुण प्रत्येक काव्याचा शिक्षक स्वतःच्या अंगीं आणण्याचा प्रयत्न करील !

---

## प्रकरण ३ रें : : : कवितेची निवड

काव्याचें अध्यापन कोणत्या उद्दिष्टानें करावें आणि तें अध्यापन करणाऱ्या शिक्षकाच्या अंगीं कोणते गुण असावेत यांचा विचार आपण केलाच आहे. आतां यापुढें असा प्रश्न निर्माण होतो कीं, काव्याचें योग्य उद्दिष्ट मनांत बाळगणाऱ्या रसिक शिक्षकानें, कविता कोणत्या

धोरणानें निवडून ती शिकवावी? कविता निवडतांना पुष्कळसे शिक्षक गोंधळूनच जातात. आपल्या दुय्यम शाळेंत जीं पाठ्यपुस्तकें नियुक्त केलेलीं असतात, किंवा गद्य वा पद्य उताऱ्यांचे जे संग्रह लावलेले असतात, त्यांपैकींच कांहीं कविता शिक्षकानें निवडून त्या वर्षभर शिकवावयाच्या असतात असा एक सर्वसामान्य संकेत दिसून येतो.

वास्तविक वर्षभराच्या मानानें आणि कवितेच्या विविध, रमणीय संख्येच्या मानानें, एकाद्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांना फक्त दहा-बारा कविताच शिकवायच्या ही किती अल्पसंतुष्ट पद्धत आहे बरें? ज्या काव्याचा व सौंदर्ययुक्त जगाच्या अफाट पसाऱ्याचा आस्वाद विद्यार्थ्यांनीं सदोदित घ्यावयाचा अशी अपेक्षा आपण करीत असावें, त्याच विद्यार्थ्यांची कक्षा केवळ दहा-बारा कवितांनीं संकुचित करावी व त्यांच्या सौंदर्यग्रहणशक्तीस वाव न द्यावा ही व्यावहारिक पद्धत अत्यंत अन्यायपूर्ण नाहीं काय?— पण आहे हें असें आहे!

चालू पाठ्यपुस्तकें या दृष्टीनें फारच निराशाजनक वाटतात; त्यांच्यापेक्षां "वासंति, कविपरंपरा, महाराष्ट्र- शारदा, महाराष्ट्र—रसवंति, रसतरंगिणी, काव्यगंगा" इत्यादि काव्यसंग्रह थोडेफार सदोष असूनहि त्यांच्यांतील कवितांच्या विविधतेनें व व्यापकतेनें ते संग्रह उपयुक्त ठरण्याचा संभव आहे.

या संग्रहांतून जेव्हां शिक्षकाला कविता निवडण्याचा प्रसंग येतो तेव्हां त्याच्या मनासमोर त्या कविता अथवा वर्गांतील बालकांचीं मनें किंवा स्वतःच्या आवडी उभ्या राहात नाहींत ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. कवितेची निवड तो नेमक्या चुकीच्या दृष्टीनेंच करीत असतो. आपल्याला विद्यार्थ्यांना असंख्य प्रश्न विचारण्याची संधि मिळेल अशी एकादी कविता तो निवडण्याचा प्रयत्न करील किंवा जर एकाद्या कवितेनें विद्यार्थ्यांच्या बुद्धीचें मापन करणें शक्य

होईल अथवा त्यांतील कूट वा गूढ भागावर आपणांस वक्तृत्व गाज-वतां येईल, अशी एकादी कठीण कविता तो निवडून काढील किंवा ज्या कवितेंत कांहीं नीतिबोध आढळेल तिचीच तो निवड करील— जणूं कांहीं प्रश्नोत्तरांना व विवेचनाला किंवा नीतिबोधाला वाव देणारी कविताच फक्त चांगली असेंच त्याला वाटत असावें.

परंतु ही निवड करीत असतांना, काव्याचें कार्य बौद्धिक चांचणी घेण्याचें नाहीं अथवा नीतीचा प्रसार करण्याचें नाहीं, या मूलभूत तत्त्वांचा त्याला विसर पडलेला असतो. आणि यामुळें नेमक्या नको असलेल्या निकृष्ट दर्जाच्याच कवितांची निवड होऊन त्या शिक-वल्या जातात व अखेर परिणाम हा होतो कीं, काव्य म्हणजे आनं-दित होण्याचा, भावनाविकास होण्याचा, अनुभवण्याचा एक सुंदर विषय आहे असा योग्य ग्रह विद्यार्थ्यांचा होण्याऐवजीं काव्य म्हणजे अभ्यासण्याचा एक कठिण विषय आहे असा चुकीचा ग्रह विद्यार्थी करून घेतात व आपोआपच काव्याविषयीं अनास्था व अप्रीति बळावत जाऊन पर्यायानें जीवनांतील रम्य वस्तूंच्या सौंदर्यसुखाविषयीं ते उदासीन बनतात व त्यांची भावनात्मकता कमी होते.

वास्तविक कवितेची निवड करतांना शिक्षकानें आपल्या स्वतःच्या आवडीस प्राधान्य दिलें पाहिजे. “ ही कविता मला आवडते, मी ती विद्यार्थ्यांना शिकवणार.” असा आत्मविश्वास बाळगणारा काव्य-प्रेमी शिक्षक ती कविता जरी आकलनास अवघड असली तरी फारच चांगल्या रीतीनें शिकवूं शकेल. काव्यविषयाशीं तन्मय झालेल्या शिक्षकाशीं अल्पावधींतच विद्यार्थीहि एकरूप होतात व कवितेचा आस्वाद घेऊं शकतात. त्यांच्या मुद्रेवर विलसणारी प्रसन्नता, त्यांच्या नजरेंत दिसून येणारी चमक म्हणजेच कविता पूर्णपणें समजली

याचें प्रतीक होय. इंग्रजींत "Appreciation is not taught but it is caught" ( रसास्वाद आपणहून घेतला जातो, दुसऱ्यानें पढवून नव्हे. ) असें वारंवार म्हटलें जातें त्याचें रहस्य हेंच होय !

यासाठीं प्रत्येक शिक्षकानें आपणाला आवडणाऱ्या कवितांचा स्वतःच संग्रह केला पाहिजे; आणि नंतर स्वतःच्या उदाहरणानें विद्यार्थ्यांनाही आवडत्या कवितांचा संग्रह करीत जाण्याची स्फूर्ति निर्माण करून दिली पाहिजे. प्रत्येक काव्यशिक्षकानें स्वतःच्या मनाशीं असा प्रश्न विचारावा कीं, " तुला आवडणाऱ्या कवितांचा संग्रह शाळा अथवा कॉलेजपासून तूं केला आहेस काय? केला नसलास तर करायला आरंभ केव्हां करणार? ज्ञानेश्वर—नामदेव इत्यादि संत कवी सोडले, किंवा वामन—रघुनाथ, मोरोपंत हे पंडित कवी सोडले, तरी चालू युगाच्या कविता लिहिणाऱ्या केशवसुतांपासून काणेकर—कुसुमाग्रजांपर्यंतच्या विविध कवींच्या काव्यांचे संग्रह तयार झालेले आहेत, ते वाचून त्यांपैकीं तुला आवडणाऱ्या कवितांचा संग्रह केलास तर सहज त्यांत शंभर-दीडशें सुद्धां कवितांचा समावेश होईल. या तुझ्या दृष्टीनें श्रेष्ठ वाटणाऱ्या विविध कविता पुनः पुनः वाचून, त्यांतील कांहीं कविता तूं एकाद्या इयत्तेला सहज शिकवूं शकशील."

शिक्षकानें स्वतःच्या आवडीनुसार निवडलेल्या कवितेंत थोडासा ममत्वाचा किंवा जिव्हाळ्याचा अंश असल्यामुळें, त्याच्या अध्यापनांत जिवंतपणा येईल यांत शंका नाहीं. एकादी कविता शिकवीत असतांना, त्यांतील महत्त्वाच्या ओळी व कल्पना तो फार तन्मयतेनें विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून देईल व विद्यार्थ्यांच्या लक्षांतही त्या ओळी किंवा कल्पना कायमच्या स्थान मिळवतील.

मॅट्रिकसारख्या सर्वोच्च शालेय परीक्षेंत काय किंवा कॉलेजमधील

विविध वर्गांच्या परीक्षेंत काय, उत्तर तपासतांना दुर्दैवानें एकच अनुभव आलेला आहे. जेव्हां एकाद्या कवीविषयीं अथवा त्याच्या एकाद्या कवितेविषयीं मत विचारलें जातें तेव्हां अनेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडी-निवडीची स्पष्ट जाणीव उत्तरपत्रिकेंतून देतां येत नाहीं. त्या कवीविषयीं किंवा त्या कवितेविषयीं ज्या टीकाकारांचे लेख त्यांनीं वाचले असतील त्या टीका मात्र तोंडपाठ झाल्यामुळें, ते उत्तरपत्रिकेंत लिहीत असतात. स्वतःला आवडणाऱ्या ओळी किंवा कल्पना लिहिल्या आहेत व त्याद्वारें स्वमत प्रकट केलें आहे असा फारच क्वचित् अनुभव येतो. असा हा दुःखद अनुभव येण्याचें कारण विद्यार्थ्यांच्या आवडींना वावच पुरवला जात नाहीं. त्यांना कवितांचा संग्रह करावयाचा, त्यांचें वारंवार वाचन करावयाचें ही बाजूच कोणीं शिकवली नाहीं. 'कवितेसाठीं कविता' या समीकरणापेक्षां 'परीक्षेकरितां कविता' हेंच समीकरण शाळा-कॉलेजच्या आवारांत वारंवार आढळून येतें. प्रत्यक्ष कविता दोन अथवा तीन वेळां वाचली जात आहे, त्यांतील नादमधुर ओळी गुणगुणल्या जात आहेत, त्यांतील प्रभावी भावनांनीं अंतःकरण हेलकावे खात आहे किंवा त्यांतील कल्पनांच्या स्वैर विलासांनीं मन गुंग झालें आहे—असें दृश्य कवितेच्या तासाला कोणत्या शाळा-कॉलेजच्या वर्गांत दिसून येतें? आमच्या विद्यार्थ्यांचें सोडून द्या, पण पुष्कळ अध्यापक-प्राध्यापकांनासुद्धां 'परीक्षेसाठीं कविता' हें समीकरण चुकीचें आहे असें वाटत असल्याचें दिसून येत नाहीं. केशवसुतांची "नैऋत्येकडील वारा" ही रमणीय कविता शिकवतांना, त्यांच्या विशाल कल्पनेस वाव देणाऱ्या ओळी वर्गांत कोणत्या प्राध्यापकानें निःसंकोच वृत्तीनें म्हटल्या आहेत? उलट पक्षीं या कवितेवर निरनिराळ्या टीकाकारांचीं मतें टिपून देतांना किंवा शेले कवीच्या Ode to the

West Wind कवितेशीं तुलना करतांना मात्र त्यांना स्फुरण चढत असतें यांत शंका नाहीं. 'परीक्षेंतील उत्तर' ह्या वाक्प्रयोगानेंच आमच्या शिक्षक-विद्यार्थ्यांच्यामधील खरी काव्याची अभिरुचि अनिष्ट स्वरूपाची बनवली आहे.

सारांश काय कीं, शिक्षकानें या परीक्षेच्यापुढें पसरलेल्या अफाट जीवनाकडे दृष्टिक्षेप केला पाहिजे व त्या जीवनाला आनंदानें वारंवार बहर आणणाऱ्या, वारंवार वाचाव्याशा वाटणाऱ्या आपल्या प्रीतींतील आवडत्या कवितांचा संग्रह करून, त्यांपैकींच कांहीं निवडल्या पाहिजेत. आतां ही निवड करतांना थोडीशी जागरूकता असावयास पाहिजे यांत शंका नाहीं.

कवितेचें अध्यापन करणाऱ्या शिक्षकाचें प्रधान कार्य विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न करणें हें नसून कवीला जो अनुभव येतो तो त्यांना पुनः प्रत्ययास आणून देणें व त्याद्वारें त्यांच्या अंतःकरणाची भावनात्मक उंची वाढविणें हें आहे.* तेव्हां कवितेची निवड करतांना शिक्षकानें थोडासा तारतम्यभावानें असा विचार केला पाहिजे कीं, कवीला एका विशिष्ट अवस्थेंत किंवा वयोमर्यादेंत जो अनुभव आला, त्याचा काव्यद्वारें अनुभव घेण्याची पात्रता किंवा वयोमर्यादा विद्यार्थ्यांत

---

* याविषयीं पुढील विवेचन पहा.

" The poetry lesson should not attempt in any direct manner to increase the vocabulary, or enlarge the reader's stock of general knowledge or his power of expression...The aim is to afford each individual in the class a keen and sincere pleasure in a new experience, and an enlargement of his powers of sympathetic imagination; to enable the poem to stimulate emotions and imagination for which the poem is itself the adequate expression."

" Teaching Poetry," Introduction (Compiled By The Society For Teachers. )

आली आहे कीं नाहीं? अनुभवण्याची पात्रता जरी थोडी कमी असेल तरी ती कविता शिकवण्यास हरकत नाहीं. उलट ती पात्रता वरच्या थराला नेण्यास त्या कवितेच्या अध्यापनांत तो शिक्षक मदतच करील यांत शंका नाहीं—किंबहुना अशी पात्रता वाढवणें हें कवितेच्या शिक्षकाच्या श्रेष्ठत्वाचें गमकच मानावें लागेल.

परंतु केवळ स्वतःच्या पंचविशींत प्रेमकाव्यें आवडलीं म्हणून त्यांचा संग्रह करणाऱ्या शिक्षकानें, त्यांपैकीं एक केवळ पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेंत शिकविण्याचा प्रयत्न केला तर तें निखालस हास्यास्पद ठरेल. कविवर्य तांबे यांची "मधुघटाचि रिकामे पडति घरीं" ही कविता इयत्ता दुसरीसाठीं ट्रेनिंग कॉलेजचा विद्यार्थी निवडतो किंवा यशवंत यांची "जगरहाटी" ही कविता इयत्ता पहिलीसाठीं निवडण्यांत येते, तेव्हां तारतम्यभावाबद्दल सखेद हंसूं आल्याशिवाय रहात नाहीं. तरुण-तरुणींच्या शृंगाराचा अथवा समाजजीवनांतील विषमतेचा यत्किंचितही अनुभव नसलेल्या दहा वर्षांच्या मुलाला किंवा मुलीला त्या त्या विषयावर अगदीं तळमळून लिहिलेल्या कवितांचा रसास्वाद घेणें कितपत शक्य आहे? हा विवेक प्रत्येक शिक्षकानें कवितेची निवड करतांना बाळगणें अपरिहार्य आहे. या वेळीं कांहीं शिक्षक असा प्रश्न विचारूं शकतील कीं, जगांतील सर्व गोष्टींचा अनुभव विद्यार्थि-जीवनांत येणें कसें शक्य आहे? समाजाच्या जीवनांतील विषमतेचे चटके विद्यार्थि-जीवनांत मिळण्याची कितपत व किती विद्यार्थ्यांना शक्यता आहे? जर हे चटके बसले नाहींत तर शिक्षकानें 'जगरहाटी', 'गुन्हेगार', 'मातृभूमीस वंदन', 'बळी', इत्यादि आवडत्या कविता शिकविण्याचें बंद करावें काय?—असा प्रश्न विचारणें अगदीं योग्य ठरेल. पण त्याला उत्तर हें आहे कीं, वाढत्या वयाबरोबर विद्यार्थ्यांच्या

ज्ञानांत वाचनानें भर पडते, त्यांच्या शाळेबाहेरच्या भटकण्यांत निरनिराळे अनुभव येतात, विविध दृश्यें दिसून येतात—यांचा विचार कविता निवडतांना शिक्षकानें केला म्हणजे प्रत्यक्ष विषमतेचा चटका बसल्याचाच अनुभव येणें आवश्यक ठरणार नाहीं.

या बाबतींत कवि यशवंत यांनीं "महाराष्ट्र कविपरंपरा" या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत फारच स्पष्ट खुलासा केला आहे. ते म्हणतात,—"कवितेच्या संभवाला निमित्त झालेला अनुभव जशाच्या तसा तंतोतंत वाचकाला आला असेल तर तो वाचक त्या कवितेशीं अगदीं समरस होऊन जाईल. पण अनुभव अगदीं तंतोतंत नसला तरी स्थलमानानें त्या स्वरूपाचा वा जातीचा अनुभव आला असेल तरीही त्याला थोडीशी कल्पकतेची जोड देऊन वाचक त्या कवितेंतील माधुरी चाखूं शकेल."

यानंतर कवितेची निवड करतांना आणखीही कांहीं मुद्यांकडे शिक्षकाला लक्ष देणें जरूर आहे. कविता सर्व एकाच विषयाचें वर्णन करीत असलेल्या निवडण्यापेक्षां, निरनिराळ्या विषयांवर लिहिलेल्या कविता निवडणें जरूर आहे. विविधता असणें रंजकतेच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. उदाहरणार्थ, इयत्ता दुसरीसाठीं कविता निवडतांना जर केवळ सृष्टिवर्णनपरच कविता निवडल्या तर त्यांत फारसा आनंद वाटणार नाहीं. ( सृष्टीचेंच सौंदर्य विविध कवी कसें वर्णन करतात हें पहाणें योग्य, पण तें वरच्या वर्गांत ठरेल ) त्यापेक्षां कवितांची निवड करतांना कांहीं सृष्टीच्या सौंदर्याच्या वर्णनपर, कांहीं ऐतिहासिक प्रसंगवर्णनपर, कांहीं अगदीं जिव्हाळ्याच्या व्यक्तींबद्दल किंवा वस्तूंबद्दल अशा तऱ्हेच्या कविता निवडून या अफाट जगांतील विविध दालनांचें सौंदर्य विद्यार्थ्यांच्या अनुभवास आणून देणें अगत्याचें ठरेल.

विविधता ही केवळ काव्यविषयापुरतीच मर्यादित समजूं नये. एकाच कवीपेक्षां निरनिराळे कवी निवडावेत. एकाच चालीपेक्षां निरनिराळ्या चालींच्या कविता वाचल्या कीं मुलांच्या मनांतील निसर्गतःच असलेली नादमधुरतेची आवड विकसित होईल व तिच्यामुळेंही कवितेची आवड वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

मराठी कवितेची निवड करीत असतांना एका वादग्रस्त मुद्याचा आपण विचार केला पाहिजे; आणि तो मुद्दा म्हणजे जुन्या कवितेची निवड करावी किंवा नाहीं, हा होय! जुन्या कवितेपेक्षां आधुनिक कविता मुलांना फार आवडते या कारणासाठीं जुनी कविता मुळींच शिकविण्यासाठीं घेऊं नये असें आग्रहपूर्वक मत सांगणारा एक पक्ष आहे याची जाणीव प्रस्तुत लेखकास आहे. जुना कविता ही साधारणतः देव, धर्म या विषयांना वाहिलेली आहे. विषयाची विविधता त्यांत आढळणार नाहीं असा त्यांचा एक आक्षेप आहे, तर संत कवींच्या भाषेंतील जुनेपणा व पंडितकवींच्या भाषेंतील संस्कृतप्राचुर्यामुळें आलेली क्लिष्टता, विद्यार्थ्यांचें काव्यप्रेम नाहींसें करील असा त्यांचा दुसरा आक्षेप आहे. याशिवाय ठराविक अभंग, ओवी, आर्यावृत्तांच्या चाकोरींतून अडकलेली ही कविता रंजकही ठरणार नाहीं असा तिसरा आक्षेप आहे. जर आम्हांला विद्यार्थ्यांना काव्याच्या द्वारें तत्त्वचिकित्सा किंवा भाषेचा अभ्यास शिकवायचा नाहीं, केवळ त्यांना सौंदर्यप्राप्तीद्वारें आनंदितच करावयाचें आहे, तर जुनी कविता निवडायची कशाला अशी त्यांची तात्त्विक भूमिका आहे—कदाचित् जुनें काव्य शिकवण्यास त्यांनाच अवघड वाटत असावें अशीही व्यावहारिक बाजू या तात्त्विक भूमिकेस आंतल्या बाजूनें चिकटली असण्याचा संभव आहे.

जुन्या कवितेची मोठ्या प्रमाणांत निवड करावी असें आग्रहपूर्वक

प्रतिपादन करणारा एक टीकाकारांचा वर्ग आपल्या अध्यापनाच्या क्षेत्रांत आहे. नवीन कवितेंत भारदस्तपणा नाहीं असेंच उलट ते सांगतात. जुनी कविता विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठीं निवडावी याचें प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्राची अस्सल संस्कृति या जुन्या कवितेंत आहे व तिचें ज्ञान नवीन पिढीला झालें पाहिजे हें होय! महाराष्ट्रांतील वारकरी पंथ, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग, पौराणिक आख्यानें, देव, धर्म, समाजव्यवहार यांची परंपरा व ओजस्वी भाषा यांचा परिचय लहान वयापासून झाला पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. जुन्या कवितेंतही रम्यत्व आहे याची ओळख जुनी कविता अभ्यासिल्याशिवाय होणार नाहीं असें मत ते सहज पुढें करूं शकतात.

जुन्या कवितेच्या निवडीबद्दल दोन्ही बाजूंनीं होत असलेली ही चर्चा पाहून आमच्या मराठीच्या पाठ्यपुस्तककारांनीं व काव्यसंग्रहकारांनीं नव्या काव्याप्रमाणेंच जुन्या काव्याचीही निवड करून दोन्ही पक्षांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. असा हा प्रयत्न व्यावहारिकता दर्शवण्यास समर्थ असला, तरी काव्यनिवडीबद्दल कांटेकोरपणें तत्त्वचिकित्सा करूं लागलों कीं तो अयशस्वी झाला आहे असेंच म्हणावें लागेल.

जुनी कविता निवडूं नये असें आमचें मत नाहीं. जें काव्य विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तीस पेलणारें असेल, त्यांच्या भावना हलविणारें असेल, त्यांच्या सौंदर्यग्रहणशक्तीस चालना देण्याइतकें रमणीय असेल, तें काव्य " नवें–जुनें " असा भेद न करतां विद्यार्थ्यांना शिकवावें असेच आमचें आग्रहपूर्वक मत आहे. पण प्रत्यक्ष होतें असें कीं, जुन्यासाठीं जुनें ही भूमिका घेऊन जेव्हां इंग्रजी पहिल्या–दुसऱ्या इयत्तेस मोरोपंतांच्या केका, वामनाचे श्लोक, ज्ञाने-

श्वरींतील उतारे निवडून शिकवण्यांत येतात तेव्हां विद्यार्थ्यांना त्यांचा आस्वाद घेण्यास समर्थ करण्यापेक्षां, अपरिचित शब्दांचा अभ्यास करावयास लावण्याचा हा प्रयत्न आहे असें दुःखानें म्हणावें लागतें.

जुनें काव्य जरूर शिकवा पण तें कोणत्या इयत्तेस याचा विचार प्रथम शिक्षकानें केला पाहिजे. इंग्रजी चवथ्या इयत्तेपासून संस्कृत भाषेच्या अध्ययनास प्रारंभ होतो. समास, संधि यांचा विचार होऊं लागतो. मराठी व्याकरणांतूनही या इयत्तेपर्यंत विभक्तिविचार झालेला असतो. विद्यार्थ्यांची वयोमर्यादा चवदापर्यंत आलेली असते, ग्रहण-शक्ति वृद्धिंगत झालेली असते, भारत—भागवत—रामायण इत्यादि जुन्या ग्रंथांतील गोष्टी परिचित झालेल्या असतात. अशा वेळीं ज्ञानेश्वरींतील "सत्य, दया, भाषा" विषयक रसाळ उतारे, नामदेव—तुकारामाचे अभंग, मोरोपंताच्या केका किंवा कर्णपर्वांतील एकादा सोपा अध्याय, वामनाचें चिमुकलें आख्यान घेतलें तर त्याबद्दल कोणी हरकत घेणार नाहीं. पण ही दृष्टि कवितेची निवड करतांना शिक्षकानें ठेवली पाहिजे. हल्लींच्या शिक्षणांत 'लॅटिन' वरून 'जॉन' कडे दृष्टि वळली पाहिजे याचा अर्थ हाच आहे !

---

## प्रकरण ४ थें : कवितेच्या अध्यापनांतील प्रस्तावना

शिक्षकानें कवितेची निवड केल्यावर जो महत्त्वाचा प्रश्न त्याच्या-पुढें उभा रहातो तो म्हणजे कवितेची प्रस्तावना कशी करावयाची? आणि या प्रश्नानें उडविलेल्या अनिश्चित मनःस्थितींतच तो वर्गांत शिरून प्रारंभीं चार-पांच मिनिटें कांहीं तरी प्रश्न विचारतो किंवा

प्रास्ताविक भाषण करीत असतो. ट्रेनिंग कॉलेजमधील विद्यार्थी जेव्हां कवितेचा पाठ घेतात तेव्हां प्रस्तावनेचा गोंधळ उडविल्याचीं किती तरी उदाहरणें दिसून येतात.

ट्रेनिंग कॉलेजमध्यें अभ्यासणाऱ्या किंवा शिक्षणशास्त्राचीं पुस्तकें घरीं वाचणाऱ्या शिक्षकाला पाठ घेण्यांतील हर्बर्टनें सांगितलेल्या ज्या औपचारिक पायऱ्या (Formal Steps) आहेत त्यांचें महत्त्व फार वाटायला लागतें. पाठ घेण्यांतील या क्रमांचा त्यावर इतका पगडा बसलेला असतो कीं, एकादा क्रम सोयीसाठीं कमी झाला कीं सर्व पाठ कुचकामी व्हावयाचा असा विधिलिखित सिद्धान्त त्यास वाटू लागतो. आणि या अतिरिक्त कल्पनेनें प्रत्येक पाठास प्रस्तावना, हेतुकथन, विषयप्रतिपादन, सिंहावलोकन व उपयोजन आणि वेळेनुसार गृहपाठ असलाच पाहिजे अशी तो खबरदारी घेतो. इंग्रजी, गणित, इतिहास, भूगोल, सायन्स इ. विषयांच्याप्रमाणें मराठी विषयाच्या अध्यापनांतही या तंत्राचा समावेश केला पाहिजे ही जाणीव ठेवल्यामुळें गद्य उतारा असो, निबंधलेखन असो, किंवा एकादी सरस कविता शिकवायची असो, आपण कशी प्रस्तावना केली म्हणजे विद्यार्थी चटकन् हात वर करून आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास उत्सुक रहातील याचा तो गंभीरपणें विचार करीत असतो.

या प्रस्तावनेला फाजील महत्त्व देण्यामुळें, मूळ काव्याचा अभ्यास अर्धवट झाल्याचीं उदाहरणें सहजच देतां येतील. या वेळीं 'मिया मूठभर, दाढी हातभर' या उक्तीची सत्यता पटते. ट्रेनिंग कॉलेजमधील एका विद्यार्थिनीची हकिकतच पहा—इंग्रजी दुसऱ्या इयत्तेंत माधव ज्यूलियन यांची "दूरस्थ मातेस" ही भावपूर्ण कविता शिकवायची होती.* प्रस्तावना हवी असा आग्रह; त्यामुळें शिक्षिकेनें

* अरुणवाचन माला भाग २ रा.

वर्गांतील किती मुली आईला सोडून येथें रहातात अशी पृच्छा केली. सुदैवानें तीन–चार मुली वसतिगृहांत रहात होत्या. मग त्यांना आईची आठवण केव्हां येते? आठवण झाल्यावर त्या काय करतात? वसतिगृहांतून पत्रें केव्हां धाडतात? वसतिगृहांत कोणते अनुभव येतात? इत्यादि प्रश्न विचारत असतांनाच वसतिगृहांत रहाणें इष्ट कीं अनिष्ट या चर्चेस आरंभ झाला. पाठाला वेळ पस्तीस मिनिटें; त्यांपैकीं वीस मिनिटें अशीं गेल्यावर बाईंनीं म्हटलें, "चला, आतां पुस्तकें उघडा—" मुलींनीं विचारिलें, "बाई, 'इंदूचें पत्र' हा धडा घेणार काय?"

तात्पर्य! पण तात्पर्य लिहिण्याची जरूर आहे काय? इंग्रजी चवथी इयत्तेचा वर्ग: पुण्यांतील शाळा: शिक्षकांना 'शनवारवाडा' ही कवि गिरीश यांची कविता घ्यावयाची होती. प्रस्तावनेंत सर्व विद्यार्थ्यांनीं भाग घेतल्यास ती छान ठरेल अशी कल्पना शिक्षकाची! वर्गांत शिरल्यावर शिक्षकानें गंभीर आवाजांत प्रश्न केला—"मुलांनो, तुम्हांला इंग्रजी कोण शिकवतात?" उत्तर—"वझे सर". पुन्हा प्रश्न; "वझे सर कुठें रहातात?" उत्तर—"शनवारवाड्यापाशीं!" "ठीक आहे. आज आपण त्या शनवारवाड्याविषयींच कविता वाचूं या."

मॅट्रिकचा वर्ग: मराठीचा तास चालू होता. गोविंदाग्रज यांची "चिमुकलींच बाळा" ही कविता घ्यावयाची होती. शिक्षकांना वाटलें कीं, कविचरित्र विचारून प्रारंभ करूं या; "गडकऱ्यांविषयीं तुम्हांला काय माहिती आहे?" प्रश्न विचारला जातो तोंच मुलांनीं उत्तरें देण्यास सुरवात केली. कोणीं त्यांचीं नाटकें सांगितलीं, कोणीं त्यांच्या 'बाळकरामाचा' उल्लेख केला, कोणीं त्यांचा भाऊ आपल्या ओळखीचा असल्याचें सांगितलें. एका कोपऱ्यांतील मुलानें गडकरी दारू पिऊन मग नाटकें लिहीत असल्याचा निर्वाळा

दिला—झालें ! दारूवरच उलट सुलट प्रश्न विचारले जात असतांना तास संपला व मुलें बाहेर पडलीं !

सारांश, प्रस्तावना हवीच मग ती कशीही असो असा पगडा शिक्षकांच्या मनावर बसल्यामुळें, वर उल्लेख केल्याप्रमाणें प्रस्तावनेचा 'फार्स' किती तरी वेळीं बघण्याचा प्रसंग येतो. प्रस्तावनेची खरी दृष्टि या शिक्षकांना प्राप्त झाली नाहीं असेंच दुर्दैवानें म्हटलें पाहिजे.

तांत्रिक दृष्टया हा प्रस्तावनेचा भाग उरकण्याच्या चार-पांच पद्धती आहेत. त्यांपैकीं कोणतीही एक पद्धत पूर्णपणें निर्दोष आहे असें म्हणतां येणार नाहीं. प्रत्येक पद्धतीचे थोडेसे फायदे आहेत तसेंच त्यांत थोडें वैगुण्यही आहे. शिक्षकाचें कार्य हें कीं, जी कविता निवडली असेल तिला कोणत्या पद्धतीची प्रस्तावना योग्य ठरेल हें ओळखून तिचा उपयोग करून घेणें.

प्रस्तावनेची एक सामान्य रीत म्हणजे जी कविता शिकवायची असेल तिच्या कर्त्याचा परिचय विद्यार्थ्यांना करून देणें. मागें एकदां असा उल्लेख केलेला आहेच कीं, आमचें काव्याचें अध्यापन 'काव्यसाठीं' होत नसून तें 'परीक्षेसाठीं' होत असतें. या विधानाला अत्यंत समर्पक पुष्टी येथें मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं. आमच्या शाळेंतील मुख्याध्यापकांची, शिक्षकांची व विद्यार्थ्यांची दृष्टि मॅट्रिक परीक्षेकडे कशी खिळून बसली आहे तें पहाण्यासारखें आहे. मॅट्रिकच्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेंत पांच गुणांपुरता कां होईना, पण कविचरित्रावर एक प्रश्न येत असतो. त्यामुळें मॅट्रिकचेच शिक्षक नव्हे तर इयत्ता पहिलीचे किंवा दुसरीचे शिक्षकही परीक्षेंत कविचरित्र विचारतात. अर्थात् त्याची तयारी म्हणून कवितेच्या आधींच कवीच्या चरित्राचा अभ्यास घेतला जातो.

वास्तविक शिक्षकाचें कार्य कविता शिकवायची, काव्यांतील

दिव्य सौंदर्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून द्यावयाचा व भावना-विकास घडवायचा हें आहे. कवीचें चरित्र सांगणें हें नाहीं. कवीचें चरित्र जाणण्याची उत्सुकता कवितेच्या अभ्यासानंतर उत्पन्न होणारी आहे हें साधें तर्काचें उदाहरण शिक्षकांच्या लक्षांत येऊं नये ही उद्वेगाची गोष्ट आहे. एकाद्या कवीच्या पुष्कळ कविता अभ्यासिल्या, त्याच्या कवितांवर प्रेम जडलें कीं विद्यार्थी आपण होऊन त्या कवितांच्या कर्त्याचें जीवन जाणण्याचा प्रयत्न करतील. काळाचा अपव्यय करणारी ही प्रस्तावनेची पद्धत केव्हांही त्याज्यच ठरेल.* या बाबतींत फार तर अशी सवलत देतां येईल कीं, जर त्या कवीच्या जीवनांतील एकादा भाग समजल्याशिवाय काव्याचा आस्वाद उत्तम रीतीनें घेतां येणार नाहीं असें शिक्षकास प्रामाणिकपणें एकाद्या कवितेच्या अध्यापनाच्या वेळीं वाटलें तर मात्र त्या वेळीं तो भाग चटकन् पण चटकदारपणें सांगणें इष्ट ठरेल. याच वेळीं तरुण व अननुभवी शिक्षकांना एक इशारा द्यावासा वाटतो. कविचरित्र किंवा त्यांतील भाग प्रस्तावनेंत घेतला जात असेल तेव्हां संयम पाळा व सतत औचित्य राखा; नाहीं तर या प्रकरणाच्या आरंभीं सांगितलेली गडकऱ्यांविषयीं माहिती मिळवून प्रस्तावनेचें औचित्यशून्य चऱ्हाट वळीत बसण्याची पाळी यावयाची !

प्रस्तावना करण्याची दुसरी एक रीत म्हणजे कवितेंत जो मुख्य विषय असेल त्यास अनुलक्षून आरंभीं चर्चा करणें. ह्या चर्चेत कांहीं वेळीं विषयाची मध्यवर्ति कल्पना सांगितली जाते व त्यामुळें कवितेंतील अर्धे स्वारस्य निघून गेल्याशिवाय रहात नाहीं. या मुद्यांचें स्पष्टीकरण एका प्रत्यक्ष घडलेल्या पाठानेंच होईल. कवि मायदेव यांची "घे कुठार" ही कविता इयत्ता दुसरीमध्यें घेतली जात होती.

---

* J. H. Jagger : Poetry In School p. p. 49.

शिक्षकानें कविता वाचून दाखवण्याच्या आधीं, " एक वृक्ष लाकूडतोड्यास कुऱ्हाड मारण्यास सांगत आहे. त्यानें अनेकांचे उपकार घेतल्यामुळें तो दुसऱ्यावर उपकार करण्यास सिद्ध झाला आहे व त्यासाठीं त्याला मृत्यूचेंही भय वाटत नाहीं. त्या थोर, स्थितप्रज्ञ वृक्षाचें म्हणणें आपण ऐकूं म्हणजे त्याप्रमाणें आपण वागूं—" ही माहिती प्रस्तावनेंत दिली. विद्यार्थ्यांना पुढें कवितेच्या तासाला उत्साह वाटण्यासारखें कांहींच शिल्लक राहिलें नाहीं.

अशा रीतीनें कवितेंतील सारांश आरंभीं सांगणें किंवा एकाद्या मध्यवर्ति विचारास पोषक कल्पना आधीं स्पष्ट करणें, केव्हांही योग्य होणार नाहीं. त्यामुळें कवितेंत कांहीं नवीन, गंमतीचें असेल तें पाहूं या अशी उत्सुकता विद्यार्थ्यांत दिसणार नाहीं. कांहीं पाठ्यपुस्तकांतील उताऱ्यांच्या आरंभीं मुख्य विषय थोडक्यांत देण्याची पद्धत अनिष्ट वाटते ती याच मुद्यावर होय!

कांहीं शिक्षक प्रत्यक्ष सारांश चर्चेस न घेतां, त्या मुख्य विषयाशीं संलग्न अशी दुसरी बाजू चर्चेस घेतात. कुशल प्रश्नांच्या द्वारें त्या बाजूबद्दल विद्यार्थ्यांचें मत बनवण्यास मदत करून, हळूच ही बाजू कवीस कां पटत नाहीं असा उत्सुकतावर्धक प्रश्न विचारून कवितेकडे वळतात. ही पद्धत वावगी नाहीं. पण यांत शिक्षकास आत्मविश्वास व कुशलता या दोन गुणांची जरूरी असते. इंग्रजी तिसरी इयत्तेंत कवि यशवंत यांचें "श्रीलक्ष्मीदेवीस" हें सुनीत घेतांना एका शिक्षकानें याच पद्धतीचा अवलंब केला. संपत्तीचा तिरस्कार करणें श्रेयस्कर ही निवृत्तिपर बाजू चर्चेस घेतली व पांच मिनिटें होण्याच्या आंत मजेदार रीतीनें चर्चेस कलाटणी देण्यांत त्यानें यश मिळवलें. चर्चेंत विरोधी बाजू रंगवून उत्सुकता वाढविण्यापैकींच हा एक प्रकार आहे. मात्र कवितेचा विषय व तिची रचना यांच्या

अनुरोधानें सराईत शिक्षकानें या पद्धतीचा अवलंब करणें इष्ट ठरेल.

आख्यानपर कविता शिकवायची असेल तर प्रस्तावनेंत संदर्भ सांगणें इष्ट ठरेल. मात्र संदर्भ म्हणजे काव्यविषय नव्हे याची जाणीव ठेवली पाहिजे. मोरोपंतांच्या आर्याभारतांतील उतारे साधारणतः निवडले जातात; अशा वेळीं प्रश्नद्वारें किंवा तें शक्य न झाल्यास स्वतः थोडक्यांत संदर्भ—मागील भाग—स्पष्ट करावा. त्यामुळें कविता समजण्यास मदतच होईल. खंडकाव्यांतील उतारा ( उदा० बंदि-शाळेंतील संजीवचें मातृभूमीस वंदन) घेतांना प्रस्तावनेंत संदर्भ अवश्य सांगावा.

प्रस्तावना करण्याची आणखी एक रीत म्हणजे कवितेंतील कठीण शब्द व कठीण प्रसंग आधींच स्पष्ट करून सांगणें. जी कविता शिकवावयाची तिच्यांतील कठीण वाटणारे शब्द फळ्यावर लिहिणें व ते प्रथमतः विद्यार्थ्यांना परिचित करून देणें; शक्य तेथें शब्दांचा अर्थ समोरच लिहिणें. कवितेंतून शब्द वेगळे काढण्यांत मुख्यतः तोटाच होतो. शब्दांचा खरा अर्थ शब्दकोशांप्रमाणें तयार केलेल्या फळ्यावर उलगडून सांगणें पूर्णतया शक्य नसतें. शब्दांचा अर्थ, अर्थांतील सूक्ष्म छटा व प्रभाव इतर शब्दांच्या साहचर्यानें समजतो. प्रत्यक्ष काव्यचरण दोन वेळां वाचल्यानंतर कवीनें वापरलेल्या शब्दाचा नाद, अर्थ, औचित्य जितक्या चांगल्या रीतीनें पटेल तितक्या प्रमाणांत, फळ्यावर चरणांतून बाहेर काढलेला शब्द व त्याचा शब्दकोशीय अर्थ पटवून देणार नाहीं. याशिवाय आधीं शब्दाचा अर्थ सांगणें इष्ट नसल्याचें एक कारण सांगतां येईल. संदर्भ व इतर शब्दांचें साहचर्य यांमुळें नवीन शब्दाचा अर्थ समजावून घेण्याची शक्यता व विद्यार्थ्यांचें सामर्थ्य वाढविण्याची संधि कमी करणें चांगलें होणार नाहीं.

कवितेचा रसास्वाद घेतांना शब्दांचा अभ्यास स्वतंत्र स्वरूपांत घेऊं नये असें मत प्रतिपादतांना डॉ. गरे लिहितात:—

"The words of the poem are not to be regarded objectively, not to be looked at and examined with detachment;—they should sink into the mind, and be allowed to repose there as the focus of one's meditation until they yield their fulness." *

इंग्रजी विषय शिकवण्याच्या वेळीं एकाद्या उताऱ्यांतील अपरिचित शब्द निराळे काढून त्यांचा परिचय प्रस्तावनेंत करून टाकण्याची पद्धत पुष्कळ रूढ आहे. ह्या प्रस्तावनेंत शब्द समजावून दिले कीं उताऱ्यांतील कल्पना व मुख्य विषय विद्यार्थ्यांना आकलन करणें कठीण जात नाहीं. इंग्रजीच्या पाठांत रूढ वाटणारी शब्दांच्या परिचयाची ही प्रस्तावना मराठीच्या पाठांतही आणण्याचा मोह 'भाषांचें अध्यापन एकाच तत्त्वावर असावयाचें' या भूमिकेवर होत असतो. पण या ठिकाणीं एका महत्त्वाच्या गोष्टीकडे शिक्षकांची डोळेझांक होते. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषा असल्या तरी एक परकी आहे व उलट दुसरी मातृभाषा आहे याची जाणीव त्यांना रहात नाहीं. विद्यार्थ्यांचा मातृभाषेशीं परिचय जन्मकाळापासून झालेला असतो. जीवनांतील विविध हालचाली मातृभाषेच्याच द्वारें झालेल्या असतात; आणि त्यामुळें इंग्रजी शाळेंतील विद्यार्थ्यांची मराठी शब्दसंपत्ति शतपटीनें इंग्रजी शब्दसंपत्तीपेक्षां अधिक असते. घरीं, दारीं, शाळेंत, बाजारांत, देवळांत, थिएटरांत, प्रवासांत–सारांश जीवनाच्या सर्वंकष हालचालींत आढळणारे विशिष्ट शब्द व त्यांच्या सूक्ष्म छटा त्यांना समजलेल्या असतात; तसें इंग्रजी भाषेचें नाहीं, हें शिक्षकानें लक्षांत घेऊन मातृभाषेच्या पाठांत शब्दासाठीं मुद्दाम मेहनत घेत बसूं नये.

* Dr. P. Gurrey : "The Appreciation of Poetry."

सं. जै. मा. ठाणे
१२४
३०१७
ना. दि.



याशिवाय काव्यानंदाचा आस्वाद घेण्यास आलेल्या बालमनास शब्दांचा अभ्यास करावयास लावणें हें मानसशास्त्राच्या दृष्टीनें कितपत समर्थनीय ठरेल? या बाबतींत प्रत्यक्ष अनुभव असा आला आहे कीं, कवितेच्या ओघांत कठीण शब्द सहज समजतो. वामन, रघुनाथपंडित, मोरोपंत यांच्या वाङ्मयांतील विविध उताऱ्यांचें अध्यापन, शब्दांचा आगाऊ अभ्यास न घेतांही अत्यंत यशस्वी होऊं शकलें आहे.

प्रस्तावना करण्याची एक पद्धत अशी आहे कीं, जी कविता शिकवायची असेल तिच्यांतील मुख्य रसाला पोषक अशी पार्श्वभूमि किंवा असें वातावरण थोड्या प्रश्नद्वारें वर्गांत निर्माण करावयाचें. या विधानास उदाहरण म्हणून असें सांगतां येईल कीं, कुसुमाग्रज कवींची "सात मराठे वीर" ही वीररसपूर्ण कविता किंवा अज्ञातवासी कवींची "मराठेशाहींतील एक प्रसंग" ही कथात्मक कविता किंवा माधव कवींची "तुकाराम" अथवा "एका रात्रींची गंमत" हीं अद्‌भुतरम्य कविता शिकवायची असेल तर वीररसपूर्ण किंवा आश्चर्यचकित होण्यासारखें वातावरण सर्व वर्गांत कांहीं प्रश्नद्वारें निर्माण करावयाचें. कवि गिरीश यांची 'भलरी' किंवा "चला रायगडा, शिवरायाचं दर्सन घेऊं" असली संघ–कविता म्हणण्याच्या आधीं शेतकरी-जीवनांतील कापणीच्या दिवसांतील चर्चा करणें किंवा शिवरायाबद्दल व त्याच्या रायगडावरील समाधीबद्दल विद्यार्थ्यांना व इतर मावळे लोकांना काय वाटत असावें यावर प्रश्न विचारून, किंवा वर्गांतील विद्यार्थ्यांनाच शेतकरी किंवा मावळे अशी नाट्यमय भूमिका देऊन कवितेसाठीं उठावदार वातावरण निर्माण करणें सहज शक्य आहे.



अनुक्रम

पण ही पद्धत योग्य असूनही एक शंका अशी घ्यावीशी वाटते कीं, असें वातावरण कवितेच्या वाचनाआधीं कशाला निर्माण करावें? हा तुमचा प्रयत्न एका दृष्टीनें कृत्रिम ठरणार नाहीं का? कवीला आपल्या कवितेच्या वाचनानें जें वातावरण प्रथमदर्शनी सर्व वर्गभर निर्माण करतां येईल, तें तितक्या समर्पक व ओजस्वी रीतीनें शिक्षकास प्रश्नांच्या साह्यानें करणें शक्य आहे काय? प्रो. हॅडो म्हणतात, " Have faith in the poet and in your pupils, and go straight to the poem " * कवीच्या सामर्थ्यावर व विद्यार्थ्यांच्या समरस होण्याच्या शक्तीवर खुशाल विश्वास ठेवा. त्या कवीची कविता व विद्यार्थ्यांचीं संस्कारक्षम अंतःकरणें यांचा संयोग होऊं द्या. कशाला उगाच मधें उभे रहातां? कै. गडकऱ्यांची "राजहंस" रे. टिळकांची "केवढें हें क्रौर्य?", गिरीश यांची "कृतज्ञता" किंवा यशवंत यांची "आई" ही कविता विद्यार्थ्यांना चांगली वाचून दाखवा अन् पहा वर्गांतील मुलांकडे! मुलांच्या डोळ्यांत थबकणारे अश्रू, कोपऱ्यांत बसलेल्या एकाद्या मुलाचा किंवा मुलीचा हुंदका, बाहेर पडून तुम्हांला सांगतील कीं, करुणरसाचें वातावरण तुम्ही निराळें कृत्रिम उपायांनीं निर्माण कितपत करूं शकाल? एकाद्या तासाला केशवसुतांची 'दंवाचें थेंब' ही कविता झालेली आहे काय? मग थांबूं नका—खुशाल आचार्य अत्रे यांची "पाहुणे" ही कविता वाचा आणि पहा हास्यरसानें सर्व वर्ग भरून जातो कीं नाहीं? हीच गोष्ट वीररसात्मक कवितांची! आतां यावरून, हें सहज पटेल कीं, कवितेच्या आधीं वातावरण मुद्दाम प्रस्तावनेंतून तयार करणें फारसें उपयुक्त होणार नाहीं.

---

* Haddow : On The Teaching of Poetry. p. p. 22.

आतांपर्यंत आपण आजच्या शिक्षणपद्धतींत प्रस्तावनेस मिळालेलें फाजील महत्त्व बघितलें; नंतर कवितेची प्रस्तावना करण्याच्या चार-पांच ठराविक पद्धती बघून त्यांच्या वैयक्तिक गुण-दोषांची चर्चा केली. प्रत्येक पद्धत ही थोडीफार सदोष व कृत्रिम आहे असाही निष्कर्ष काढला. त्यामुळें असा सहजच प्रश्न उद्भवतो कीं, सामान्य शिक्षकांनीं प्रस्तावना कोणती करावी ? शाळेंतील वेळापत्रक व इयत्तेचा अभ्यासक्रम हीं सर्व मुलांना माहित असतात. वर्षांत आपणांस कोणतें गद्य-पद्य अभ्यासावयाचें आहे हेंही मुलांना माहित असतें. आपल्या वर्गांत कविता कोणती झाली आहे व यापुढें आपले शिक्षक कोणती कविता घेणार आहेत याचाही अंदाज पुष्कळ मुलांना असतो. कांहीं विद्यार्थी तर त्या अंदाजानें घरून ती कविता वाचूनही आलेले असतात—कवितेचा तास सुरू होण्याची घंटा होतांच मुलांनीं अंदाजानें पुस्तक उघडून कवितेचें पृष्ठ समोर धरलेलें असतें—ही प्रत्यक्ष वस्तुस्थिति समोर असतांना, प्रस्तावनेच्या मागें सांगितलेल्या पद्धती कृत्रिम आहेत असेंच वाटेल. यासाठीं सर्वांत उत्तम उपाय हा कीं, या प्रस्तावनेच्या फंदांत न पडतां, एकदम कविता चांगल्या रीतीनें वाचून दाखवा. प्रस्तावनेंत वेळ घालवण्यापेक्षां कवितेच्या अध्यापनांतील महत्त्वाचें कार्य—विद्यार्थ्यांना काव्य अनुभवास लावण्याचें—त्या अनुभवांतून त्यांना सौंदर्यसमीक्षक बनवावयाचें—त्यांच्या भावनांचें संवर्धन करावयाचें—तिकडेच वळणें श्रेयस्कर नाहीं काय ?

कवितेच्या अध्यापनांत प्रस्तावनेची जरूरी नाहीं; कवितेचें वाचन उत्तम रीतीनें व्हावयास पाहिजे हा निष्कर्ष मागील प्रकरणांत निघत असल्यामुळें कवितेचें वाचन चांगलें व्हावयास पाहिजे म्हणजे कसें व्हावयास पाहिजे याची चर्चा या प्रकरणांत करणें क्रमप्राप्तच झालें आहे. याशिवाय पुष्कळशा शिक्षकांना कविता कशी वाचावी याची खरी कल्पना आली नाहीं असाच अनुभव आल्यामुळें वाचनविषयक चुकीच्या गोष्टी कोणत्या व चांगल्या कोणत्या याचा उलगडा होणें अत्यंत जरुरीचें आहे.

पुष्कळ शिक्षक वर्गासमोर कविता म्हणण्याचें टाळत असतात. याचीं कारणें दोन असूं शकतील. एक म्हणजे त्यांना कविता म्हणून दाखवितां येत नसल्यामुळें केवळ संकोच उत्पन्न होऊन ते टाळत असावेत आणि दुसरें कारण म्हणजे त्यांना कवितेच्या अध्यापनांत कविता प्रकट रीतीनें म्हणून दाखवण्यांत असलेलें महत्त्व माहित नसावें. कांहीं शिक्षक कविता वाचून दाखवतात पण ती अशा अनास्थेनें कीं, त्यामुळें तें खरें वाचन वाटत नाहीं व परिणाम असा होतो कीं, काव्यानंदाचा आस्वाद विद्यार्थ्यांना घेतां येत नाहीं. घाईघाईनें भरकटल्यासारखी कविता वाचणें, वाचतांना शब्द सोडणें, अडखळणें, आवाजांत चढ-उतार न होणें, वाचतांना भावनापरिपोष न होणें—इत्यादि किती तरी दोष शिक्षकांच्या वाचनांत आढळून येतात.

काव्याचें वाचन व अध्यापन करणाऱ्या शिक्षकानें हें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, काव्य म्हणजे एक ललितकला आहे. आणि तिचें अध्यापन 'कले' च्या तंत्रानुसारच व्हावयास हवें.

याचप्रमाणें त्यानें असा दुसरा सिद्धान्त पक्का लक्षांत ठेवला पाहिजे कीं काव्य ही कला मुख्यत्वें श्राव्य आहे; ती केवळ कानांकरितां आहे. नृत्य वा चित्रकलेप्रमाणें ती केवळ डोळ्यासाठीं—दृश्य स्वरूपाची—नाहीं. कवितेचा आस्वाद प्राधान्येंकरून कानांच्या द्वारें घ्यावयाचा आहे हें तत्त्व मानलें म्हणजे कवितेच्या प्रकट म्हणण्याचें किंवा वाचनाचें महत्त्व कोणासही सहज पटण्यासारखें आहे.

काव्यकलेचा आनंद मिळवण्याची पूर्वापार पद्धति आपण नजरेआड करून चालणार नाहीं. फार पूर्वीपासून कवि आपल्या कविता राजदरबारांत म्हणून दाखवीत असे व त्यामुळें संतुष्ट होऊन राजेरजवाडे व रसिक लोक त्या कवीचा सत्कार करीत, असें दर्शविणारीं किती तरी उदाहरणें सांगतां येतील. कालिदास आपलें काव्य विक्रम राजास म्हणवून दाखवीत असे ही आज दंतकथा वाटली, तरी शिवरायाचा चांदभाट आणि मराठे व पेशवेशाहींतील शाहीर जनतेपुढें काव्य म्हणत होते हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. फार कशाला, जेव्हां हल्लींच्या दिवसांत आपण यशवंत, गिरीश, कुसुमाग्रज इत्यादि विद्यमान कवींचें काव्यगायन ऐकतों तेव्हां आपल्याला होणारा दिव्य आनंद कोण विसरूं शकेल? या दाखल्यावरून हेंच सिद्ध होईल कीं, काव्याचा खरा आस्वाद आपण कानांनींच घेऊं शकतों.

छापखान्याच्या कलेनें आपल्या जीवनांत फार क्रांति केली आहे व त्या कलेचे आपणावर अनंत उपकार झाले आहेत हें मान्य करूनही असेंच थोडेसें धारिष्ट्यानें म्हणावें लागेल कीं, या मुद्रणकलेनें कविता छापावयास आरंभ केल्यामुळें लोक कवितावाचन—मूक वाचन—करूं लागले व त्यामुळें काव्यकलेचा कानांनीं आस्वाद घेण्याची संधि मिळेनाशी झाली. यशवंताच्या काव्यसंग्रहाचा डोळ्यांनीं

तुम्हीं खूप अभ्यास केला, तरी त्यामुळें कवि कळणार नाहीं. त्यांची 'आई' ऐका, 'मातृभूमीस वंदन' ऐका, 'पाणपोई' ऐका—म्हणजे कवि खरा समजेल यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं.

शाळेच्या आवारांत, कविता नेहमीं मोठ्यानें म्हणणें जरूर आहे. साधारणत: बालमन हें नादमाधुर्यास, तालबद्धतेस व संगीतास हपापलेलें असतें. त्या बालमनाची पूर्ति काव्य मोठ्यानें वाचूनच होऊं शकेल व मगच त्याला काव्याबद्दल चिरंतन आवड निर्माण होण्याची शक्यता आहे. तुम्ही कविता नि:संकोचपणें, चालीवर, खुल्या आवाजानें व तन्मयतेनें वाचा आणि पहा कीं, मुलें चालीवर माना डोलावीत आहेत, तालावर हातपाय हलवीत आहेत, आणि त्यांतील दिव्य अनुभव व अफाट कल्पना समजून, भावनोत्कट होत्साते, समाधान व प्रसन्नता मुखावर प्रकटवीत आहेत ! काव्याचा व्यवच्छेदक गुण गेयता आहे. रसात्मकता व गेयता यांनाच प्रा. श्री. म. माटे महत्त्व देतात. *

कवितेचा खरा आस्वाद तो हा ! कवितेचा अनुभव तो हा ! आणि कवितेचें अध्यापन तें हेंच ! जर शिक्षकाला मुलांना कविता समजून घेण्यास मदत करावयाची असेल तर ती उत्तम रीतीनें प्रकट वाचूनच ! !

मुलांना पुस्तकांतील कविता डोळ्यांनीं वाचून कधींच यथार्थपणें समजणार नाहीं. त्यासाठीं प्रकट वाचन हवेंच आणि तें सुद्धां शिक्षकानें केलें पाहिजे. कांहीं असे शिक्षक आढळतात कीं, जे संकोचामुळें म्हणा अथवा आळसामुळें म्हणा, कविता म्हणून दाखविण्याचें काम एकाद्या मुलावर सोंपवितात आणि जर त्या मुलाचा आवाज चांगला असेल तर हें वाचनाचें काम त्याच्यावर हमखास

* प्रा. माटे : **रसवंतीची जन्मकथा** पृष्ठें ६८, ६९, १२५, १६१.

ठरलेलेंच ! पण ही पद्धत इष्ट नव्हे. मुलांकडून कविता म्हणवून अवश्य घ्यावी पण ती आधीं नव्हे, नंतर ! कवितेचा अर्थ कळल्याखेरीज, कवीच्या भावना समजल्याखेरीज कवितेचें वाचन एकाएकीं चांगलें होऊं शकेल काय? मुलांनींच नव्हे, तर खुद्द शिक्षकानेंसुद्धां स्वतः कविता पूर्णपणें समजून घेतल्याशिवाय ती वर्गांत प्रकट म्हणून दाखवूं नये. स्वतः अनुभवणें, आस्वाद घेणें हें कार्य प्रथम केलें पाहिजे. त्याशिवाय होणारें वाचन, दृष्टीचा व्यायाम ठरेल, वाचन होऊं शकणार नाहीं. याबाबतींत प्रो. मरे यांचें मत उद्बोधक ठरेल.* " We do not understand a great poem till we have felt it through, and as far as possible re-created in ourselves the emotions which it originally carried."

पण या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून जेव्हां शिक्षक तासाच्या प्रारंभीं एकाद्या विद्यार्थ्याला कविता वाचून दाखवण्यास सांगतात किंवा प्रत्येक विद्यार्थ्याकडून त्या कवितेंतील एक एक श्लोक किंवा कडवें वाचून घेतात, तेव्हां त्यांच्याबद्दल काय म्हणावें हेंच समजत नाहीं. कवितेच्या अभिरुचीस पायबंद घालण्याचें कार्य हें शिक्षक करीत असतात. कविता म्हणजे एकसंधि कलाकृति असते; तिचें वाचन व अध्ययन एकसंधि व्हावयास पाहिजे. शवच्छेदन रूक्ष व शास्त्रीय दृष्टीनेंच केलें पाहिजे. काव्यरसग्रहण, ती समग्र स्वरूपांतच वाचली तर होईल. नृत्य पहातांना पार्श्वसंगीताकडे एक वेळ, नर्तकीच्या पदन्यासाकडे दुसऱ्या वेळीं, हावभावाकडे तिसऱ्या वेळीं, तिच्यावर पडणाऱ्या रंगीत प्रकाशकिरणांकडे चवथ्या वेळीं—असें हप्त्याहप्त्यानें बघितलें तर नृत्यसौंदर्याचा आस्वाद कसा मिळणार? त्या सर्व रम्य गोष्टींचा सौंदर्यानुभव एकसमयाच्वछेंकरूनच घ्यावयास

* On the Teaching of Poetry p. p. 27.

पाहिजे. ताजमहालचें शिल्पसौंदर्य सर्व इमारत एकदम बघूनच समजेल. त्या इमारतीचे वेगळे भाग करून खास नाहीं.—त्याचप्रमाणें कवितेच्या आस्वादासाठीं वाचन संपूर्ण स्वरूपांत व्हावयास पाहिजे.

कवितेच्या *अध्यापनांत तिचें उत्कृष्ट वाचन होण्याला अत्यंत* महत्त्व आहे, पण खरोखरच त्या दृष्टीनें वाचन व्हावें अशी तयारी किती शिक्षक करीत असतील बरें? कवितेचें वाचन करावयाचें म्हणजे फार क्षुल्लक गोष्ट आहे; त्यांतील शब्द विद्यार्थ्यांना समजले म्हणजे पुष्कळ झालें असाच सर्वत्र समज दिसून येतो. कवितेचें वाचन उत्तम होणें ही एक कला आहे व त्या कलेची प्राप्ति होण्यास नैसर्गिक देणगीप्रमाणेंच परिश्रमांची सुद्धां आवश्यकता असते. जे शिक्षक परिश्रम न करतां, पूर्वतयारीशिवाय कविता कशी तरी भरकटून वाचतात ते त्या तासाचा अपव्यय व त्या कवितेचा अपमान करतात यांत मुळींच शंका नाहीं. कांहीं शिक्षकांचा असाही समज झालेला दिसतो कीं, वाचनास कां महत्त्व देतां? त्यानंतरच्या शिकवण्यास महत्त्व द्यावयास पाहिजे. पण या शिक्षकांनीं हें जाणलें पाहिजे कीं अध्यापनापेक्षां प्रत्यक्ष कवितेलाच खरें महत्त्व असतें; आणि ती कविता उत्तम वाचल्याखेरीज तिचें अध्यापनही पूर्ण होऊं शकणार नाहीं. विद्यार्थी तुमच्या प्रश्नांना उत्तरें देतील, तुमच्या चर्चेंत भाग घेतील पण केव्हां? — त्यांना कवितेचें प्रथम दर्शन घडतांच, तिच्याविषयीं त्यांना आवड वाटेल तेव्हां! आणि ही आवड प्रथम वाचनानें निर्माण करण्याची जोखीम शिक्षकावरच आहे.

यानंतर असा प्रश्न कोणी विचारील कीं, उत्तम वाचन म्हणजे तरी काय? या बाबतींत सामान्य समज असा आहे कीं, ज्याचा आवाज मधुर आहे त्यानें सुरेल चालीवर कविता गाइली कीं ती

चांगली. पण हा समज पूर्णपणें खरा नाहीं. असे किती तरी शिक्षक आहेत कीं, त्यांना काव्याची आवड आहे पण आवाज चांगला नाहीं, गातां येत नाहीं, चालीवर म्हणतां येणार नाहीं या धास्तीनें ते काव्य शिकवण्याचें साधारणतः टाळून गद्याचा पाठ घेत असत. —पण यांनीं इतका संकोच बाळगण्याचें कारण नाहीं. या उलट असे कांहीं शिक्षक आणि विशेषतः स्त्री-शिक्षिका असतात कीं, गोड आवाजाच्या नैसर्गिक देणगीमुळें शक्य तों व्याकरण किंवा लेखन यांचा पाठ घेण्याचें टाळून व संधि मिळवून काव्याचाच पाठ घेत असतात. हीं दोन जातींचीं दोन टोकें आहेत आणि त्यांचा असा एक विचित्र गैरसमज झाला आहे कीं, काव्यवाचन म्हणजे काव्य-गायन ! वस्तुतः काव्याचें अर्थबोध करणारें सुरेल चालीवरील वाचन हें तानबाजी व आलाप घेऊन आणि पालुपद घोळून-घोळून म्हटल्या जाणाऱ्या संगीतापेक्षां भिन्न आहे.

याबद्दलचें एक ताजें घडलेलें उदाहरण देतों म्हणजे झालें. ट्रेनिंग कॉलेजांतील एक शिक्षिका कवितेचा पाठ साधारणपणें उत्तम रीतीनें घेत असे म्हणून तिला इतरांच्या देखत एक पाठ घेण्यास सांगितला. इयत्ता तिसरीसाठीं तिनें माधव ज्यूलियन यांची "चल उडुनी पांखरा" ही रम्य कविता निवडली. कवितेची निवड चांगली, म्हणण्याची घाटणी चांगली, आवाज चांगला, प्रश्नद्वारें विषय समजावून देण्याची पद्धत चांगली, त्यामुळें पाठ चांगला होणार अशीच सर्वांना खात्री.— पण झालें असें कीं, 'बाई'नीं कविता गाऊन म्हणण्यास प्रारंभ केला. पालुपद पांच वेळां घोळून म्हटलें. प्रसंगवशात् तान घेतली व सात मिनिटांत कावितेचें वाचन संपविलें.—पण याच वेळीं "बाई"ना वाटलें कीं, आपण पुन्हां कविता गावी. झालें ! पुन्हां सर्व कार्यक्रम तोच. पुन्हां सात मिनिटें गेलीं. पाठ होता पसतास

मिनिटांचा; त्यांपैकीं चौदा मिनिटें गेलीं. दहा मिनिटें विवेचन होतें न होतें तोंच उपयोजनाची गर्दी उडाली—पुन्हां विद्यार्थ्यांचें व "बाई"चें गायन सुरू! एकंदरींत गायनाचा तासच झाला म्हणाना!

सुरेल आवाजाच्या शिक्षकांनीं व विशेषत: शिक्षिकांनीं (कारण तोच अनुभव फार वेळीं आला आहे.) काव्य चालीवर अवश्य वाचावें पण त्यांत अकारण गेयता आणून विद्यार्थ्यांचें लक्ष 'अर्थ व भावने' वरून संगीताकडे झुकवूं नये!

कवितेच्या वाचनांत गेयता नको, चाल पुरेशी आहे हें सिद्ध झालेंच आहे. त्यानंतर या वाचनांत जो प्रमुख गुण असावयास पाहिजे तो म्हणजे 'तन्मयता' होय. शिक्षक हा 'स्व' त्व विसरून कवीच्या आत्म्याशीं एकरूप झाला पाहिजे.* विद्यार्थ्यांना असें वाटलें पाहिजे कीं, प्रत्यक्ष कवि हृदय मोकळें करून आपल्याशीं बोलत आहे. ग्रीक पुराणांतील एका कथेचा उल्लेख करून एक पाश्चात्य पंडित म्हणतो— "We all know that ghosts will not speak till they have drunk blood, and we must give them the blood of our hearts" आपण आपलें सर्वस्व दिलें कीं त्या कवितेच्या वाचनांत आपल्या रूपानें प्रत्यक्ष कवीचा आत्मा बोलूं लागेल हीच कल्पना यांत आहे. "राजहंस" कविता इतक्या तन्मयतेनें वाचा कीं, कै. गडकरी व तुम्ही एकरूपच आहांत असें वाटेल, आणि मगच तें वाचन उच्च कोटीचें ठरेल. ही समरसता प्राप्त होण्यासाठीं विशाल सहानुभूति व परिश्रम यांची पूर्वतयारी असणें जरूर आहे. कविता जिवंत आहे, चैतन्यानें रसरसलेली, भावनेनें ओथंबलेली व कल्पनेनें नटलेली आहे असें कवीशीं तन्मय झालांत तरच वाटणें शक्य आहे. कै. प्रो. वासुदेव बळवंत

* J. H. Jagger–Poetry In School p. p. 33, 211.

पटवर्धन फर्ग्युसनमध्यें कविता शिकवीत असतांना, "वेळेचें बंधन नष्ट होई व विद्यार्थी कांहीं काळ मंत्रमुग्ध होत" अशी जी आख्यायिका आहे, त्याच्यांतील रहस्य हें कीं, शिक्षक कवि व कविता यांच्याशीं तादाम्य पावत असे. कवीच्या भावना तुमच्या हृदयांत सळसळल्या कीं तुमच्या आवाजांत प्रेमकविता वाचतांना आर्त मधुरता येईल, रणवीरांचे पराक्रम वाचतांना आवेश व प्रखरता येईल, भगवद्भक्तीचा सोहळा वाचतांना आनंदाचें भरतें येईल, शोकगीत वाचतांना करुणा वाहूं लागेल आणि विडंबन काव्य वाचतांना हास्याची मिस्किल खळखळ बाहेर पडेल—या गोष्टी जेव्हां होतील तेव्हां तुमचें वाचन श्रेष्ठ दर्जाचें झालें असें होईल. आतां तरी पटेल कीं, वाचन करणें म्हणजे क्षुल्लक गोष्ट नाहीं. अंत:करण भरून टाकणारी, स्फूर्तीचा झरा वहावयास लावणारी, जीवनाला उच्च कोटीस नेणारी एक प्रभावी शक्ति म्हणजे वाचन आहे. उत्तम वाचनांत भावना हेलावली पाहिजे, आवाजांत चढ-उतार भासला पाहिजे, डोळ्यांत तेज किंवा अश्रू चमकले पाहिजेत, फार काय प्रसंगानुसार हाताच्या मुठीसुद्धां वळल्या पाहिजेत. इतक्या तन्मयतेनें कवितावाचनाचा प्रयत्न करा, विद्यार्थ्यांना कविता कळलीच पाहिजे. तुमचा आवाज बारीक असेल, असूं द्या; तुमचा गळा गोड नसेल, नसूं द्या —पण जर तुम्ही प्रेमानें, तन्मयतेनें, हृदयसर्वस्व वेंचून कविता मोठ्यानें वाचीत असाल तर ती निश्चित परिणामकारक होईल याविषयीं खात्री बाळगा. कवितेविषयीं खरी आवड असली कीं संकोच अथवा भयाचीं बंधनें भराभर दूर होतात. रसिक शिक्षक आणि कविता यांचे परस्परसंबंध, तुकारामासारखा नि:संकोची तळमळीचा भक्त व विठोबासारखा देव यांच्या परस्परसंबंधासारखे अकृत्रिम होणें हीच श्रेष्ठता आहे. तुम्हीं अशा उत्कटतेनें कविता वाचली कीं

अर्धी-अधिक समजली गेली ही खूणगांठ बांधा—इतकें यश मिळविल्या-वर कवितेचें विवरण अथवा कवितेवर टीका करण्यास थोडा कमी अवधि राहिला तरी हरकत वाटणार नाहीं. तुमच्या वाचनानें कवि-तेचा परिणाम मुलांवर झाला आहे, आनंद चेहऱ्यावर ओसंडत आहे; आतां विद्यार्थी आपण स्वतःच सौंदर्याचा आस्वाद घेण्याचा प्रयत्न करतील असा समाधानाचा सुस्कारा तुम्ही निश्चित टाकूं शकाल.

---

## प्रकरण ६ वें : : : कवितेचें प्रत्यक्ष अध्यापन

कवितेचें वाचन झाल्यावर मग ती कविता कोणत्या पद्धतीनें शिकवली असतांना उत्तम वाटेल असा प्रश्न सहजच कोणीही विचा-रील—नव्हे, असा प्रश्न कवितेच्या पाठाची तयारी करतांना ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थी विचारतातच. या प्रश्नास केवळ एकच पद्धत चांगली आहे असें निर्णयात्मक मत देणें कठीण आहे. प्रो. हॅडो या इंग्रजी शिक्षणशास्त्रज्ञानें या बाबतींत एक मजेदार दाखला दिला आहे. त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, तरुण मनुष्यानें अमुकच एका पद्धतीनें प्रणयाराधन केलें पाहिजे असें निर्णायकपणें सांगतां येईल काय? ज्याला जी पद्धत सोयीची व इष्ट परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनें उचित वाटेल, तिचा त्यानें स्वीकार करावा. त्याचप्रमाणें ज्याला ज्या रीतीनें कवितेचें अंतिम उद्दिष्ट साधतां येईल असें वाटतें त्यानें त्या रीतीनें कवितेचें अध्यापन करावें; कवितेचें अध्यापन करण्यांतील पद्धत प्रत्येकाची निरनिराळी असूं शकेल.

फार तर इतकें स्थूलपणें आपणांस सांगतां येईल कीं, कवितेच्या अध्यापनाच्या पद्धतींत कांहीं ठोकळ गुण असावयास पाहिजेत. हे गुण

असले कीं प्रत्येकाची पद्धत ‘ शिक्षकाची आवड, कवितेची निवड व विद्यार्थ्यांची कुवत ’ या तीन घटकांनुसार निरनिराळी वाटली तरी हरकत नाहीं. कोणतीही पद्धत असो, कवितेच्या तासानें विद्यार्थ्यांचा आनंद वाढला, त्यांच्या सौंदर्यग्रहणशक्तीला अवसर मिळाला म्हणजे झालें.

कांहीं शिक्षणतज्ज्ञांच्या मतें कवितेचें वाचन उत्तम झाल्यावर शिक्षकानें अध्यापन करण्याच्या फंदांतच पडूं नये. कवितेचा एकदां परिचय करून दिला आहे, आतां विद्यार्थ्यांना तिचा अभ्यास स्वत: करून तिच्यांतील सौंदर्याविषयीं, तिच्यांतील गुणदोषांविषयीं स्वत:चें मत तयार करण्याची संधि दिली जावी; त्यांचें मत तयार करण्याची मध्यस्ती शिक्षकानें करूं नये अशी त्यांची भूमिका आहे. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याच्या दृष्टीनें, त्यांच्यांतील सुप्त सौंदर्य-ग्रहणशक्तीस सहजगत्या विकसनाचा मार्ग रहावा या बुद्धीनें, हा पंथ कांहीं वावगा वाटणार नाहीं. किंबहुना जे शिक्षक कविता वाचली कीं एका ओळीमागून दुसरी ओळ घेऊन अर्थ सांगण्याचा सपाटा लावतात, त्या पद्धतीची एक तीव्र प्रतिक्रियाच हें नवीन मत प्रकट करीत आहे असें मानावें लागेल. या दोन्ही पद्धतींचा अवलंब कवितेच्या शिक्षकानें करूं नये. कारण त्या दोन्हीही अतिरिक्त आहेत. विद्यार्थ्यांना स्वत:चीं मतें तयार करतां आलीं पाहिजेत हेंही खरें व तें काम विद्यार्थी करीत असतांना शिक्षकानें त्यांना थोडीशी मदत केली पाहिजे हेंही खरें आहे. किंबहुना उत्तम शिक्षकानें कवितेच्या अध्यापनांत या दोन्ही गोष्टी साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे; किंबहुना शिक्षकानें जी मदत करावयाची ती अशी असली पाहिजे कीं, विद्यार्थ्यांना कवितेचें मूल्यमापन स्वत: करतां आलें पाहिजे, व कवितेचें व्यापक स्वरूप अजमावण्याची शक्ति वृद्धिंगत करतां

आली पाहिजे.—आणि याच कारणासाठीं शिक्षकानें कविता वाचली म्हणजे काम संपलें असें होणार नाहीं, तर ती शिकवली पाहिजे.

कविता शिकवणें हा एक विरोधाभासाचा नमुना आहे असेंही कांहीं शिक्षणशास्त्रज्ञांना वाटतें. पाश्चात्य तज्ज्ञ म्हणतात– "Poetry cannot be taught; the teacher can only create conditions in which a poem may have its fullest possible significance for the pupils reading it." *

आतां कविता शिकवायची म्हणजे तरी काय? पुष्कळसे शिक्षक अशी गैरसमजूत करून घेतात कीं, कविता वाचून झाली कीं त्यावर कांहीं उलटसुलट प्रश्न विचारावेत, कठीण चरणांचा अर्थ कळण्याच्या दृष्टीनें चर्चा करावी—पण ही पद्धत चुकीची आहे. कवितेच्या वाचनानें जें वातावरण निर्माण झालें असेल, जो रस उद्दीपित झाला असेल आणि जी प्रसन्नता मुलांत पसरली असेल तिला मारक वा विरोधी ठरणारे कांहींही प्रश्न विचारले जाऊं नयेत. तुमचें वाचन झालें कीं जरा वेळ—कांहीं क्षण—थांबा; विद्यार्थ्यांना त्या कवितेविषयीं ओझरतें मत बनविण्यास अवधि द्या; आणि मग प्रथमतः त्या कवितेंतील मुख्य प्राणमय वाटणारा प्रसंग किंवा कल्पना विद्यार्थ्यांना आकलन झाली आहे कीं नाहीं हें पहा—झाली नसल्यास प्रश्नद्वारें तें आकलन करून देण्याचा प्रयत्न करा.

कवितेच्या अध्यापनांत जी महत्त्वाची गोष्ट आहे आणि जिचा विसर नेहमीं पडतो ती ही कीं, कवितेचा अभ्यास स्थूलरूपानें कां होईना, पण तिच्या एकसंधि स्वरूपावर झाला पाहिजे.

कवितेचें वाचन कसें करावें या प्रकरणांत या दृष्टीनें थोडासा विचार झालेलाच आहे. कवितेचें स्वरूप एकजिनसी असतें; तिचें

* "Teaching Poetry" Compiled by The Society for Teachers Of English. Introduction.

मूल्यमापन व सौंदर्यग्रहणही तिच्या एकजिनसी स्वरूपाचेंच व्हाव-यास पाहिजे. अर्धी किंवा पाऊण कविता आज व उरलेला भाग पुढील तासाला, अशा तऱ्हेची विभागणी कवितेच्या अध्यापनांत उपयोगी नाहीं. त्याचप्रमाणें प्रत्येक श्लोक अथवा कडवें वेगळें समजून त्याच्यांतील कठीण शब्द, अलंकार, काव्यमय पंक्ती यांचा स्वतंत्र अभ्यास घेणेंही इष्ट नाहीं. या किरकोळ मुद्दयांचा अभ्यास, पृथक् स्वरूपांत न घेतां, मुख्य प्रसंग वा कल्पना समजावून देण्या-साठीं मदत करा व त्या मध्यवर्ती प्रसंगास वा कल्पनेस उठाव आणण्यासाठीं शब्दप्रयोग, अलंकार इत्यादि बारिक गोष्टीही कशा उपयोगी पडल्या आहेत याचें शिक्षण द्या. मध्यवर्ती केंद्राभोंवतीं वावरत असल्यामुळें या किरकोळ गोष्टींत सौंदर्य निर्माण झालेलें असतें हें विसरून चालणार नाहीं. नील आकाशांत प्रमुख स्थान चंद्रास आहे; नंतर त्याच्या परिसरांत असणाऱ्या तारकांना आहे हें व्यावहारिक स्वरूप लक्षांत ठेवलें पाहिजे.

या विवेचनावरून कवितेच्या शिक्षकानें प्रथमतः मध्यवर्ती कल्प-नेचा—कवितेला शरीर मानलें तर त्या देहांतील प्राणशक्तीचा चैत-न्याचा—अभ्यास घेतला पाहिजे. केवळ एक-दोन कवितांच्या दाखल्या-वरून हें विधान अधिक स्पष्ट होईल. यशवन्त कवींची "घर" ही कविता इयत्ता दुसरीमध्यें घ्यावयाची असेल तर शिक्षकानें ती वाचून झाल्यावर काय केलें पाहिजे? या ग्रामीण जीवनावरील कवि-तेची बैठक एकाद्या भावनेवर किंवा कल्पनेवर नाहीं तर एका रम्य प्रसंगावर आहे. तेव्हां तो प्रसंग विद्यार्थ्यांना प्रथमतः समजला पाहिजे. मुलीकडील माणसें वरपक्षीय माणसाजवळ त्याच्या गृह-स्थितीची चौकशी करीत आहेत व नंतर त्यांना त्यांच्या चौकशीचें उत्तर दिलें जात आहे हा प्रसंग म्हणजेच या कवितेंतील आत्मा

होय! हा मुद्दा प्रथम वाचनानें समजला आहे कीं नाहीं हें साधारणतः चार-पांच प्रश्नांत सहजच काढून घेतां येईल. "कोणत्या वेळचा हा प्रसग आहे?" "लग्न ठरविण्यासाठीं वधूपक्षाची मंडळी वरपक्षाकडे चौकशीसाठीं आलेला हा प्रसंग आहे." "ठीक आहे. प्रथमतः कोणत्या पक्षाचे लोक बोलत आहेत?" "वधू पक्षाकडील." "काय चौकशी त्यांनीं केली आहे?" "वरपक्षाकडे दागदागिने, संपत्ति कितपत आहे असें विचारलें आहे." "असें विचारण्याचें काय कारण होतें?" "मुलीला (पर्यायानें वधूपित्याला) श्रीमंत स्थळाची हौस होती." "ही हौस पूर्ण होण्याची शक्यता होती काय?" "होय." "कोणत्या वर्णनावरून असें कळतें?" "वरपक्षाकडे धान्याचीं पोतीं, गायी–बैल होते यावरून सांपत्तिक स्थिति समजली." "या चौकशीचें पर्यवसान कशांत झालें?" "लग्न निश्चित ठरलें."

अशा रीतीनें कवितेची मुख्य बैठक–तो प्रसंग–समजावून देणें शिक्षकाचें काम आहे. हा प्रसंग समजला, त्यांतील मौज त्यांना थोडीशी जरी कळली तरी पुष्कळच काम झालें. मग त्यांचें संभाषण, त्यांतील ग्रामीण भाषा, शेतकरी अंतःकरणाचा "बोलतों असूं द्या माफी, करा दिलसाफी" असें स्पष्टपणें सांगणारा दिलखुलास मोकळेपणा, मुलीच्या नांवाखालीं लपून बसलेली श्रीमंत स्थळाची हौस, वरपक्षानें अपमान न मानतां दिलेलीं चोख उत्तरें, शेतकरी जीवनाची वैभवविषयक कल्पना, गुरांढोरांवरील निस्सीम प्रेम, शेतावरील श्रद्धा, अखेरचा सूचक निकाल—या गोष्टींचा अभ्यास किती तरी झपाट्यानें व प्रसन्न वातावरणांत होऊं शकेल.—उपयोजनांत तर एकाच विद्यार्थ्यानें कविता म्हणण्यापेक्षां दोन विद्यार्थ्यांकडून नाट्यपूर्ण रीतीनें कविता म्हणून घेणें किती तरी उपयुक्त ठरेल;

कविता मोठ्यानें वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांचीं पुस्तकें या वेळीं उघडीं नसणेंच इष्ट आहे. शिक्षकानें कविता अशा रीतीनें वाचावी कीं, नदीच्या कांठीं, डोंगराच्या कडेला पसरलेलीं शेतें, विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर उभीं राहणें जरूर आहे. प्रत्यक्ष कवीबरोबर आपणही शेतांत आहोंत, तेथील भरदार पिकें, हिरवीं गवतें बघून आनंदानें झाडाखालीं कांदाभाकर खात आहोंत; संध्याकाळ होऊन गेल्यामुळें तिथेंच घोंगडीवर पडून चांदण्याचें सौंदर्य बघत आहोंत, मधूनच बैलांच्या घुंगुरांचा आवाज व कुत्र्याची गुर्गुर ऐकूं येत आहे असें वाटलें पाहिजे आणि परतंत्र नोकरीपेक्षां शेती सुखावह आहे या विचाराशीं सहजच ते एकरूप झाले पाहिजेत.—शिक्षकाच्या निव्वळ वाचनानें इतकी समजूत विद्यार्थ्यांची झाली पाहिजे आणि ती झाली आहे याची खात्री चार-पांच ठळक प्रश्नद्वारें करून घेतली पाहिजे. कोणतें प्रश्न यासाठीं विचारले जावेत? यशवंत कवीचें शेत कुठें आहे? त्या शेतांत गेल्यावर कोणत्या दृश्यानें आनंद वाटेल? शेतकरी काय काम करीत असेल? रात्रीं झोंपतांना कोणत्या गोष्टींनीं त्यास आनंद होईल? या सुखामुळें कवीला कोणत्या आयुष्याचा तिटकारा येतो? कोणतें आयुष्य त्याला आवडतें?—हे प्रश्न विचारून उत्तरें घ्या म्हणजे समजेल कीं, कवितेचें पहिलें दर्शन किती प्रभावी झालें आहे तें! पुन्हां कविता वाचा किंवा मुलांना मनांत वाचावयास वेळ द्या. कविता त्यांच्यासमोर राहूं द्या आणि जरा वेळानें सूक्ष्म विवेचनास आरंभ करा, पण त्याचा स्थूलाभ्यासाशीं संबंध ठेवला पाहिजे. यशवंतांचें शेत कुठें आहे तें विद्यार्थ्यांना माहित आहे त्याचाच आधार घ्या आणि विचारा यशवंतांचें शेत ज्या नदीच्या कांठावर आहे ती कोणती? मांडवी नदीला कोणतें नांव दिलें आहे? गंगेचें नांव देण्यांत कवीला काय सुचवायचें आहे? त्या लहान पण पवित्र वाट-

णाऱ्या नदीचा प्रवाह कोणत्या दिशेनें वाहात आहे? यशवंतांना आवडणारें हें शेत त्यांना कोणीं दिलें? ('वतनी' शब्दाचा अभ्यास घ्या.) या शेतांत गेल्यावर दिसणारें दृश्य "**भरदार शिवारामध्यें पिकें दाटलीं। उगवत्या भानुची प्रभा नभीं फांकली। बांधावर गवतें हिरवीं फोफावलीं —**" मुलांना वाचावयास सांगा आणि आपोआपच तें त्यांच्या डोळ्यासमोर चित्राप्रमाणें उभें राहील व त्यांतील सौंदर्य त्यांना ग्रहण करतां येईल. हें शेतांतील वैभव कोणाचें आहे? वनलक्ष्मीच्या वैभवाचें स्वागत कोणीं केलें? "खगांनीं तत्स्वागत गायिलें" कोणत्या रीतीनें? (खग स्पष्ट करणें)

शेतांमध्यें वैभव निर्माण होण्यास कोणाची मदत झाली?

"**वरुणकृपेचा विलास ऐसा पाहुन मनमोहन; वाटलें चित्तीं मजलागुन**"

या वैभवामुळें कवीला काय वाटलें? वाचा बरें कवीच्या इच्छा—

"**कोपऱ्यावरिल त्या आम्रतरूच्या तळीं। मृदु तृणांकुरांची मखमल गादी भली। बुंध्यास टेकुनी, चक्रवर्ति जणुं बळी। भूक लागतां चटणी किंवा कांदा अन् भाकर। खाउनी द्यावी वर ढेंकर॥**"—

कवीला कुठें बसावें असें वाटतें? कोणत्या पदार्थांची इच्छा होते? मखमलीच्या गादीवर, झाडाच्या बुंध्याला टेकून बसतांना त्याला स्वतःविषयीं काय वाटतें? 'चक्रवर्ति बळी' म्हणून घेण्यांत विशेष काय? (शिक्षकानें स्पष्ट करणें जरूर आहे.)

राजाप्रमाणें आरामांत बसून खावें-प्यावें अशीच आळशी वृत्ति कवीस आवडते काय? कोणतीं कामें करावीं असें वाटतें? त्याच्या बैलांचीं नांवें काय आहेत? त्याला संतोष वाटणारें वैभव कोणतें? धान्याची रास पाहून संतोष कां वाटावा? त्या संतोषानें आणि श्रमानें तो कुठें झोंपण्यास तयार आहे? (वाकळ—स्पष्ट करा.) घोंगडीवर झोंपला तरी कोणत्या गोष्टींनीं आनंद वाटतो?

नॉ. दि.



"वर चंद्रतारकामंडित हें अंबर। पायथ्यास पडुनी वाघ्या करि गुर्गुर ! वाजती गळ्यांतिल बैलांचे घुंगुर !"

निसर्गांतील सौंदर्य, वाघ्या व धुमाळ–बाळ्या यांचा सहवास, यामुळें कोणत्या धंद्यांत सुख आहे अशी खात्री होते ? शेतकींतलें सुख कोणत्या धंद्यापेक्षां जास्त आहे ? हें निश्चित सांगणारा शब्द कोणता ? ("लाख पटींनीं हें न सुखद कां कृषिकर्मी राबणें ! नको तें परवशतेचें जिणें !") कवीला कोणत्या गोष्टीचा तिटकारा आहे ? कां ?

शेतकींतील हीं सुखें अनुभवणारे यशवंत काय सांगतात ? पुन्हा एकदां कवितेचें वाचन हवें. मात्र हें वाचन विद्यार्थ्यांकडून होऊं द्या !

या उदाहरणांवरून कवितेचें अध्यापन कोणत्या दिशेनें व्हावयास पाहिजे याची कल्पना येईल. पण एक अशी शंका घेतली जाईल कीं, हीं उदाहरणें अर्वाचीन कवितांचीं आहेत. शाळेंत जुनी कविता शिकवावी लागते. प्रत्येक इयत्तेंत तुकारामाचे अभंग, मोरोपंतांच्या आर्या घ्यावयाच्या असतात. तेथें अध्यापन कसें करावयाचें ? त्यासाठीं आपण एक उदाहरण घेणें जरूर आहे. मोरोपंतांचा सहाव्या इयत्तेसाठीं हा उतारा पहा :—

बहु दिवसांची आशा तत्काळ च्छेदितां कचें रुष्टा ।
शुक्रसुता त्यासि म्हणे, " रे कपटपटो ! भला भला दुष्टा ॥१॥
ऐक कृतघ्ना ! जरि मी, 'उठवाचि मदर्थ या हता, शतदा ।'
ऐसें गुरुसि न म्हणत्यें कैसा उठतास तूं हताश ! तदा ?" ॥२॥
मलिन, कुटिल, नीरस, जड, अजड पुनर्भवपणेंहि कच साच ।
धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि; नाम कच साच ॥३॥
न करीं विफळ मदाशा; आशा भंगूं नयेचि साधूंनीं ।
जरि भंगशीच, विद्यासिद्धि नसो, जीस नेसि साधूनी ॥४॥

कचहि म्हणे, " गुरुवेदानुज्ञा नाहीं; म्हणोनि या कर्मा ।
मान्य नसे मी, शापीं; कीर्तिकरचि शाप न चुकतां धर्मा ॥५॥
पढवीन ज्यासि विद्या ही त्यासि फळेल तूंहि घे शाप ।
तुज कोणीही ऋषिसुत न वरील फळो तुझें तुला पाप " ॥६॥
( आर्याभारत—आदिपर्व )

आदिपर्वांतील कच–देवयानी आख्यानांतील हा सहा आर्यांचा उतारा निवडला आहे. विद्यार्थ्यांना—सहाव्या इयत्तेंतील तरी—कच-देवयानी प्रकरण गोष्टरूपानें सहजच माहिती असेल, तेव्हां त्याबद्दल शिक्षकानें पूर्वतयारी म्हणून स्थूलप्रश्न विचारण्यास हरकत नाहीं व नंतर हा उतारा वाचावा. उताऱ्याचें वाचन झाल्यावर त्यांतील प्रसंग कोणता आहे तो विचारावा. कच देवयानीचा निरोप घेत आहे व त्या वेळचा हा प्रसंग आहे ही भूमिका समजणें जरूर आहे. " कच निरोप घेण्यासाठीं आला असतांना देवयानीनें काय संबोधनें वापरलीं ? " " कपटपटो, दुष्टा, मलिन कृतघ्ना, इत्यादि. " " हीं दुरुत्तरें करण्याचें कारण काय ? " " देवयानी रागावली होती. " " देवयानी कां रागावली ? " " तिच्याशीं कच विवाह करण्यास तयार नव्हता. " " रागावल्यामुळें देवयानीनें काय शाप दिला ? " " तुला विद्यासिद्धि नसो. " " त्यावर कचानें काय उत्तर दिलें ? " " तुझ्या शापाची मला बाधा होणार नाहीं. मी दुसऱ्याकडून कार्यभाग करीन. उलट कोणीही ऋषिकुमार तुझ्याशीं लग्न करणार नाहीं असा मी तुला शाप देतों. "

मोरोपंतांनीं हा सर्वच प्रसंग समर्पक भाषेंत रंगवला आहे. आपण पुन्हा वाचूं या. मूकवाचन करण्यास सांगा. नंतर सूक्ष्म अभ्यासासाठीं प्रश्न विचारा : देवयानीनें फार दिवस कोणती इच्छा बाळगली होती ? ही लग्नाची इच्छा कचाजवळ प्रकट केल्यावर काय झालें ?

व अशा तऱ्हेच्या ग्रामीण जीवनांतील रम्य प्रसंगावरील कविता वाचण्याचा मोह त्यांना निर्माण होईल.

कै. तांबे यांची " भयचकित नमावें तुज रमणी ! " ही कविता इंग्रजी चवथ्या इयत्तेंत घ्यावयाची आहे. कवितेचें वाचन झाल्यावर कवितेंतील मध्यवर्ती कल्पनेची छाप त्यांच्यावर किती प्रमाणांत बसली आहे त्याचा पडताळा घेणें जरूर आहे. ही कविता एकाद्या प्रसंगावर उभारली नाहीं तर एका विचारावर उभारली आहे, आणि या दृष्टीनें तो विचार ग्रहण झाल्याखेरीज त्यांची पुढील कल्पना समजणें शक्य होणार नाहीं. स्त्रीचें महत्त्व अत्यंत आहे हीच मध्यवर्ती कल्पना प्रथम विद्यार्थ्यांना आकलन झाली असली तर मग निरनिराळ्या प्रसिद्ध पुरुषांची जन्मदात्री अशी स्त्रीच आहे, जगाचा भूत, वर्तमान व भविष्य काळाचा इतिहास घडविण्याचें सामर्थ्य स्त्रीचेंच आहे आणि नाजुकता व सौंदर्य यांची पूर्ण मूर्ति स्त्रीच आहे या विविध कल्पनांनीं मध्यवर्ती विचाराचें पोषण कसें केलें आहे त्याचा आस्वाद घेणें शक्य होईल व मग कवीची स्त्रीबद्दल आदराची वृत्ति पटेल आणि सामान्य लोक स्त्रीची करीत असलेली उपेक्षा पाहून त्यांस चीड येईल.

शिक्षकानें मध्यवर्ती कल्पना जर विद्यार्थ्यांना समजावून देण्यास मदत केली नाहीं तर क्षुल्लक गोष्टींचेंच महत्त्व विद्यार्थ्यांना वाटेल. क्षुल्लक गोष्टी—अलंकारादि—यांचा अभ्यास स्वतंत्र स्वरूपासाठीं नसून मध्यवर्ती कल्पनेसाठीं आहे हें विसरून चालणार नाहीं. तांबे यांची कविता वाचल्याबरोबर शिक्षकानें असें विचारावयास हवें कीं, "कोणास उद्देशून ही कविता लिहिली आहे ?" "स्त्रीला उद्देशून आहे." "स्त्रीबद्दल कवीनें काय भाव व्यक्त केला आहे बरें ?"

"भयचकित नमावें तुज रमणी." "मनुष्यानें घाबरून स्त्रीला वंदन कां करावें?" "स्त्रीचें सामर्थ्य फार मोठें आहे असें कवीला वाटतें." ठीक आहे. 'कोणत्या बाबतींत स्त्रीचें सामर्थ्य आढळेल व तीं श्रेष्ठ ठरेल असें कवीस सांगावयाचें आहे?" "जगश्रेष्ठ लोक स्त्री निर्माण करते, भूतकाळाची घडामोड, चालू प्रसंग व भावी काळ स्त्री उत्पन्न करणारी आहे व सौंदर्य, कोमलता व तेज यांतही जगांत स्त्रीच श्रेष्ठ आहे." "या श्रेष्ठतेचा परिणाम काय झाला?" "कवीचा आदरभाव व्यक्त होतो." "सामान्य लोकांची स्त्रीबद्दल काय कल्पना आहे असें कवि म्हणतो?" "जन कसे तुडविती तुज चरणीं."

येथें कवितेची स्थूल कल्पना विद्यार्थ्यांना आली असें मानण्यास हरकत नाहीं. यानतर कविता पुन्हां वाचावी किंवा विद्यार्थ्यांना वाचावयास सांगावी व स्त्रीचें महत्त्व बारीक सारीक मुद्यांतून कसें दिसून येतें हें प्रश्नद्वारें काढून घ्यावें.

**महाकवी, तत्त्वज्ञ, भूपती। समरधुरंधर वीर धीरगति।**
**स्थितप्रज्ञ हरि उरीं कोंडिती। प्रसव तयांचा तूं जननी॥ १॥**

"ह्या कडव्याचा अभ्यास घेतांना अर्थातच कोणत्या लोकांना स्त्री जन्म देते? महाकवी झालेले कोण? तत्त्वज्ञ कोण? भूपतींचीं नांवें द्या बरें. दोन रणशूरांचीं नांवें सांगा.—परमेश्वराला हृदयांत ठेवणारे कोण संतलोक झाले? या सर्व रणशूर, कवी, संतादि नररत्नांना जन्म देणाऱ्या स्त्रीविषयीं आपणांस काय वाटेल? अशा रीतीनें स्त्रीचें महत्त्व पटवून दिलें आहे. दुसऱ्या कडव्यांत स्त्रीचें महत्त्व कोणत्या बाबतींत गाइलें आहे? वाचा बरें तें कडवें."

**भूत निघाला तव उदरांतून। वर्तमान घे अंकीं लोळण।**
**भविष्य पाही मुली, रात्रंदिन। तव हांकेची वाट मनीं॥ २॥**

"स्त्रीच्या उदरांतून भूतकाळ निघाला असें कवीस कां वाटतें? मागें घडलेले प्रसंग म्हणजेच भूतकाळ होय. हे प्रसंग कोणीं निर्माण केले? युद्ध, तह, नगरें, उद्यानें, किल्ले, राज्यें ह्या घडामोडी कोणीं केल्या? मग स्त्रीचें मोठेंपण कुठें?" "या कर्तृत्ववान् माणसांना स्त्रीनें जन्म दिला." कांहीं उदाहरणें सांगा बरें? "शिवाजीनें मराठेशाही स्थापिली, नेपोलियननें युरोपांत साम्राज्य बनवलें—पण त्यांना स्त्री कारणीभूत झाली आहे. आजचे पुढारी स्त्रीनें निर्माण केले व उद्यांचे पुढारी स्त्रीच निर्माण करील." भविष्यकाळ कोणाची वाट पहात आहे? "स्त्रीच्या हांकेची." "यावरून कवीस काय सुचवायचें असावें?" "स्त्रीची सर्व काळावर सत्ता आहे."

स्त्रीचें सामर्थ्य आपण पाहिलें, आतां याशिवाय स्त्रीचें महत्त्व कोणत्या बाबतींत दिसून येतें? "सौंदर्यांत स्त्री श्रेष्ठ आहे." "कवीनें कोणते दाखले देऊन स्त्रीसौंदर्याची थोरवी सिद्ध केली आहे?"

**तुझ्या कान्तिनें चंद्र झळझळे। फुलां फूलपण मुली, तुजमुळें।**
**रत्नीं राग तुझा गे उजळे;। तुझ्यास्तवच ही प्रिय भगिनी ॥ ३ ॥**

"चंद्राला तेज कां प्राप्त झालें? तर स्त्रीमुळें." "स्त्रीमुळें आणखी कोणाचा फायदा झाला?" "फुलांना फूलपण मिळालें." "फूलपण म्हणजे काय?" "फुलांतील प्रमुख गुण कोणता?" "सुवास आणि नाजुकता", "ठीक. मग या ओळींच्या द्वारें काय प्रगट केलें आहे?" "चंद्राला तेज स्त्रीमुळें आलें, फुलाला कोमलता आली व रत्नांना स्त्रीमुळेंच तेज-रंग प्राप्त झाले. सौंदर्याच्या या वेगळ्या वाटणाऱ्या गोष्टी फक्त स्त्रींतच एकवटल्या आहेत म्हणून स्त्री श्रेष्ठ होय!

ह्या स्त्रीबद्दल सामान्य मत कसें उपेक्षेचें आहे बरें!—पण कवीस

काय वाटलें तें पहा– आणि म्हणूनच त्यास म्हणावेंसें वाटतें कीं– " भयचकित नमावें.... " पण कोण म्हणून दाखवील बरें तुमच्या पैकीं हें ? विद्यार्थ्यांकडून म्हणवून घ्या व थांबा.

येथें नमूद केलेल्या दोन कवितांच्या उदाहरणांवरून हें सहज कळून येईल कीं, कवितेस आधारभूत असणारा प्रसंग अथवा भावना अथवा विचार प्रथमतःच विद्यार्थ्यांना समजला पाहिजे. तो समजला गेला कीं त्याच्या अनुरोधानें सूक्ष्म अभ्यास घ्यावा लागतो. यशवंत कवींची " शेतकींतील सुख " ही एक निसर्गसौंदर्य प्रकट करणारी कविता घ्यावयाची असेल तर त्यांतील दोन प्रमुख गोष्टींकडे शिक्षकानें लक्ष वेधलें पाहिजे. " शेतकीमध्यें कोणतीं सुखें कवीला आढळतात ? या सुखांमुळें कोणता एक निराळा विचार त्यांना सुचतो ? " या प्रश्नाच्या द्वारें कवितेंतील सौंदर्याचा व विचाराचा आस्वाद विद्यार्थ्यांना घेतां येईल.

कवितेच्या अध्यापनांत अनेक प्रसंगीं, ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे, भावी शिक्षकांचे, पाठ घेतांना असें आढळून आलें आहे कीं, मध्यवर्ती विचार काढून घेतल्यावर, त्याचा परिपोष इतर प्रश्नांनीं करतांना होत असलेला सूक्ष्म अभ्यास जरा विस्कळीत स्वरूपांत घेतला जातो व त्यांच्यांत संबंध राखला जात नाहीं; त्यामुळें कृत्रिमता वाढून रसाचा हवा तसा उठाव निर्माण होत नाहीं. ' शेतकींतील सुख ' या कवितेचा अभ्यास कसा व्हावयास पाहिजे तें समजावें म्हणून त्या पाठाची रूपरेषा मुद्दाम द्यावीशी वाटते.

शिक्षकानें प्रारंभीं विद्यार्थी शेतावर जातात कीं नाहीं, तेथें गेल्यावर कोणत्या गोष्टींनीं त्यांना आनंद होतो इत्यादि प्रश्न विचारून यशवंतांना शेतकींत काय आनंद वाटतो तो सांगणारी एक सुरेख कविता अभ्यासण्याचा हेतु स्पष्टपणें निवेदन करावा आणि

कचानें तत्काळ नकार दिल्यामुळें काय परिणाम झाला? देवयानी रागावली यासाठीं कोणता शब्द आला आहे? (रुष्टा, शुक्रसुता हे शब्द फळ्यावर लिहा व स्पष्ट करा.) तिचा राग कोणत्या रीतीनें बाहेर पडला? कचाला उद्देशिलेल्या शब्दांतून, तिनें 'कृतघ्न' हा शब्द कचाला कां वापरला? कचावर तिनें केलेला उपकार त्यानें स्मरला नाहीं म्हणून. कृतघ्न कोणाला म्हणतात? त्याच्या उलट शब्द कोणता? देवयानीनें कचावर काय उपकार केला होता? कच अनेक वेळां मारला गेला असूनही देवयानीनें शुक्राचार्यांकडून त्यास संजीवनीद्वारें जिवंत केलें या गोष्टी विद्यार्थ्यांकडून काढून घेणें—न आल्यास स्वतः सांगणें. कचाला जिवंत करण्याची विनंति कोणीं कोणास केली? तशी विनंति देवयानीनें केली नसती तर काय झालें असतें? हें उदाहरण (उपकाराचें) देण्याचें कारण काय? कृतघ्न कचासारखें दुसरें कोणतें उदाहरण देवयानी सांगते? कच व केंस यांना लागू पडणारे शब्द व त्यांतील कल्पना कोणत्या? "मलिन, कुटिल, नीरस, जड, अजड, पुनर्भवपणेंहि कच साच। धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि; नाम कच साच॥" प्रत्येक शब्द दोन अर्थ सांगतो व त्यामुळें कच व केंस यांना या कल्पना लागू पडतात हें फळ्यावर स्पष्ट करून देणें. अशा तऱ्हेनें एकाच शब्दाचे दोन अर्थ झाल्यामुळें कोणता अलंकार दिसून येतो? श्लेष स्पष्ट करणें. देवयानीनें करुणवाणीनें काय सांगितलें? आशा विफळ कोण करीत नाहीं असें ती बजावते? "आशा भंगूं नयेचि साधूंनीं" या द्वारें काय सुचविलें आहे? "तूं सज्जन असलास तर मला निराश करूं नकोस." कच जर तयार नसेल तर कोणता शाप ती देण्यास तयार होते? "आशा नष्ट केलीस तर जी संजीवनी विद्या प्राप्त करून (साधूनी—साधणें) तूं जात आहेस तिचा तुला उपयोग

होणार नाहीं." या ठिकाणीं यमक कसें सुरेख साधलें आहे तें पहा. यावर कचानें नकार देण्याचें कारण काय सांगितलें? "गुरुलोक व शास्त्रें यांना हा विवाह संमत नाहीं." गुरुलोक, वडीलधारे व शास्त्रें यांना विवाह मान्य नसण्याचें काय कारण असावें? तीं दोघें सहोदर होतीं हें नातें उलगडून दाखवणें. "शास्त्राधारामुळें कचाला शापाविषयीं काय वाटतें?" "धर्माचरण करणाऱ्यांना शाप हा दोष नसून कीर्तिदायक भूषण आहे." "ह्या शापामुळें होणारें नुकसान कच कसें टाळणार आहे?" दुसऱ्याला विद्या शिकवून, त्याद्वारें तिचा उपयोग करून घेण्याचे बेत तो करतो. "अकारण शाप मिळाल्यामुळें कचाला काय वाटलें असेल? राग आल्यामुळें कच तिला शेवटीं काय म्हणाला?" "अकारण शाप दिल्याचें फळ भोग. हा घे माझा शाप—तुला कोणीही ऋषिकुमार पत्करणार नाहीं."

या उताऱ्यावरून देवयानी व कच यांचे काय स्वभावधर्म आढळतात? संभाषणचातुरी हीच! मोरोपंत संवादात्मक आर्या किती सुरेख लिहितात तें पहा. याशिवाय कवीचे कोणते गुण दिसतात? सुभाषितें कोणतीं आवडलीं? "आशा भंगूं नयेचि साधूंनीं" व "कीर्तिकरचि शाप न चुकतां धर्मा" स्पष्ट करणें. कोणते अलंकार आवडले? यमक व श्लेष त्यांचा खुलासा करून, वाङ्मयाची मौज कशी वृद्धिंगत झाली हें स्पष्ट करणें.

विद्यार्थ्यांकडून कविता पुन्हां म्हणवून घ्या म्हणजे झालें!

* * *

आतांपर्यंत चार कवितांच्या अध्यापनाचा आराखडा आपण पाहिला. यावरून कवितेचें प्रभावी वाचन झालें म्हणजे कविता शिकवूं नये हें मत फारसें ग्राह्य नाहीं हें विधान सहजच पटेल व

कवितेचा आस्वाद पूर्णपणें विद्यार्थ्यांना मिळण्यासाठीं मदत म्हणून अध्यापनाची जरूरी आहे या मुद्याचा पडताळा पटेल. कवितेचें वाचन प्रथमत: झालें कीं विद्यार्थ्यांच्या मनावर कवितेचे जे ठसे उमटतात, ते स्पष्ट करण्याचें कार्य व त्यांत रंग भरण्याचें कार्य अध्यापनद्वारें करावयाचें असतें. मात्र हें अध्यापन करतांना एक काळजी घ्या—अन् ती म्हणजे तुमचें अध्यापन व त्यांतील कथन किंवा प्रश्न यांना कवितेच्या तासाच्या दृष्टीनें मर्यादा आहे हें विसरूं नका. मर्यादेबाहेर होणारें कथन कंटाळवाणें व रसभंगकारक ठरतें, तर प्रश्नांची तीव्र व बेसुमार सरबत्ती विद्यार्थ्यांना भांबावून सोडते. ते गोंधळतात व काव्यानंदाचा आस्वाद घेण्यास असमर्थ ठरतात. शिक्षकानें कवितेविषयीं अनुकूल ग्रह होईल असें धोरण ठेवणें जरूर आहे व वातावरणही कवितेच्या मध्यवर्ती कल्पनेस पोषक ठेवणें जरूर आहे अनौचित्यकारक प्रश्न व सूचना रसभंग करण्यास मदत करतात हें प्रत्यक्ष घडलेल्या हकिकतीवरून स्पष्ट होईल. माधव ज्यूलियन यांची ‘दूरस्थ मातेस’ ही कविता चालू होती. त्यांतील आईच्या दर्शनानें काय परिणाम होतो हें दर्शविणाऱ्या ओळींचा अभ्यास घ्यावयाचा होता.

“प्रात:कालीं अतां तुझें नच घडे सुस्निग्ध तें दर्शन,
कीं ज्याच्या शकुनें सबंध मग तो जावा सुखाचा दिन.”

शिक्षकानें विचारलें कीं, आईच्या दर्शनाचा काय परिणाम होतो? समजा जर सकाळीं उठल्यावर झाडूवालीचें दर्शन झालें तर काय परिणाम होईल? हा प्रश्न विचारल्याबरोबर वर्गांत एकच हंशा होऊन रसभंग झाला व जो एक करुण-गंभीर वातावरणाचा ठसा उमटला होता तो नाहींसा होण्याचें मात्र कार्य झालें. यासाठीं

औचित्य हवें; औचित्य पाळलें गेलें नसल्यामुळें कवितेंतील रसभंग झाल्याचीं किती तरी उदाहरणें देतां येतील. एका शिक्षकानें "कीं फोडिला तरु फुटे आणखी भरानें" ह्या चरणाच्या स्पष्टीकरणासाठीं न्हाव्यानें कटिंग किंवा 'गोटा' केला तरी केंस वाढतात हें व्यावहारिक उदाहरण साभिनय सांगितलें. एका शिक्षकानें गोविंदाग्रजांची 'काळ' ही कविता घेतांना व त्यांतील प्रश्नालंकाराचा विशेष ठसा उमटावा म्हणून, प्रत्येक चरणांतील क्रियाविशेषण व क्रियापद शोधण्यास सांगितलें. चार-पांच मिनिटें चर्चा झाली तरी व्याकरण संपण्याचीं लक्षणें दिसेनात! जुन्या कवींपैकीं तुकाराम अथवा मोरोपंत यांचे उतारे शिकवतांना तत्त्वज्ञानावर औचित्यशून्य प्रवचन केल्याचीं अथवा यमकादि अलंकारांच्या फोडीमध्यें घोटाळणाऱ्यांचीं उदाहरणें कांहीं कमी नाहींत.

वरच्या वर्गामध्यें एका कवितेच्या अध्यापनप्रसंगीं इतर कवितांचे उल्लेख करावे कीं नाहीं अशी शंका कांहीं शिक्षकांना येते. त्या शंकेचें निरसन असें करितां येईल कीं, जी कविता शिकवली जात असेल, त्या कवितेंतील एकाद्या कल्पनेसारखीच कल्पना, किंवा त्या विषयासारखाच किंवा तोच विषय जर दुसऱ्या कवीनें अन्य कवितेंत रंगवला असेल तर तुलनात्मक अभ्यास करण्यासाठीं दुसरी कविता अवश्य वाचावी व स्थूल रूपानें ती अभ्यासांत घेण्यांत यावी. मात्र हा अभ्यास किंवा हें वाचन त्या दुसऱ्या कवितेसाठीं नसून पहिल्या कवितेसाठीं पोषक म्हणून करावयाचें इतकें तारतम्य शिक्षकानें पाळलें पाहिजे. काव्याविषयीं वाढती अभिरुचि, विद्यार्थ्यांचें वय व धारणाशक्ति या लक्षांत घेऊन सहाव्या–सातव्या इयत्तेंत एकाच विषयावर निरनिराळ्या कवींनीं लिहिलेल्या कवितांचा संकलित स्वरूपांत अभ्यास घेणें हितावह ठरेल.

उदाहरण घेऊन सांगावयाचें झालें तर, प्रसिद्ध कवींनीं शारदा-वंदनपर लिहिलेल्या कवितांचा संग्रह करण्यास विद्यार्थ्यांना सांगा. विशेषत: 'शारदावंदन' विषयक यशवंत, गिरीश यांच्या कविता व सेनापति बापट यांची कविता यांचा "एकत्र व तौलनिक" अभ्यास फारच उद्बोधक ठरेल. शारदेचें रेखाटलेलें रम्य चित्र, कवींची लीनता व इच्छा या गोष्टी यशवंत, गिरीश यांच्या कवितेंत आढळतील. यशवंतांची भावविवशता, गिरीशांचें शब्दसौष्ठव त्यांच्या प्रत्ययास येऊं द्या आणि त्यांच्या भूमिकेपेक्षां सेनापतींची भूमिका निराळी कां वाटते यांचा ठसा त्यांच्या मनावर उमटूं द्या. 'वीणा घेऊन बसणाऱ्या शारदेला तरवार घेऊन लक्ष्मी हो' असें विनवणारें सेनापतींचें देशभक्तीपूर्ण अंत:करण त्यांना समजून घेण्यास मदत करा; म्हणजे कवीचें अंत:करण काव्यांतून कसें ओसंडत असतें याचें प्रत्यंतर स्वतंत्र प्रवचन न करतांही विद्यार्थ्यांना पटेल.

आई, प्रभातकाल, संध्याकाळ, अरुण इत्यादि विषयांवर किती तरी कविता कवींनीं लिहून ठेविल्या आहेत. त्यांचा संकलित व तुलनात्मक अभ्यास वरच्या वर्गांत जरूर घ्या. तुमचें अध्यापन या दृष्टीनें झालें कीं काव्याची अभिरुचि वाढूं लागलीच म्हणून समजा. या अध्यापनांत फार बोलूं नका; तात्त्विक चर्चा व उपदेश करूं नका. विद्यार्थी उत्तर देतांना चुकले तर त्यांच्यावर ओरडूं नका, मग रागावण्याचें व मारण्याचें नांव कशाला? तुमचा तोल तुम्हीं संभाळ-लांत, तरच विद्यार्थी तुमच्याबरोबर सहकार्य करूं शकतील व काव्यांतील आनंदाचा उपभोग घेण्यास समर्थ होतील. अशा तऱ्हेचें अध्यापन झालें कीं मुलांकडे पहा—त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता येईल, डोळ्यांत तेज तळपूं लागेल, ओठांवाटें काव्यचरण गुणगुणत बाहेर येऊं लागतील—मग ज्या विद्यार्थ्याला चांगलें म्हणतां येईल व म्हणून

दाखवण्याची इच्छा होईल त्याला वर्गासमोर येऊन मोठ्यानें म्हणण्यास सांगा. विद्यार्थ्यांस जर चांगलें चालीवर येत नसेल तर तुम्ही स्वतः म्हणा – आणि सर्व वर्गच उत्सुक असेल तर त्या वर्गासही सामुदायिकरीत्या म्हणण्याची संधि द्या !

---

## प्रकरण ७ वें : : कवितेच्या अध्यापनाची अखेरी

आतांपर्यंत कवितेचें वाचन व अध्यापन यांचें महत्त्व वर्णन करून प्रत्यक्ष पाठ घेतांना त्याचें स्वरूप कसें असावें याविषयीं खुलासा करण्यांत आलेला आहे. तुमच्या अध्यापनानंतर विद्यार्थ्यांमध्यें कवितेविषयीं आवड उत्पन्न होईल व ती कविता गुणगुणावी, अंतःकरण खोलून मोठ्यानें म्हणावी, अशी इच्छा सर्व विद्यार्थ्यांना निदान त्यांच्यापैकीं कांहीं विद्यार्थ्यांना तरी झाल्याशिवाय राहाणार नाहीं. अशी कविता मोठ्यानें म्हणण्याची इच्छा कां बरें निर्माण होते? या इच्छेचें कारण हें कीं, त्या कवितेंतील शब्दांचें सामर्थ्य; कवि–कल्पनेची जादू व त्यांतील रसाचा उठाव यांच्याशीं विद्यार्थी एकरूप होण्याच्या मार्गांत असतात. ही एकरूपता ती कविता मोठ्यानें म्हटली कीं प्रत्ययास येते व हा प्रत्यय अत्यंत आनंदकारक असतो. ह्या आनंदासाठीं कविता मोठ्यानें म्हणावी व म्हणून दाखवावी, स्वतःबरोबर इतरांना या आनंदाचें वांटेकरी करावें या इच्छेनेंच मुलें भारावलेलीं असतात. एकदां पांचव्या इयत्तेंत एका शिक्षकानें रा. वि. द. घाटेकृत “ गौरीशंकर व मानव ” ही कविता इतक्या तन्मयतेनें म्हटली व शिकवली कीं, विद्यार्थ्यांनीं शेवटचा तास होऊन शाळा सुटली तरी, ती कविता मोठ्यानें म्हणून दाखविण्याची संधी

देण्याविषयीं हट्टच धरला. केवळ शाळेंतील विद्यार्थ्यांचेंच कशाला? बालगंधर्वांचें कर्णमधुर संगीत ऐकून घरीं आल्यावर किंवा रा. वाटवे यांचा काव्यगायनाचा कार्यक्रम झाल्याबरोबर आपल्यापैकीं किती तरी जणांना नाटकांतील पदें व कवींच्या कविता म्हणण्याचा मोह झालेला आहे हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं.

या वेळीं शिक्षकाचें कर्तव्य कोणतें? विद्यार्थ्यांच्या उत्सुकतेवर विरजण घालण्याचें कीं त्यांच्या उत्साहाचें कौतुक करून त्यांना कविता मोठ्यानें म्हणून दाखवण्याची संधि देण्याचें? विद्यार्थ्यांना कविता मोठयानें म्हणून दाखविण्याची संधि दिली कीं सहजच दोन कार्यें होतात. एक-दोन वेळां वाचून व चिंतन करूनही कवितेचें रहस्य जें समजणार नाहीं तें ती कविता खुल्या आवाजानें म्हटली कीं सहज समजेल. आणि याशिवाय दुसरें महत्त्वाचें कार्य हें होतें कीं, कविता वाचून व ऐकून, आणि तिचें अध्ययन करून कवीचे जे भाव प्रभावानें आपल्या अंतःकरणांत प्रतिबिंबित होतात, त्यांना शब्दरूपानें व नादाच्या सहकार्यानें पुन्हां जिवंत व्हावें असें वाटत असतें. आपण कविता मोठयानें म्हटली कीं त्या भावनांच्या प्रकटीकरणास अवसर मिळतो व कविता अधिक चांगल्या रीतीनें समजली गेली असा आत्मविश्वास निर्माण होतो. कवितेविषयीं अभिरुचि वृद्धिंगत होण्यासाठीं, तिचें अर्थग्रहण आत्मविश्वासानें होण्यासाठीं, शिक्षकानें विद्यार्थ्यांना मदत करावयास पाहिजे आणि ही मदत विद्यार्थ्यांना कविता मोठयानें म्हणून दाखवण्याची संधि देऊनच होणार असते.

शिक्षकानें ही संधि दिली म्हणजे ‘ झालें आपलें काम ’ असें समजून भागणार नाहीं. विद्यार्थ्यांना कविता उत्तम रीतीनें वाचतां येण्यासाठीं शिक्षकानें मदत केली पाहिजे; कारण जरी हौस असली

तरी कवितेच्या उत्तम वाचनाखेरीज, उच्च आनंद विद्यार्थ्यांना मिळूं शकणार नाहीं. आपल्या विद्यार्थ्यांना उत्तम वाचन करतां यावें यासाठीं शिक्षकानें स्वतःच्या उत्तम वाचनाचा आदर्श सतत त्यांच्यापुढें ठेविला पाहिजे. विद्यार्थी जात्याच अनुकरणप्रिय असतात. शिक्षक जर अडखळत, चुकतमाकत, मधूनमधून स्वतःचे शब्द दडपून, अत्यंत वेगानें किंवा अत्यंत संथपणें वाचन करील अथवा वाचतांना चोरटा आवाज काढील, तर विद्यार्थ्यांपुढें काय आदर्श राहणार आहे? किंबहुना शिक्षकाच्या अशा वाचनानें; काव्य म्हणावें अशी तरी त्यांना इच्छा होईल कीं नाहीं याचीच शंका वाटते. यासाठीं शिक्षकाचें वाचन सुरेल, चालीवर, सुस्पष्ट व भावपूर्ण आणि सहजगत्या ओघपूर्ण झालें तरच तें आदर्श मानतां येईल. कविता जिवंत आहे ह्या वाचनाच्या अपेक्षेविषयीं मागें एका प्रकरणांत साविस्तर खुलासा केलेला आहेच;* पण येथें पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही त्याविषयीं चर्चा करण्याचा मोह होतो याचें प्रमुख कारण म्हणजे शिक्षकांना वाचन चांगलें करतां येत नाहीं असा आलेला अनुभव हें होय! वाचनाची तयारी करावी लागते या गोष्टीवर आमच्या शिक्षकांचा विश्वास नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. आपण जी कविता वाचणार आहोंत तिच्यांतील भावना काय आहे, रस कोणता आहे, भाषा कोणती वापरली आहे, भाषेंतील शब्द व त्यांचा निश्चित अर्थ काय आहे याविषयीं शिक्षक तयारी करीत नाहींत असेंच म्हटलें पाहिजे. आणि मग या गोष्टींची तयारी नसलेला शिक्षक ती कविता कितपत परिणामकारक रीतीनें वाचूं शकेल? याबद्दल आलेला अनुभव दोन-तीन उदाहरणांनीं स्पष्ट केल्याशिवाय राहवत नाहीं.

---

* प्रकरण ५ पहा.

कवि गिरीश यांची 'भलरी' ही ग्रामीण किंबहुना शेतकरी जीवन रंगविणारी कविता शिक्षकानें शिकवण्यास घेतली. त्या कवितेच्या वाचनाची तयारी केली नसल्याचा पुरावा तत्काळ पटला. कारण त्यांतील शब्द कसे उच्चारावे हेंच त्यांना कळेना. कुणबाऊ भाषा उच्चारानुसार लिहिली होती—उत्तम नव्हेच पण सरळ व स्पष्ट वाचन करणेंसुद्धां जमलें नाहीं, मग त्यांतील कुणबाऊ शब्दांचा अर्थ अथवा जानपद संकेत माहित असण्याचा संभव कुठचा? जानपद गीतें वर्गांत घेण्यापूर्वीं अपरिचित शब्द, भाषेचें विशिष्ट प्रकारचें उच्चारण, शेतकरी–समाजाचे संकेत यांचा अभ्यास जर शिक्षकानें केला नसेल तर काव्यांतील रसाचा भंग होणारच! जोंधळ्याला 'राजा' मानणाऱ्या श्रमजीवि शेतकऱ्याचें चित्र उभें करण्याचें कवीचें सामर्थ्य कसें प्रतीत होणार?

केवळ जानपद गीतांचेंच नव्हे, तर इतर कवितांच्या अध्यापनांतही असाच अनुभव आलेला आहे. रे० टिळक यांची 'बालकाची जिज्ञासा' ही कविता पांचव्या इयत्तेत शिकवली जात होती. त्यांतील पहिलीच ओळ—"ईषत् प्रफुल्ल सुमना करिं खेळवावें—" ईषत् या शब्दाचा अर्थ ईश्वर आहे असें ठासून सांगण्यांत आलें. शब्दांचे निश्चित अर्थ शोधावयाचे नाहींत आणि वर्गांत अंदाजानें कांहीं तरी अर्थ दडपून द्यावयाचे ही बळावत जाणारी वृत्ति वेळींच आवरली पाहिजे.

शब्दांचा अभ्यास स्वतः शिक्षकानें केला पाहिजे. त्याचप्रमाणें विरामचिन्हें व छंदशास्त्राचें सामान्य ज्ञान त्यास अवगत असणें जरूर आहे. केवळ एका विरामचिन्हामध्यें अर्थ निर्माण करण्याचें किंवा बदलण्याचें सामर्थ्य असतें हें विसरून चालणार नाहीं. कविता वाचीत असतांना चरणांत अथवा चरणाच्या अंतीं असलेल्या चिन्हा-

नुसार योग्य तितकें थांबणें परिणामकारक असतें. त्याचप्रमाणें चरणांतील लघु–गुरु शब्दांचें महत्त्व वाचनाद्वारें उमटलें पाहिजे. दिंडी, हरिणी, मंदाक्रांता हीं वृत्तें शोकरसाला पोषक होतात याचें रहस्य वरच्या इयत्तांतील विद्यार्थ्यांना उलगडून सांगतां आलें पाहिजे. सयमक व निर्यमक कवितांचा श्रुतींवर काय परिणाम होतो हें स्पष्ट करणें जरूर आहे. आणि या गोष्टी जर अवश्य आहेत तर त्या तयारीशिवाय कशा सिद्ध होतील? चरणांतील यतीवर थांबण्याचें माहित नसेल तर वाचन अर्थग्रहणाच्या दृष्टीनें कितपत यशस्वी ठरेल?

वर उल्लेखिलेल्या गोष्टी, केवळ शिक्षकांपुरत्याच मर्यादित नाहींत. विद्यार्थ्यांना त्या गोष्टी माहीत असावयास पाहिजेत. आणि जर माहीत नसतील तर शिक्षकानें त्यांना त्या समजण्यासाठीं मदत केली पाहिजे. उत्तम वाचन करणें कठीण आहे; यासाठीं वाचनापूर्वीं विद्यार्थी उत्तम बोलूं शकतो कीं नाहीं याचा पडताळा शिक्षकानें घेतला पाहिजे. उत्तम भाषण व संभाषण करणें हा वाचनाचा पाया होय. अर्थपूर्ण, शुद्ध, स्पष्ट व ओघमय भाषण करण्याची कला शिक्षकानें प्रथम विद्यार्थ्यांना शिकवली पाहिजे. भाषण किंवा संभाषण करण्यांत हे गुण आले कीं त्यांचा विनियोग वाचनांतून आपोआपच होऊं लागेल. कवीच्या भावना जिवंत स्वरूपांत निर्माण करण्याचें प्रभावी साधन म्हणजे वाचन होय. हें वाचन एका दिवसांत उत्तम होणार नाहीं. त्यासाठीं सतत अनेक वर्षें प्रयत्न केला पाहिजे. वाचनाचे तास मुद्दाम ठरवले पाहिजेत. साप्ताहिक, मासिक व सहामाही वाचनाच्या स्पर्धेचे प्रसंग आंखले पाहिजेत. वारंवार दुरुस्ती करून, उत्तेजन देऊन, मार्गदर्शन करून त्यांच्या प्रगतीची नोंद ठेवली पाहिजे आणि असे प्रयत्न करून उत्कृष्ट वाचनाची संवय दृढमूल केली पाहिजे.

हें काम एका शिक्षकाचें नाहीं, एका कवितेच्या पाठापुरतें नाहीं; तर तें काम प्रत्येक शिक्षकाचें आहे व प्रत्येक जातीच्या व विषयाच्या पाठांत थोडेंफार करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. शिक्षकानें या महत्त्वाच्या गोष्टीकडे कवितेच्या प्रत्येक पाठाला लक्ष पुरवलें पाहिजे आणि विद्यार्थ्यांना कविता मोठ्यानें म्हणून दाखविण्याची संधि दिली पाहिजे. विद्यार्थ्यांना कविता वाचतांना दोन दोष जडणार नाहींत याविषयीं शिक्षकानें जागरूकता ठेवली पाहिजे. यांपैकीं पहिला दोष म्हणजे म्हणण्यांतील कृत्रिमता होय. आपणांस कांहीं तरी निराळें म्हणावयाचें आहे अशी समजूत होऊन पुष्कळ विद्यार्थ्यांच्या म्हणण्याच्या पद्धतींत कृत्रिमता उत्पन्न झालेली असते. शिक्षकानें वारंवार विद्यार्थ्यांना बजावलें पाहिजे कीं, नेहमीं श्रम न घेतां, जसें तुम्ही बोलतां अथवा एखाद्या जिवलग स्नेह्याचें पत्र वाचतां, तसें तुम्हीं कविता वाचतांना म्हटलें पाहिजे. ही सहजता असणें फार महत्त्वाचें आहे. ही सहजता आली कीं रागानें, वात्सल्यानें, लोभानें, — जशी कविता रसरसली असेल त्या रीतीनें — विद्यार्थी कविता वाचतील व तिच्याशीं चटकन् समरस होतील. सहजगत्या कवीचे भाव प्रकट झाले असें म्हणतां येईल. साधारणतः ज्या विद्यार्थ्यांचा आवाज गोड नाहीं किंवा जे विद्यार्थी लाजरे वा एकलकोंडे असतात, त्यांच्या कवितावाचनांत मुख्यत्वें कृत्रिमता येण्याचा संभव असतो हें शिक्षकानें लक्षांत ठेवावें. यानंतरचा दुसरा दोष म्हणजे काव्यवाचनाच्या भरांत कांहीं विद्यार्थ्यांना गेयतेला प्राधान्य देण्याची इच्छा होते. साधारणतः ज्यांचा आवाज चांगला आहे त्या विद्यार्थ्यांना व विशेषतः विद्यार्थिनींना हा दोष जडतो. या गेयतेच्या भरीं गेल्यामुळें अर्थद्वारें आनंद मिळविण्याचा मार्ग बंद होतो. काव्य वाचावें, सुरेल व चालीवर म्हणावें, पण ताना व आलाप

घेऊन गायन करूं नये. तसें गायन केलें कीं त्या कवितेंत आणि तराण्यांत कांहींच फरक रहाणार नाहीं. आणि विद्यार्थ्यांना अर्थ-शून्य, भावरहित तराणा ऐकवणें हें कवितेच्या अध्यापनाचें उद्दिष्ट कधींच होणार नाहीं.

विद्यार्थ्यांच्या काव्य–वाचनांतील हे दोष उघडकीस आणण्याचें काम वर्गांतील इतर विद्यार्थ्यांना सांगावें. एकाद्या विद्यार्थ्याचें काव्य-वाचन आवडलें असल्यास तें कां आवडलें आणि न आवडल्यास कां नाहीं या प्रश्नाच्या द्वारें चर्चा करावी. विद्यार्थी परीक्षकाचें काम उत्तम करतील व आपोआपच ते इतरांचे जे दोष काढतील त्या दोषांपासून स्वतः अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतील. शिक्षकानें मात्र या दोषांकडे कडक टीका करून बघूं नये. उत्तेजन देऊन दोष कमी करण्याविषयीं नाजुक रीतीनें सुचवावें. दोषांवर स्पष्टपणें व रागानें टीका केली, दोषांबद्दल कुचेष्टा केली तर त्या प्रसंगानंतर विद्यार्थी कविता मोठ्यानें म्हणून दाखविण्याचें टाळतील व जरी त्यांच्या अंतःकरणांत ही इच्छा तीव्रतेनें उसळली तरी ती दाबली जाईल व काव्याविषयीं प्रेम कमी होण्यांत त्याचें पर्यवसान होईल.

केवळ अध्यापनासाठीं निवडलेल्या कविता विद्यार्थ्यांकडून वाचून घेतल्या म्हणजे खरें कार्य होणार नाहीं. वर्षाकांठीं दहा-बारा कविता झाल्या म्हणजे समाधान बाळगूं नका. तुम्हाला परीक्षेसाठीं अधिक कविता जरी शिकवावयाच्या नसल्या तरी काव्याच्या प्रेमानें अधिक कवितांचा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यास हरकत नसावी. प्रस्तुत लेखकानें याच दृष्टीनें वर्षभर प्रयत्न केला आणि जरी परीक्षेसाठीं तेरा कविता शिकवल्या गेल्या असें अभ्यासपत्रकांत नमूद केलें गेलें तरी उत्तम वाटणाऱ्या व विद्या-र्थ्यांच्या अभिरुचीची उंची सहज वाढविली गेली असेल अशा

निवडक पन्नास कवितांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिल्याचें समाधान त्यास मिळालें. शिक्षकानें केवळ स्वतःच्याच संग्रहांतील कविता वाचावी असें नाहीं; तर विद्यार्थ्यांना त्यांचे स्वतंत्र संग्रह करावयास सांगावेत आणि त्यांच्या आवडत्या कविता वर्गांत वाचून दाखविण्याची त्यांना संधि द्यावी. स्फूर्ति, संधि, दुरुस्ती व उत्तेजन या चार शब्दांचा भरपूर उपयोग शिक्षकानें करून घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या काव्याविषयीं आस्था बाळगा. हळूहळू त्या विद्यार्थ्यांचें काव्यप्रेम व वाढती अभिरुचि, संग्रहाच्या स्वरूपांत तुमच्यापुढें दिसूं लागेल. कवितेच्या अध्यापनाचें पर्यवसान जर या स्वरूपांत झालें तर तो शिक्षक यशस्वी मानावयास कांहींच हरकत नाहीं.

कवितेचें वाचन व कवितेचें अध्यापन या महत्त्वाच्या गोष्टींचा भरपूर ऊहापोह झाल्यावर फक्त एकच प्रश्न विचारांत घेतला जाणें इष्ट आहे. आपण तर नेहमीं हें पाहतों कीं, वर्षाकांठीं कोणत्याही इयत्तेंत दहा-बारा कवितांपेक्षां अधिक कविता शिकवल्या जात नाहींत. आणि येथें तर असें उल्लेखिलेलें आहे कीं भरपूर संख्येंत कवितांचे वाचन करून घ्यावें. या दोन विधानांवरून वाचनासाठीं निवडलेली कविता शिकवली गेली नाहीं तरी चालेल काय असा कोणी प्रश्न विचारतील. पण त्याचें उत्तर हें कीं, कवितेचें अध्यापन जरी दहा-बारा कवितांपुरतेंच असलें तरी अवान्तर कवितांची संख्या पन्नाससुद्धां असावयास हरकत नाहीं. ज्या वेळीं कवितांचें अध्यापन केलें जाईल, त्याचवेळीं अप्रत्यक्षरीत्या कवितेचा अभ्यास कोणत्या रीतीनें केला जावा याचे ठसे विद्यार्थ्यांच्या मनावर उमटले जातील व या ठशांच्या साह्यानें कितीतरी कवितांचा अभ्यास ते घरीं, दारीं, संधि सांपडेल तेथें व तेव्हां करूं शकतील. कवितेचें अध्यापन म्हणजे तरी काय? त्या अध्यापनाचें अंतिम उद्दिष्ट

एकाद्या विषयावर विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न करणें हें नाहीं तर विद्यार्थ्यांना सौंदर्य हुडकून आनंद मिळवण्याची संवय लावणें, काव्यद्वारें अभिरुचि वाढवणें व शब्दांचें नादमाधुर्य कळण्यासाठीं त्यांच्या कानाला तयार करणें हें होय. काव्याचेंच नव्हे तर कोणत्याही विषयाचें अध्यापन विद्यार्थ्यांना स्वावलंबी करण्यासाठींच असतें. आजचे शिक्षणशास्त्रज्ञ हेंच सांगत आहेत कीं, 'विषय शिकवूं नका तर विद्यार्थ्याला विषय कसा अभ्यासावा हें शिकवा.' "Teachers should make their pupils learn." या उक्तींतील मर्म हेंच आहे. परंतु हें तत्त्व आपल्या शाळा–कॉलेजांतून किती प्रमाणांत आचरणांत आलेलें आढळून येईल ? बहुतेक सर्व शाळा व कॉलेजें विद्यार्थ्यांना ज्ञानाची घोकंपट्टी करण्यासच उत्तेजन देत नाहींत काय ? सर्व शिक्षणपद्धतींवर व अभ्यासक्रमावर विद्यापीठ व विद्यापीठाच्या परीक्षा यांचाच पगडा बसलेला दिसून येईल. एकीकडे अध्यापन-शास्त्रांतील उच्च तत्त्वांचा शाब्दिक जयघोष आपण करीत आहोंत तर त्याच वेळीं कृतीनें अगदीं उलट टोंक गांठीत आहोंत.

उद्यांच्या जगाचे नागरिक तयार करण्यासाठीं, व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठीं आणि लहानपणापासून त्यांना शिक्षणद्वारें स्वावलंबी बनवून व्यापक दृष्टिकोन आणण्यासाठीं, अध्ययन–अध्यापनाच्या परिषदा भरविल्या जात आहेत आणि त्याच वेळीं शाळा-कॉलेजांतून चटकन् सुटून मिलिटरी अकाउंट्समधील नोकरी मिळेल यासाठीं विषयांची निर्जीव घोकंपट्टी करून घेतली जात आहे. आमच्या शिक्षणावर व जीवनावर उदात्त तत्त्वांपेक्षां पैशाचा व क्षणिक सुखाचा पगडा जास्त आहे यांत शंका नाहीं. मॅट्रिक हेंच ध्येय विद्यार्थ्यांच्या नजरेपुढें पालक स्वार्थासाठीं आणि शिक्षकवर्ग शाळेच्या व स्वतःच्या लौकिकासाठीं उभे करीत अस-

तात. जणूं मॅट्रिक होऊन पन्नास रुपये मिळवण्यापेक्षां जीवनांत अधिक विलोभनीय, रम्य व उदात्त शिल्लकच राहिलें नाहीं.

शाळेंतील शिक्षक म्हणतात कीं, वर्षभर दहा-बारा कवितांचा अभ्यास चांगला पाठ करून घेतला म्हणजे झालें; होईल तो पास व जाईल कॉलेजांत. तेथें त्यानें अधिक काव्य वाचावें. पण शाळा सोडून कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण किती अल्प आहे याची जाणीव तरी कोणास असते काय? फार कशाला, मॅट्रिक वर्गापर्यंत तरी पोहोंचणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येचें प्रमाण, मध्येंच शाळा सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षां किती तरी अल्प आहे. हिंदुस्थानसारख्या मोठ्या व दरिद्री देशांत शिक्षणाचें प्रमाण काय आहे? त्यापैकीं प्राथमिक शिक्षण तीन-चार इयत्तांत सोडून शेतकी व अन्य धंद्यांत पडणारे, व्हर्नाक्युलर फायनल होऊन पाटील-कुलकर्णी, कारकून अथवा मराठी शाळामास्तर बनणारे, इंग्रजीला आरंभ करून फीच्या अभावीं सोडणारे—असे विद्यार्थ्यांचे गट बघा आणि सांगा कीं, परीक्षेसाठीं दहा-बारा संख्येच्या आसपास शिकवलेल्या कविता त्यांना जन्मभर आनंद निर्माण करून देतील काय? ही शिदोरी किती दिवस पुरणार? या आयत्या शिदोरीपेक्षां, आपली भाकर स्वतः तयार करून खाण्याचा आनंद त्यांना नेहमीं उपभोगतां येण्यासारखा आहे यासाठीं भाकर स्वावलंबनानें कशी तयार करतां येईल हें त्यांना शिकवलें पाहिजे. कविता पुष्कळ मोठ्या संख्येनें वारंवार, दर वर्गांत वाचल्या जाऊं द्या; विद्यार्थ्यांना स्वतः निवडलेल्या कविता वाचण्यास संधि व उत्तेजन द्या—आपोआपच काव्यप्रेम उत्पन्न होईल. आणि हें प्राथमिक मराठी शाळेंतही शक्य आहे. शिक्षकानें विद्यार्थ्यांना मदत करावयाची ती या तऱ्हेनें. ही काव्यवृत्ति बाणली कीं तो विद्यार्थी लोहाराचें काम करो नाहीं तर कार-

कुनाचें काम करो, आपल्या फावल्या वेळीं कविता वाचीत बसेल. आपोआपच त्याच्या मनाला व जीवनाला उदात्तता व प्रसन्नता प्राप्त होईल. हा श्रेष्ठ काव्यानंद मिळविण्यास विद्यार्थी समर्थ करणें असें ध्येय कवितेच्या शिक्षकानें बाळगलें पाहिजे. कॉलेजांत सूक्ष्म अध्ययन करून टीकाशास्त्रांत पारंगत होऊन काव्याचे पांच अभ्यासू विद्यार्थी निर्माण करण्यापेक्षां लहर लागली कीं आवडत्या कवींच्या कविता गुणगुणणारे व अंतःकरण प्रसन्नतेनें भरून जीवनक्रम चालवणारे पांचशें काव्य-वाचक रसिक तरुण निर्माण करावयाचे आहेत याची जाणीव मराठी शाळामास्तरापासून विश्वविद्यालयीन प्राध्यापकापर्यंत सर्वांनीं बाळगली पाहिजे.

मराठी वाङ्मयांतील काव्याचें विशाल उद्यान फुलवण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वर-मुकुंदरायांपासून काणेकर-कुसुमाग्रजांपर्यंत विविध वृत्तींच्या, जातींच्या व पंथाच्या कवींनीं केला आहे तो कोणासाठीं? पदवी-परीक्षेसाठीं शब्दच्छल व घोकंपट्टी करण्यांत दंग होणाऱ्या पांच-पन्नास विद्यार्थ्यांसाठीं खास नव्हे; तर जीवनाचा मार्ग आक्रमण करणाऱ्या हजारों पथिकांना आनंद व उत्तेजन देण्यासाठींच होय. शाळेच्या या छोट्या जगांत वावरणाऱ्या विद्यार्थ्यांचें लक्ष त्यांच्या आजूबाजूस पसरलेल्या अभंगांकडे, ओव्यांकडे, सुनीतांकडे, पोवाड्यांकडे, भावगीतांकडे वेधण्याचें काम शिक्षकाचें आहे. योग्य तें मार्गदर्शन करा आणि मग तुमचे विद्यार्थी या विशाल उद्यानांतील रम्य फुलें हर्षभरानें आपल्या परडींत वेंचण्यासाठीं किती आतुर झालेले असतात याचा अनुभव घ्या!

मागील प्रकरणांत हें सांगण्यांत आलें कीं, विद्यार्थ्यांना संधि द्या म्हणजे त्यांना रम्य वाटणाऱ्या कवितांचा संग्रह त्यांनीं केलाच. ह्या संग्रहानें त्यांच्या मनाला वारंवार आनंद होईल यांत शंका नाहीं. पण या आनंदापलीकडे उडी मारून जें अंतिम सत्य त्या कवितांमध्यें दडलें असतें त्याचाही शोध व बोध विद्यार्थ्यांना होण्यास शिक्षकानें मदत केली पाहिजे. किंबहुना कवितेचा जो अध्यापक असेल, त्याचें काव्यांतील सौंदर्यावर प्रेम असावयास पाहिजेच, पण त्याहीपेक्षां काव्यांतील शाश्वत सत्यावर त्याची दृढ श्रद्धा असावयास पाहिजे. काव्याच्या वाचनानें जो आनंद होतो तो केवळ कवितेंतील नादमाधुर्यानें नव्हे अगर कवीच्या अफाट कल्पनाविलासामुळें किंवा भावनेच्या संगरामुळें नव्हे, तर त्या कवितेची बैठक जीवनाशीं सुसंगत आहे, जीवनांतलि सत्याला धरून आहे अशी स्पष्ट जाणीव झाल्यामुळें होय. ही जाणीव नसेल तर त्या काव्यापासून मिळणारा आनंद वरपांगी, पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें क्षणजीवि राहील व शाश्वत आनंदाचें निधान असणारें काव्य हळूहळू त्याच्या स्मृतींतून नाहींसें होऊन जाईल.

पुष्कळ शिक्षकांना काव्यांतील हें सत्य म्हणजे काय आहे याची स्थूल कल्पनासुद्धां नसते. सत्य म्हणजे अंकगणित, बीजगणित किंवा भूमीति यांचे सिद्धान्त एवढीच त्यांची कल्पना असते. "एक अधिक एक म्हणजे दोन" "अ$^{२}$ म्हणजे अ गुणिले अ", आणि "रेषेस लांबी असते पण रुंदी नसते" या गोष्टी त्यांना सत्य वाटतात, कारण त्या कधींही बदलल्या जाणें शक्य नाहीं. पण यांतही पूर्ण सत्य आहे कीं नाहीं या मुद्दयाचा येथें फारसा विस्तार

न करतां असें म्हणतां येईल कीं, गणितांतील प्रमेयें, इतिहासांतील स्थल व कालाचे आंकडे यांनाच सत्य मानणारे लोक, कवि जेव्हां कल्पनेच्या साह्यानें काव्य लिहूं लागतो तेव्हां त्यांत असत्य मानूं लागतात. कै. तांबे यांची ‘ मुशाफिर आम्ही ’ किंवा “ राजकन्या आणि तिची दासी ” ही कविता वाचली कीं कोणत्या सनांत, कोणत्या गांवीं हा प्रसंग घडला अशी पृच्छा करून ही कविता खोटी – असत्य – मानतात. यशवंताची ‘ गुलामाचें गाऱ्हाणें ’ ही कविता वाचून घोडा कधीं बोलणार नाहीं या निष्कर्षावर, ही कविता असत्य आहे असें समजतात. आणि या गैरसमजामुळेंच या लोकांना काव्याचा खरा आस्वाद कायम स्वरूपांत घेतां येत नाहीं.

काव्यांतील सत्याची मौज ही आहे कीं, तें सत्य एका व्यक्तीपुरतें अथवा एका काळापुरतें किंवा एका स्थळापुरतें मर्यादित नसतें, तर सर्व मानवजातीचा, कोणत्याही काळाचा व स्थळाचा समावेश त्या सत्यामध्यें होतो. ‘ मुशाफिर आम्ही ’ यांतील मुशाफीर व त्यावर भाळली जाणारी स्त्री म्हणजे केवळ राजपुतान्यांतील कोणत्या तरी वेळच्या दोन तरुणांच्या प्रणयाचें चित्र नसून, पृथ्वीच्या पाठीवर अनिरुद्ध संचार करणाऱ्या तरुणाचें व त्याच्यावर मोहून जाणाऱ्या प्रेयसीचें चित्र आहे. तो तरुण व ती तरुणी कुठेंही आढळूं शकतील हें सत्य आहे. ‘ गुलामाच्या गाऱ्हाण्यांतील ’ घोडा बोलतो हें सत्य नाहीं पण त्याद्वारें नोकर – चाकर, गिरणीमजूर यांना पददलित कसें केलें जातें, त्यांची श्रीमंत वर्गाकडून निर्दय उपेक्षा कशी चालविली जाते, याचें काढलेलें करुण चित्र मात्र सत्य आहे.* ‘आई’ विषयक दिसून येणारी सार्वत्रिक तळमळ हें सत्य आहे. ‘जगरहाटी’ मधील तत्त्व – ‘ जिवंत असतांना अनादर, पण मेल्यावर मात्र पूजन ’

* याविषयीं अधिक विवेचन : शारदाविहार पृष्ठ — २२१, २३६.

हें सत्य आहे. सारांश काव्यांतील सत्य हें फार व्यापक अर्थानें व शाश्वत स्वरूपांत समजण्याचें सामर्थ्य प्रथम शिक्षकांत असावयास पाहिजे; तसें सत्यान्वेषण त्यास होत नसेल तर काव्याचा दिव्य सौंदर्यानंद त्यास कायम टिकवतां येणार नाहीं. नदीकांठीं उगवलेलें 'गवताचें पातें' आपणांपैकीं पुष्कळांनीं पाहिलें असेल. पण त्यांतील नाजुक सौंदर्याचा आस्वाद किती जणांना मिळाला असेल बरें ? पुष्कळ लोक 'त्यांत काय विशेष आहे – साधें गवताचें पान' असेंच मानणार ! त्या गवताच्या रंगाचें, आकाराचें, नाजुकतेचें, व वायुलहरींवर डोलत रहाण्याचें सौंदर्य, आणि त्या सौंदर्यापलीकडे असणारें परमेश्वरी सामर्थ्य व त्याची करामत सांगणारें 'सत्य' कविवर्य तांबे यांच्याप्रमाणें किती लोकांना अनुभवास आलें असेल ? कविवर्य तांबे यांची 'तृणाचें पातें' ही कविता वाचा आणि त्यांतील सौंदर्य व अंतिम सत्य यांचा आस्वाद घेण्याचा प्रयत्न करा–तुमच्या प्रत्येक वाचनानें नवा नवा आनंद तुम्हाला प्राप्त होईल.

जीवनाच्या प्रत्येक हालचालींत सौंदर्य व सत्य भरून राहिलें आहे; आणि त्याचें प्रतीक असणाऱ्या काव्यांतही सौंदर्य व सत्य असतें. मात्र तें शोधून काढणारी दृष्टि हवी. जर काव्यांतील सौंदर्य त्याच्या दृष्टीला व काव्यांतील नाद त्याच्या श्रुतीला आढळला नाहीं आणि काव्यांतील अंतिम सत्य त्याच्या बुद्धीस आकलन झालें नाहीं तर तो दोष कवितेचा नाहीं. तर त्या शिक्षकाच्या विकृतीचा होय ! दुर्योधनास राजसूय यज्ञाच्या वेळीं श्रीकृष्णानें ब्राह्मणांच्या पंक्तीमधून सत्पात्र ब्राह्मण निवडण्यास सांगितलें, पण दुर्योधनास एकही सांपडेना; उलट धर्मराजास तेथें एकही अयोग्य ब्राह्मण आढळेना. याचें मर्म हेंच आहे. विकृत दृष्टीनें बघितलें कीं काव्यांतील सौंदर्य व सत्य सांपडणें अशक्य आहे. शिक्षकानें काव्यांतील सत्य स्वतः

जाणलें तर पाहिजेच पण सत्य जाणून शाश्वत आनंद प्राप्त करून घेण्यास विद्यार्थ्यांना समर्थ केलें पाहिजे. काव्य, नाट्य यांत हें शाश्वत सत्य असल्यामुळेंच त्यांना एवढी मान्यता मिळाली आहे. लोकांचे मनोव्यापार म्हणजे सुद्धां जगांतील शाश्वत सत्यच आहे. कालिदासाचें शाकुंतल नाटक, किंवा भवभूतीचें उत्तररामचरित्र हें नाटक श्रेष्ठ कां तर त्यांतील शकुंतला, दुष्यंत, कण्व, राम व सीता हीं पात्रें सत्यसृष्टीला धरून आहेत! कन्याविरहानें कण्वाला होणारें दुःख जागतिक सत्य नाहीं काय? प्रीतीचा होणारा दाह जगांतील सर्वच तरुणांच्या अनुभवास येत नाहीं काय? ढगाबरोबर प्रियकरणीला निरोप धाडणारा यक्ष, त्या ढगाइतकाच कल्पित असला तरी त्यांतील 'प्रेमविरहाची भावना' शाश्वत व सत्यपूर्ण आहे म्हणूनच कालिदास व त्याचें मेघदूत श्रेष्ठ आहे. शेक्सपिअरला नाटककारांचा मुकुटमणि म्हटला जातो, याचें कारण, त्याचा हॅम्लेट किंवा लियर काल्पनिक असला तरी त्यानें या विविध पात्रांच्याद्वारें रेखाटलेले मनुष्यांचे मनोव्यापार हे सत्यास धरून आहेत हें होय! तांबे, माधव ज्यूलियन, यशवंत, गिरीश इत्यादि कवींच्या कवितांत हें 'सत्य' आहे म्हणूनच त्या सर्वांना जिव्हाळ्याच्या वाटतात. उत्कृष्ट काव्य, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र व सत्य हीं नेहमींच जीवनाशीं सुसंगत असतात. ज्या क्षणाला मानवाचे स्वभावधर्म आणि ग्रंथ यांची विसंगति निर्माण होईल, त्या क्षणाला वाङ्मयाचें महत्त्व कमी होईल व जनतेवर असणारी घट्ट पकड सैल व्हावयास लागेल.

काव्यांतील व्यक्ती व प्रसंग काल्पनिक अतएव असत्य असतील पण त्या प्रसंगांतील व्यक्तींच्या भावना या मात्र अनादि कालापासून आहेत व त्या भावनांचे व्यापार हे अनंत काल पुढेंही चालणार आहेत. मृतबालकास मांडीवर घेऊन ढसढसा शोक करणारी स्त्री

ग्रं. दि. वाचनालय

केवळ गडकऱ्यांनाच दिसतें असें नाहीं, तर त्या प्रसंगाद्वारें 'आईच्या वेड्या प्रेमाची कल्पना' सत्यस्वरूपांत प्रत्येकास अनुभवास येते. भावनांचें सत्य स्वरूप आपणांस दिसतें म्हणूनच आपणास कवितेपासून चिरंतन आनंदाचा आस्वाद घेतां येतो. प्रो. हॅडो यांनीं म्हटलें आहे:— " But we should remember that passion is the very flame of life, that it burns both to purify and to destroy, that it is the same passion, differently directed, which lifts man at one time to the gates of Heaven and at another, conducts him to the gates of Hell. " मानवी जीवनाची ज्योत म्हणजे भावना आहे. भावनेच्या प्रखर सामर्थ्यामुळें मनुष्य अत्यंत उच्च कोटीस तरी पोहोंचेल किंवा एकदम रसातळाला जाईल. भावनेच्या या सत्यस्वरूपाकडे व सामर्थ्याकडे शिक्षकानें डोळेझांक करून चालणार नाहीं. काव्याच्या अध्यापनांत सौंदर्यापलीकडे असणारी भावना विद्यार्थ्यांच्या अंतःकरणांत पुन्हां चेतविण्याचें महान् कार्य शिक्षकाचें आहे. विद्यार्थ्यांचीं अंतःकरणें योग्य दिशेनें व भावनेनें प्रेरित करून त्यांच्यापुढें विशाल ध्येयें हस्तगत करण्यासाठीं स्फूर्तीचा झरा निर्माण करावयास हवा आहे. मानवी जीवनांतील विशाल तत्त्वें आणि शाश्वत सत्यें यांचें ज्ञान करून देण्यासाठीं झटणाऱ्या शिक्षकाचें स्थान फार उच्च आहे. खांडेकरांची 'घरीं एकच पणती मिणमिणती, म्हणुं नको, उचल चल लगबग ती' ही कविता शिकवीत असतांना त्यांतील नादमाधुर्य प्रत्ययास येईल. पणतीच्या स्नेहाची कल्पकता श्रेष्ठ वाटेल, पण त्यांतील परोपकाराची भावना, आर्तांना ओ देण्यांतील सत्य हें विद्यार्थ्यांना आकलन झालें तरच कविता शिकवल्याचें सार्थक आहे. काव्यानें आनंद होतो, सत्याचें ज्ञान होतें, सत्प्रवृत्तीचें भरण होतें असें जें म्हणतात तें कवितेंतील या महत्त्वाच्या अध्यापनामुळें होय.

धर्माच्या अध्यापनापेक्षां कवितेचें अध्यापन फार मोठें, महत्त्वाचें व जबाबदारीचें आहे. पुराणिकबुवा फार तर देवळांतील जनार्दनाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतील. पण शिक्षक मानवतेच्या भव्य मंदिरांतील जनताजनार्दनाकडे उदार व व्यापक दृष्टीनें बघावें याचा प्रयत्न करील. मात्र या बाबतींत शिक्षकाचा आदर्श विद्यार्थ्यांच्या पुढें सतत हवा. शिक्षकाला काव्यांतील अंतिम सत्याबद्दल विश्वास वाटला पाहिजे. हा विश्वास असला कीं आत्मजाणिवेमुळें सौंदर्य व सत्य यांचा शोध विद्यार्थ्यांना केवळ काव्यवाचनानेंच नव्हे तर प्रत्येक कलेच्या दर्शनानें होण्यास लागेल.

पहिल्या प्रकरणांत काव्याकडे 'सत्यं-शिवं—सुंदरं' युक्त दृष्टि हवी असें म्हटलें आहे याचें कारण हेंच आहे. ही दृष्टि एकदां आली कीं विद्यार्थ्यांना आवडेल त्या कवीच्या कविता वाचावयास सांगा. कविवर्य तांबे यांच्या "आतां गडी फू दादाशीं" यासारख्या बालिश मनोवृत्ति दर्शविणाऱ्या कविता, "मधु घटचि रिकामे पडति घरीं" असल्या प्रौढ वृत्तीच्या कविता किंवा 'दिनान्तीं' अथवा 'घर राहिलें दूर' असल्या निर्वाणीच्या कविता मुलें वाचूं द्या; त्यांतील सौंदर्य व सत्य यांची जाणीव त्यांना होणें अपरिहार्य आहे.

आतांपर्यंत काव्यांतील सत्य विद्यार्थ्यांना आकलन होण्याविषयीं कांहीं विचार मांडले आहेत. पण याच वेळीं हा इषारा देणें जरूर आहे कीं, 'सत्या' शीं ओळख सौंदर्यामधून व्हावयास पाहिजे. विद्यार्थ्यांना कविता आवडल्यानंतर मग सत्याच्या शोधाला त्यांना मदत करा आणि या वेळींसुद्धां विद्यार्थ्यांचें वय व आकलनशक्ति काय आहे याचा क्षणभर विचार करा. अल्पवयीन विद्यार्थ्यांपुढें 'सत्य' आणलेंच पाहिजे असा आग्रह धरूं नका. नाहीं तर जुन्या काळांत शिक्षक कवितेवरून बोधावर—तात्पर्यावर तुटून पडत;

आतां शिक्षक कवितेवरून सत्यावर तुटून पडतील व सौंदर्याची व आनंदनिर्मितीची उपेक्षा करतील. प्राथमिक मराठी शाळेंतील लहान मुलाला जर 'फुलपांखरूं' आनंद देत असेल, कल्पनेनें 'इंजिनवाला' बनण्यांत गंमत वाटत असेल तर त्या आनंदाचा त्यास खुशाल उपभोग घेऊं द्या; सत्याचें स्वरूप दूर ठेवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या वयानुसार व आकलनशक्तीनुसार, सौंदर्यावरून सत्याकडे नेण्याचा प्रयत्न अत्यंत कुशलतेनें व तज्ज्ञ शिक्षकांकरवीं होण्यास पाहिजे. या मुद्याचा विचार केल्यास खालच्या इयत्तांमध्येंच शिक्षणपद्धतींत पारंगत झालेले व बालमानसशास्त्राचा अभ्यास केलेले शिक्षक नेमले जाणें इष्ट वाटेल आणि तें आहेही! पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति अशी आहे कीं, जे शिक्षक कमी प्रतीचे ते हटकून खालच्या वर्गासाठीं व तज्ज्ञ शिक्षक वरच्या वर्गासाठीं राखून ठेवले जातात. आमच्या शिक्षणाचा दर्जा व फलनिष्पत्ति कमी होण्यास ही पद्धति एक प्रमुख कारण मानावी लागेल. काव्याविषयीं आस्था खालच्या वर्गांत मृतप्राय झाली कीं वरच्या वर्गांतील तज्ज्ञ शिक्षकास ती सजीव करण्याचा उद्योग करावा लागणार. ही स्थिति पालटण्याचा एकच उपाय म्हणजे काव्याचें अध्यापन खालच्या वर्गापासून वरच्या वर्गापर्यंत तज्ज्ञ शिक्षकांकरवीं व्हावयास पाहिजे.

---

## प्रकरण ९ वें : : : काहीं प्रश्न व उपसंहार

काव्याच्या अध्यापनांतील बहुतेक महत्त्वाच्या मुद्यांचा विचार आतांपर्यंत झालेलाच आहे. आतां मागें निव्वळ उल्लेख येऊन गेलेल्या किरकोळ मुद्यांचाच खुलासा करावयास पाहिजे. त्यांपैकीं पहिला मुद्दा

म्हणजे काव्याच्या अध्यापनांत कविचरित्रास स्थान आहे कीं नाहीं? आणि जर तें असेल तर तें किती प्रमाणांत असावयास पाहिजे? काव्याच्या प्रस्तावनेविषयीं चर्चा करतांना कविचरित्र सांगून कवितेकडे जाण्याची एक रीत आहे असा उल्लेख आलेलाच आहे. पण या ठिकाणीं प्रस्तावनेखेरीज कविचरित्राचा उल्लेख करावा कीं नाहीं याचाही विचार करणें जरूर आहे. जर कवितेचें आकलन होण्यास कवींचें चरित्र जरूर असेल तर तें प्रसंग पाहून सांगणें योग्य होईल. पण खरोखरच असे प्रसंग किती येतील? कविता जर वस्तुनिष्ठ ( Objective ) असेल तर हा प्रश्नच उद्भवणार नाहीं; पण जर ती आत्मनिष्ठ ( Subjective ) असेल तर कविचरित्र सांगण्याविषयीं प्रश्न उत्पन्न होईल. शक्य तों खालच्या वर्गांत कविचरित्र सांगू नये. विद्यार्थ्यांचें लक्ष फक्त काव्यावरच मर्यादित करावें. अगदीं वरच्या वर्गांत — म्हणजे इयत्ता पांचवीनंतरच्या — प्रसंगविशेषीं कविचरित्र सर्व सांगण्यापेक्षां, जरूर तेवढे भाग किंवा त्याचे अनुभव सांगणें उपयुक्त ठरेल. केवळ उदाहरणांवरूनच हें स्पष्ट करावयाचें झालें तर, कै. तांबे यांची 'रिकामे मधुघट' ही कविता घ्यावयाची असेल तर या काव्यनिर्मितीस कारणीभूत झालेला त्यांच्या जीवनांतील प्रसंग सांगावा लागेल. पण ह्या कविचरित्राच्या कथनास औचित्य, सबळ कारण, व मर्यादा मात्र असणें जरूर आहे. मॅट्रिकच्या क्रमिक पुस्तकांत केवळ एकच कविता दिली असतांना व त्या कवितेचा कविचरित्राशीं संबंध नसतांना, कविचरित्रावर प्रश्न ऐन परिक्षेला येतो हें स्वागतार्ह वाटत नाहीं. पण मॅट्रिकची परीक्षा हेंच ध्येय आमच्या शाळाधिकारी व शिक्षक लोकांना वाटत असल्यामुळें कविचरित्राचा अभ्यास खालच्या वर्गापासून घेण्याची अनिष्ट प्रथा आमच्यांत रूढ झाली आहे. कविचरित्र सांगतांना एक जाणीव अशी

ठेवा कीं, जे प्रसंग कवीस सांगावेसे वाटत नाहींत ते सर्वज्ञाचा आव आणून सांगूं नका. त्यामुळें काव्याकडे बघण्याची दृष्टि विकृत होते व काव्यांतील सौंदर्य व सत्य यांपासून आनंद लुटण्याचें कार्य मागें पडतें.

यानंतरचा दुसरा मुद्दा हा आहे कीं, काव्याच्या अध्यापनांत वृत्त, जाति, गण व मात्रा इत्यादि भागास जागा आहे कीं नाहीं ? असल्यास त्यांचें अध्यापन केव्हां करावें ? काव्याच्या या बाह्य शरीराचा अभ्यास घ्यावयास पाहिजे पण तो मुख्यत्वें वरच्या वर्गांत घ्यावयास हवा. पूर्वीं मराठी सहाव्या इयत्तेंत गण-वृत्तांना आरंभ केला जाई व विद्यार्थ्यांकडून 'य यमाचा, न नमन, भ भास्कर' ही अर्थशून्य कारिका सक्तीनें पाठ करवून घेतली जाई. दहा-अकरा वयाच्या मुलांना ही चर्चा व हें शास्त्रीय पृथःकरण निश्चितच आकलनाबाहेरचें, अतएव कंटाळवाणें वाटत असलें पाहिजे यांत शंका नाहीं व या काव्यशरीराच्या 'चिंधड्या' उडविण्याच्या रूक्षतेनें खरें काव्यप्रेम कमी झालें असल्यास नवल नाहीं. फार तर कविता वाचतांना थांबण्याच्या जागा सहजगत्या नजरेस आणून यति व यमक यांची कल्पना या इयत्तेंत देण्यास हरकत नाहीं. विद्यार्थी जात्याच नादमाधुर्याचे व तालबद्धतेचे भोक्ते असतात. कवितेच्या तालबद्धतेनें त्यांचे कान तयार होऊं द्या. खालच्या वर्गांत त्यांना चाली परिचित होऊं द्या. पण त्या शास्त्रीय चर्चेसाठीं नव्हे; तर त्याच धर्तीच्या चालीवर अपरिचित कविता वाचतां आल्या पाहिजेत यासाठीं ! जर इयत्ता पहिलीमध्यें 'चंद्रकान्त राजाची' चाल असलेली एकादी कविता असेल तर त्याच चालींतील दत्तांची 'प्रभात', बालकवींची 'श्रावणमास' या कविता त्यांस म्हणण्याची

संधि द्या. चाल परिचित झाली कीं विद्यार्थी गुणगुणावयास लागतील, एकादा चरण अडला तर ते स्वतःच नाद निर्माण करून भर घालतील व अशा नैसर्गिक तऱ्हेनेंच काव्य लिहिण्याची त्यांस स्फूर्ति येईल.

यानंतरची अवस्था म्हणजे मात्रावृत्तें (जाति) शिकवणें. यासाठीं प्रथम एक चरण घ्यावा व त्याच्याशीं विसंगत वाटणारा दुसरा चरण ठेवून मोठ्यानें म्हणावा; कान तयार झाल्यामुळें कांहीं तरी चुकलें असें विद्यार्थी सांगतील, फार तर दुरुस्ती सुचवतील. त्याचा फायदा घेऊन लघु–गुरूंची कल्पना ठसवणें सोपें जाईल. ह्यानंतर मात्र अक्षरवृत्तें घेण्यास हरकत नाहीं. एकच काळजी घेणें जरूर आहे. आणि ती म्हणजे या शास्त्रानें काव्यप्रेम वाढलें पाहिजे; तें कमी होतां कामा नये.* काव्याच्या शरीरापेक्षां आंतील प्राणशक्ति महत्त्वाची आहे. तिची उपेक्षा होतां कामा नये.

यानंतरचा तिसरा मुद्दा म्हणजे काव्याच्या अध्यापनांत कवितेवर टीका करावी कीं नाहीं? टीका याचा अर्थ स्पष्टीकरण करणें हा होय. कवीनें काव्यांत प्रकट केलेली व्यंजना अथवा बहारदार कल्पना पूर्णपणें बिंबण्यासाठीं खुलासा करणें ह्या अर्थानें कवितेवर टीका अवश्य करावी. पण ही टीका म्हणजेच अध्यापन ठरणार आहे; कारण अध्यापनांत शिक्षकाचें कार्य कवितेचें सौंदर्य व त्या सौंदर्यांतून उमटणारें अंतिम सत्य शोधण्यास विद्यार्थ्यांना मदत करणें. परंतु टीका याचा अर्थ आज बदलला आहे; आणि तो म्हणजे गुणांपेक्षां दोषांचेंच केलेलें दिग्दर्शन, आणि हे दोष दाखवून स्वतःचें महत्त्व वाढविण्याचा केलेला प्रयत्न होय! कविता जेव्हा

* याविषयीं अधिक विवेचन व आधार पहा.
Robert and Barter : "The Teaching of English"— ch. VIII pp. 181—184.

नों. दि.

खालच्या वर्गांत शिकवावयाची असते तेव्हां काव्यशास्त्र डोळ्यांसमोर ठेवून केलेलें गुणदोषविवेचन निष्फळ ठरतें. काव्याचें निःपक्षपात-बुद्धीनें परीक्षण करणें हें विद्यार्थ्यांच्या आकलनाबाहेरचें आहे. असा प्रयत्न फार तर इयत्ता सहावी व सातवीमध्यें करावा. या ठिकाणीं त्या प्रयत्नास नुसताच आरंभ करावा व त्याला जास्त महत्त्व कॉलेजमध्यें द्यावें. बारा वर्षांच्या मुलाला काव्याचा आनंद घेतां येईल पण रस, ध्वनि, वृत्तदोष, प्रतिभा, कल्पना, काव्यगुण इत्यादि कल्पना कशा आत्मसात् होतील? खालच्या वर्गांत विद्यार्थ्यांना कविता आवडली तर कारणें विचारा. त्यांना त्यांतील भाषा, चाल, अनुभव, कल्पना आवडल्या तर तेवढें पुरे आहे. काव्यपरीक्षणाचा प्रश्न मॅट्रिकच्या परीक्षेंत इंग्रजी व मराठी प्रश्नपत्रिकेंत विचारला जाई तेव्हां अनुभव हा आला कीं, विद्यार्थ्यांना परीक्षण येत नाहीं. मात्र शिक्षक परीक्षणास लागणारे शब्द — प्रतिभा, स्वतंत्र काव्य, विधात्री कल्पना, अर्थानुकारी भाषा इ. शब्द — घोकून घेत असल्यामुळें, विद्यार्थी त्यांचा बेजबाबदारपणें वापर करीत असत.

विद्यार्थ्यांना टीकाशास्त्रज्ञ बनविण्याचा प्रयत्न शाळेंत करूं नये. पण जर एकादा टीकालेख कवितेच्या अर्थास मदत करील तर तो वरच्या वर्गांत वाचून दाखवण्यास हरकत नाहीं. सहाव्या इयत्तेंत मराठी कविता "फुलराणी" (बालकवि) शिकवत असतांना गिरीश यांनीं 'सह्याद्रि' मासिकाच्या १९३८ च्या अंकांत लिहिलेला लेख वाचून दाखवून, मूळ कवितेपासून मिळालेला आनंद वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकानें केलेला आहे.

याच वेळीं पाठांतराचा मुद्दा सुद्धा लक्षांत घेतला पाहिजे. क्लिष्ट कविता पाठांतरास देण्याची पद्धति आज त्याज्य ठरली आहे. जी कविता विद्यार्थ्यांना नादमधुर वाटेल, गुणगुणावी असें वाटेल तीच

पाठांतरास द्यावी. पाठांतर ही हौस समजावी, सक्ति नव्हे. रसास्वाद किंवा काव्यानंदाची परिणति म्हणजे पाठांतर. "To learn a poem by heart is the last step in appreciating it." * पाठांतराविषयीं जॅगर या शिक्षणशास्त्रज्ञाचें हें मत प्रत्येक शिक्षकानें लक्षांत ठेवलें म्हणजे पाठांतरास काय द्यावें, किती द्यावें व केव्हां द्यावें हें त्यास सहज समजेल.

पाठांतरासाठीं एकादें भावगीत दिलें जात असेल तर तें सर्व द्यावें. आज आठ ओळी, उद्यां सहा ओळी असे तुकडे पाडून देण्यांत येऊं नयेत. सर्व काव्य अर्थपूर्ण व एकसंधि असतें आणि त्यामुळें तें पाठांतरास सोपें जातें असें शैक्षणिक प्रयोग केल्यावर सिद्ध झालें आहे.

मागें अनेक प्रसंगीं विद्यार्थ्यांना स्वतःचे काव्यसंग्रह बनविण्यास सांगा असा उल्लेख केलेला आहे. स्वतःचे काव्यसंग्रह बनवण्यामुळें काव्याविषयीं प्रेम तर वाटेलच पण निवड करतांना उच्च अभिरुचि प्राप्त होईल यांत शंका नाहीं. आवडणाऱ्या गोष्टींचा—वस्तूंचा—संग्रह करणें, त्यांच्यावरील मालकीचा आनंद व अभिमान बाळगणें या मुलांच्या नैसर्गिक वृत्ती आहेत. § या वृत्तींचा फायदा कवितेच्या अध्यापकानें करून घेतला पाहिजे. यासाठीं शिक्षकानें दर आठवड्यास एक नवीन कविता वर्गांत वाचून दाखवावी व विद्यार्थ्यांना कविता निवडून वाचण्यास सांगावें. 'काव्यवाचन मंडळ' सुरू करावें. शरद् ऋतूमध्यें विद्यार्थ्यांच्या समवेत चांदफेरी काढावी. चांदण्याचा आनंद त्यांना मिळूं द्या आणि मग आपोआपच त्यांच्या संग्रहांत 'चांदरात' सारख्या कविता जमा होतील. एकाद्या वेळीं 'वनविहार' करण्यास घेऊन चला. निसर्गाच्या सहवासांत घालविलेले

* J. H. Jagger–Poetry In School p. 57.

§ Mc. Dougall : Fundamentals of Psychology—Instincts.

चार-पांच तास फुकट जाणार नाहींत. निसर्गाच्या सौंदर्याचा परिणाम त्यांच्या सौंदर्यग्राहक मनावर कळत नकळत उमटल्याशिवाय राहाणार नाहीं. आपोआपच निसर्गवर्णनपर काव्याविषयीं प्रेम उत्पन्न होईल. बालकवि, केशवसुत, बोरकर यांच्या कविता त्यांच्या संग्रहांत दिसून येतील. मातृभाषेच्या शिक्षकाला जर ही दिव्यदृष्टि लाभली असेल तर किती तरी चांगल्या गोष्टी करतां येतील. विद्यार्थ्यांचा काव्यसंग्रह कोणत्याही वस्तूंतील किंवा व्यक्तींतील अंतर्बाह्य सौंदर्य कसें हुडकावें याची त्यांस संवय लावील. मानसशास्त्रीय बैठकीवर हें अध्यापन आधारलें असल्यामुळें शाळेच्या सात-आठ वर्षांच्या काव्याच्या अध्ययनांतून बाहेर पडणारा विद्यार्थी आनंदी प्रवृत्तीचा, हंसत मुखाचा, बौद्धिक व भावनात्मक उंची वाढलेला, आत्मविश्वास असणारा व सत्प्रवृत्तीचा नागरिक होईल आणि शालेय शिक्षणक्रमांत केलेला काव्याचा अंतर्भाव त्या अध्यापनानें सार्थ होईल याविषयीं शंका उरणार नाहीं !

समाप्त

अनु. क्र. १८३७८ वाचनालय

# आधारभूत ग्रंथ


Alexander Haddow : On The Teaching Of Poetry.
J. H. Jagger : Poetry In School.
Roberts and Barter : The Teaching Of English.
Dr. P. Gurrey : The Appreciation Of Poetry.
J. Samson : English For The English.
Frazer : How To Learn A Poem.
I. A. Richards : Principles Of Literary Criticism.
Thorndike : Educational Psychology.
Ross : Groundwork Of Psychology.
McDougall : Fundamentals Of Psychology.
'Teaching Poetry.' : Compiled by the Society For Teachers of English.

(१) अकोलकर-पाटणकर — मराठीचें अध्यापन.
(२) श्री. म. माटे — रसवंतीची जन्मकथा.
(३) रा. श्री. जोग — सौंदर्यशोध आणि आनंदबोध.
(४) बा. सी. मर्ढेकर — वाङ्मयीन महात्मता.
(५) द. के. केळकर — वादळी वारे.
(६) महाराष्ट्र शारदा मंदिर पुणें — शारदाविहार : अध्यक्षीय भाषणें.


---


(या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन)



प्रकाशक—श्री. कमलाबाई भिडे,
मालक, मॉडर्न बुक-डेपो, आनंदाश्रमासमोर, पुणें २.
मुद्रक—भगवान पंढरीनाथ सोमण,
मॉडर्न प्रिंटिंग प्रेस, ३९१ नारायण, पुणें २.